अर्थ मराठी आणि बुक स्ट्रक यांचा संयुक्त उपक्रम

# आरंभ त्रैमासिक

वर्ष दुसरे
एकूण अंक 12 वा

आरंभ
नव्या साहित्य युगाचा

## सप्टेंबर ते नोव्हेंबर 2019

संपादक: निमिष सोनार



AARAMBHMASIK@GMAIL.COM

**या अंकात वाचा नऊवारी साडीबद्दल लेख तसेच नेहमीची लोकप्रिय सदरे**

# आरंभ टीम

**संस्थापक:** अभिषेक ठमके

**संपादक:** निमिष सोनार

**सह-संपादक:** सविता कारंजकर

**कार्यकारी संपादक:** आशिष कर्ले

**व्यवस्थापकीय संपादक:** सिद्धेश प्रभुगावकर

**प्रुफ रीडर:** मीना झाल्टे / विश्वास पाटील

**व्यंगचित्र विभाग:** सिद्धेश देवधर

**टेक्निकल विभाग:** सिद्धेश प्रभुगावकर

**कव्हर डिझाईन:** निमिष सोनार

**कंटेंट ऑर्गनायझर:** निमिष सोनार

**सल्लागार:** अक्षर प्रभू देसाई, अभिषेक ठमके

**मुखपृष्ठ मॉडेल:** मंजुषा सोनार, पुणे

**ईमेल:** aarambhmasik@gmail.com

**फेसबुक पेज:** https://www.facebook.com/aarambhmagazine

**बुक स्ट्रक:** https://www.facebook.com/groups/bookstruck/

**अंक आवडल्यास गुगल प्ले स्टोर वर 5 स्टार रेटिंग द्यायला विसरू नका:**

https://play.google.com/store/apps/details?id=com.marathi.magazine.aarambh

**सूचना:** या अंकासाठी कुणाला स्वयंसेवक म्हणून काम करायचे असल्यास तसेच या अंकात जाहिरात द्यायची असल्यास आरंभच्या ईमेल आयडीवर संपर्क/चौकशी करावी. या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेल्या प्रत्येक मताशी आरंभ टीम सहमत असेलच असे नाही. आरंभ त्रैमासिक असल्याने पुढील अंक डिसेंबर महिन्यात प्रकाशित होईल याची नोंद घ्यावी. हे आरंभचे दुसरे वर्ष असून हा सुरुवातीपासूनचा एकूण १२ वा अंक आहे.

(आरंभ त्रैमासिक हा अर्थ मराठी आणि बुक स्ट्रक यांचा संयुक्त उपक्रम आहे.)

# अनुक्रमणिका

*या अंकात एकूण 27 लेख, 6 कथा, 13 कविता आणि 7 कला प्रकार समाविष्ट आहेत.*

*साहित्य वाचण्यासाठी अनुक्रमणिकेतील लेखाच्या नावावर क्लिक करा म्हणजे ते पान उघडेल*


आरंभ टीम ........ 2

**अनुक्रमणिका ........ 3**

**संपादकीय........ 6**

**|| लेख विभाग || ........ 7**

**नऊवारी साडी – शिल्पा कोटगिरे, पुणे........ 7**

**युरोपायन – रिता जोहरापूरकर ........ 8**

**ऑस्ट्रियाची सफर - समीर गर्दे ........ 24**

**मोठयांचे मोठेपण - अविनाश हळबे........ 38**

**पर्यावरण आणि बांधकाम व्यावसायिक – प्रवीण गिरजापुरे........ 40**

**सेल्फ मेडिकेशन - आशिष कर्ले, शिराळा ........ 42**

**जनांचा प्रवाहो चालीला - हेमंत बेटावदकर, जळगांव........ 44**

**नामदेवराव: प्रेमाचा निर्मळ झरा - किरण दहीवदकर, पुणे........ 45**

**महादेव – सुवर्णा सोनवणे, चाळीसगांव........ 53**

**धैर्याचे घाव – ओशो ........ 54**

**नागपंचमी ३२ शिराळा! – आशिष कर्ले ........ 55**

**डिस्कव्हरी वाहिनी मराठीत! – आशिष कर्ले, शिराळा ........ 56**

**मी का लिहिते? - अंजना कर्णिक, मुंबई ........ 57**

**आईचे घर – मंजुषा सोनार, पुणे........ 59**

**माझ्या काळातील श्रावण - शरयू वडाळकर, मालेगांव........ 61**

माझ्यातल्या मीचा मान!! - उर्मिला देवेन, जपान ........ 64

श्रध्देला जेव्हा अंधश्रध्देचे ग्रहण लागते! - सुवर्णा सोनवणे, चाळीसगांव ........ 67

'शिक्षक' नवयुगाचा शिल्पकार! – सुवर्णा सोनवणे,  चाळीसगांव ........ 70

न्यूड: प्रत्येकाने बघावा असा चित्रपट - वर्षा सोनवणे ........ 72

न्यूड: एक भावपूर्ण कलाकृती – रिता जोहरापूरकर ........ 76

श्रीराम राघवन: हटके दिग्दर्शक! - राज जाधव, पुणे ........ 78

करिश्माचा करिष्मा - अमोल उदगीरकर ........ 80

साउथचा सिनेमा: रण्णा - अक्षता दिवटे,  बंगलोर ........ 82

पुस्तक परीक्षण: प्रवाह माझा सोबती – निमिष सोनार ........ 85

मुलाखत: राजेश बाळापुरे (सोलर पावर जनरेशन प्रोजेक्ट) - निमिष सोनार ........ 87

रेसिपी: गव्हाच्या पिठाची पौष्टिक बिस्किटे (कुकीज) – उर्मिला देवेन ........ 90

मैथिली अतुल यांची खुसखुशीत “नै” वन लायनर्स ........ 94

|| कथा/अनुभव विभाग || ........ 96

लीनाचा जगप्रवास - रुचिता प्रसाद,  वय १० वर्षे ........ 96

जसे आपण तसे जग? आशू लॅमोस,  मस्कत ........ 98

सारे काही अनपेक्षित! - निमिष सोनार ........ 100

गरज आहे एका साक्षीची - पूनम कुलकर्णी,  औसा (लातूर) ........ 103

दहाचा आकडा -  प्रभाकर  पटवर्धन ........ 105

देणे सौभाग्याचे  - सविता कारंजकर,  सातारा ........ 109

|| कविता विभाग || ........ 114

फार फार तर काय होईल? – उर्मिला देवेन ........ 114

सत्य - भरत उपासनी,  नाशिक ........ 115

**बालपण – उदय जडीये, पिंपरी** .......... 116

**अरे संसार संसार - नवनीत सोनार, पुणे** .......... 117

**व्हॉट्सअप स्टेटस - प्रिया गौरव भांबुरे, तळेगाव दाभाडे** .......... 118

**माझ्या मनातला पाऊस - जुईली अतितकर, नवीन पनवेल** .......... 119

**चांदोमामा – प्रसन्न पटवर्धन, पुणे** .......... 121

**भेट सवंगड्यांची – प्रसन्न पटवर्धन, पुणे** .......... 121

**धनी – मोहन वायकोळे, बोईसर** .......... 123

**नवी जाणीव - भारत उपासनी, नाशिक** .......... 124

**रथचक्र - भरत उपासनी, नाशिक** .......... 125

**सांगू कसे मी कोणाला? - सुवर्णा कांबळे, कळंबोली** .......... 127

**चारोळया: पानगळ - अभिलाषा देशपांडे, डोंबिवली** .......... 128

**|| कला विभाग ||** .......... 129

**स्केचेस (रेखाटने) – हर्षलता पाटील** .......... 129

**ग्राफिटी – अविनाश हळबे** .......... 129

**स्केचेस (रेखाटने) – निमिष सोनार** .......... 129

**स्केचेस (रेखाटने) – अथर्व सोनार, पुणे** .......... 130

**व्यंगचित्रे – सिद्धेश देवधर, गोवा** .......... 130

**व्यंगचित्रे – रोहिणी जाधव, बेलापूर** .......... 131

**निसर्ग छायाचित्रण – अनन्या बाळापुरे, चिंचवड** .......... 132

# संपादकीय

नमस्कार वाचक मंडळी! आरंभचा सप्टेंबर अंक आपल्या हाती देताना मला खूप आनंद होत आहे. हे आरंभचे दुसरे वर्ष असून हा सुरुवातीपासूनचा एकूण १२ वा अंक आहे. आपल्या सर्वांना माहिती आहेच की आरंभ हे एक ऑनलाइन त्रैमासिक असून वर्षातून चार वेळा प्रकाशित होते आणि गुगल प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध असते तसेच या अंकाची पीडीएफ आवृत्तीसुद्धा निघते आणि तीसुद्धा मोफत उपलब्ध असते. यात लिहिणारे प्रसिद्ध तसेच नवोदित लेखक कोणतेही मानधन न घेता लिखाण करत असतात. संपूर्ण आरंभ टीम एक सामाजिक बांधिलकी म्हणून, मराठी भाषेची सेवा करावी म्हणून तसेच नवोदित लेखकांना लिहिण्यासाठी व्यासपीठ मिळावे म्हणून हा अंक चालवत आहे. विशेष म्हणजे दिवसेंदिवस लेखक आणि वाचकांचा आरंभला भरघोस प्रतिसाद लाभतो आहे, ही खूप आनंदाची गोष्ट आहे!

गेल्या काही महिन्यातील महत्त्वाच्या घडामोडींचा आढावा घ्यायचे झाले तर, जुलै आणि ऑगस्ट महिन्यामध्ये महाराष्ट्रात आलेल्या महापुरामुळे अनेक जण बेघर झाले तसेच जीवित आणि वित्तहानी झाली. आरंभ टीममधील प्रत्येकाने आपापल्या परीने पूरग्रस्तांना मदत केली आणि सामाजिक बांधिलकी जपली याचा मला आनंद वाटतो. तसेच जम्मू-काश्मीरमधील कलम 370 रद्द झाले आणि लडाख हे वेगळे राज्य झाले. त्याचे दूरगामी परिणाम हळूहळू दिसायला लागतील. तसेच भारताने वर्ल्डकप गमावला याचे सच्चा क्रीडा रसिकांना दुःख झाले असेल पण ज्याच्या अंगी खिलाडू वृत्ती आहे अशा प्रेक्षकांनी आणि क्रीडाप्रेमींनी हा पराभव खिलाडूवृत्तीने नक्कीच घेतला असेल. आगामी T20 वर्ल्ड कप साठी आरंभ टीम कडून टीम इंडियाला शुभेच्छा! फक्त क्रिकेटच नाही तर इतर क्रीडा प्रकारात भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सगळया खेळाडूंना आराम टीम तर्फे हार्दिक शुभेच्छा! नुकतेच पी. व्ही. सिंधू ने जागतिक बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. चित्रपट क्षेत्रात नवनवीन बदल होत आहेत सामाजिक, राजकीय, कायदा, कॉर्पोरेट क्षेत्रात नवनवीन बदलाचे वारे वाहत आहेत. कोणताही बदल असो त्याबद्दल सुरुवातीला भीती आणि विरोध होतच असतो. पण त्याचे बरे वाईट परिणाम अनुभवायला भरपूर काळ जाऊ द्यावा लागतो. असो. कोणतेही नियतकालिक, वर्तमानपत्र आणि पुस्तक असो किंवा मग टीव्ही मालिका, चित्रपट असो त्यात सद्यस्थितीतील समाजजीवनाचे प्रतिबिंब उमटत असते. आरंभमध्ये सुद्धा आपणास हे दिसेलच पण त्याच सोबत आपण निखळ साहित्याचा आनंद सुद्धा घेत असतो म्हणजे कथा कविता आणि कला यांनाही आपण बरोबरीने स्थान दिले आहे. सध्या विनोदी लिखाण करणारे खूप कमी आहेत, तेव्हा पुढील अंकासाठी विनोदी लिखाण करणाऱ्या लेखकांनी पुढे यावे अशी लेखकांकडून आरंभ टीमची अपेक्षा आहे. चला तर मग हा अंक वाचनाचा आनंद घ्या आणि पुन्हा भेटूया डिसेंबर महिन्यात म्हणजेच या वर्षीच्या शेवटच्या अंकात! तोपर्यंत लिहिते व्हा आणि लिखाणातून वैचारिक बदल घडवा.

**- संपादक**

## || लेख विभाग ||

## नऊवारी साडी – शिल्पा कोटगिरे, पुणे

☎: 9404241270 / 9370061478

*(पारंपारिक वेशभूषा या लेख मालिकेतील हा पहिला भाग आहे)*

**न**ऊवारी साडी म्हटले की आपल्यासमोर महाराष्ट्रीयन पारंपरिक घरंदाज स्त्री उभी राहते.

पहिल्यांदा महाराष्ट्रात नऊवारी साडी नेसली जात असे. त्यामध्ये वेगवेगळे प्रकार असायचे जसे, ब्राह्मणी, पेशवाई, कोळी, लावणी इत्यादी. साडीचा प्रत्येक प्रकार कामाच्या स्वरूपानुसार नेसला जायचा. नऊवारी नेसून घोड्यावर बसून युद्ध सुद्धा लढली जायची.

पण आता सुद्धा लहान मुलींपासून सर्व वयोगटामध्ये नऊवारी साडीची आवड आहे. रेडीमेड नऊवारी साडी नेसायला सहज सोपी आहे. सलवार प्रमाणे झटपट नेसू शकतो. यामध्ये पारंपरिक आणि आधुनिकतेचा संगम आहे, त्यामुळे ती फॅशनमध्ये आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम, लग्नकार्य, तसेच गणपती, दिवाळी, दसरा यासारख्या सणांना आता रेडीमेड नऊवारी साडी वापरली जाते.

तरुण पिढीमध्ये फॅशन ट्रेंड बदलताना दिसतात. गेल्या काही वर्षांमध्ये नऊवरीचे पारंपरिक व आधुनिक असे फॅशनेबल ट्रेंडी रूप आपल्यासमोर आले आहे. कॉलेजचे स्नेहसंमेलन, फॅन्सी ड्रेस स्पर्धा, सोसायट्यांमधील सण समारंभासाठी किंवा ऑफिसमधील संस्कृतिक कार्यक्रम यानिमित्त रेडीमेड नऊवारी साडी नेसण्याची फॅशन आलेली आहे.

या रेडीमेड नऊवारी साड्या अनेक पारंपरिक आणि फॅशनेबल प्रकारात उपलब्ध आहेत: जसे ब्राह्मणी नऊवारी साडी, पेशवाई साडी, जिजाऊ साडी, मस्तानी साडी, शाही मस्तानी साडी, राज नंदिनी साडी इत्यादी अशा फॅशनेबल प्रकरणांमुळे स्त्री अतिशय सुंदर घरंदाज नटखट तसेच करारी दिसते. अशी ही नऊवारी साडी आमच्याकडे सर्व प्रकारात उपलब्ध आहे त्याचबरोबर गौरीसाठी नऊवारी साडी शिवून मिळते.

आरंभच्या या अंकातील मुखपृष्ठावर नेसलेली नऊवारी साडी आणि वेशभूषा ही आम्ही बनवलेली आहे. त्याला मुखपृष्ठावर स्थान दिल्याने आरंभ टीमची मी शतश: आभारी आहे. या संर्भातील आणखी काही फोटो शेवटच्या पानावर बघा.

# युरोपायन – रिता जोहरापूरकर

✉ rita.joharapurkar@gmail.com

*युरोपायन: भाग १ - आदमी मुसाफिर है*

**यु**रोप प्रवासाच्या निमीत्ताने बऱ्याच जणांशी संपर्क आला. त्यामुळे संवाद साधला गेला आणि अनेकांशी मैत्रीची नाळ जोडल्या गेली. माणूस हा प्रेमाचा, सहवासाचा भुकेला असतो. ह्या संपूर्ण प्रवासादरम्यान सर्वांनी ऐकमेकांना दिलेल प्रेम, साहचर्य हवहवसं वाटणारं होतच, शिवाय अनेक अंगांनी शिकवणांर देखील होतं हे मनापासून सांगावस वाटतं. नंदाताईकडून शांतपणे व ठामपणे आपला मुद्दा कसा पटवून द्यावा, तर मीलनकडून कुणालाही न दुखावता कसे हँडल करावे हे शिकले. तर न कंटाळता वायफायसाठी मदत करणाऱ्या विद्याली व पायलमुळे मी घरच्यांशी बोलू शकले व मुलगी नसल्याची उणीव भासली नाही. अशाच थायलंड टूरमधे भेटलेल्या मंजीरी, जाज्वल्या, अपर्णा यांची आठवण झाली. मंजीरी तर रोज सकाळी नित्य तीचा काव्याचा झरा घेऊन भेटते. तसेच नावाप्रमाणेच शिलवंत लेखिका, प्रत्येकाची टर उडवून निखळ हास्याची कारंजी उडवणाऱ्या दिपाली व अश्विनी ह्या बहिणी, मैत्रीण, बहीण, नणंद, वहिनी अशा अनेक नात्यांचा संगम होऊन आलेल्या देसाईताई, तीन पिढ्यांचा एकत्र कुटुंबाचा आदर्श असणारी तांडेल फँमीली तर वयाच्या पंच्चाहत्तरीतही पीकल्या पानाचा देठ ही कसा हिरवागार ठेवता येतो हे प्रतीभा आजीकडे बघून कळले.

प्रथम मला वाटलं होत की युरोप टूर म्हणजे सगळ्या हाय फाय संस्कृतीवाल्या असतील. आपले कसे होणार? पण सुरवातीला सगळ्या आनंदी आणि कुठलीच समस्या नसणाऱ्या वाटत असल्या तरी प्रत्येकीच्या आयुष्याला एक दुखा:ची किनार होती. हे त्या जसजशा स्वतःला उलगडत गेल्या तेव्हा समजलं.

कुणाचे जोडीदार अचानक अर्ध्यावरच डाव सोडून गेले होते, तर कुणी सिंगल, तर काहीजणी अगदी शून्यातून उभ्या राहिल्या होत्या. अशा सर्व सामान्यच तरी आपापल्या क्षेत्रात स्वकर्तुत्वाने असामान्यच होत्या. जीवनाचा बोध होण्यास या छोट्या छोट्या गोष्टी कारणीभूत ठरतात. तरीही त्या हरवलेल्या स्वरांसाठी मनात एक हळवा कोपरा ठेवून काही दिवसांसाठी ते सगळं विसरून नवे गीत गाण्यासाठी आल्या होत्या. खरचं एकदम कुणाबद्दल लगेच मत ठरवू नये याचा धडा मी शिकले. अशा कितीतरी आठवणींचा एक कप्पा मी मनात जपून ठेवलाय. त्यामुळे हव्या तेव्हा मारता येतात दूर गेलेल्यांशी गप्पा.
शेवटी काय. आदमी मुसार्फिर है, आता है जाता है, आते जाते रस्ते में यादे छोड जाता है।
दिल भूल जाता है जब किसीको, वो भूलकर भी याद आता है. तूर्त अलविदा!

*युरोपायन: भाग २- शेतकरी आम्ही आणि ते*

युरोप बघताना रस्त्यात चित्रात रेखाटल्याप्रमाणे अनेक आखीव रेखीव शेती बघण्यात आल्या. शेतीची आवड असल्याने मिळेल तेवढी तीथल्या शेतीची व शेतकऱ्यांची माहिती घेतली तेव्हा अनेक गोष्टी कळल्या. प्रथम तेथील सरकार जमीन किती व कशी आहे याची पाहणी करते. मग त्यानुसार त्या जमीनीला अनुकूल असे बियाणे देते. त्याच बरोबर पेरणीपासून तर पीक येईपर्यंत शेतकऱ्यांना शेतातच राहणे बंधनकारक आहे. त्यामुळे प्रत्येक शेतात टुमदार घरे आहेत. याचा फायदा असा होतो की चोवीस तास फक्त शेतीकडेच लक्ष दिल्यामुळे व यांत्रिकीकरणामुळे शेतीचा व पीकाचा दर्जा उत्तम राहतो. चोर चिलटे, जंगली श्वापदापासून पीकाचे सरंक्षण होते. पीक तयार झाले की सरकारची माणसे त्याची पाहणी करतात व त्याच्या दर्जानुसार त्यांना भाव देतात. इतका सरळ साधा पारदर्शक मामला! थोडक्यात एखाद्या उद्योगपतीएवढाच मान शेतकऱ्यांना असतो!

पशूपालनातही त्यांची शिस्त, स्वच्छता वाखाणण्याजोगी आहे. प्रत्येक शेतकऱ्याला एक नंबर दिला जातो, तो त्याने जनावरांच्या गळयात अथवा कानाच्या पाळीजवळ लावायचा असतो. त्यांना ठरवून दिलेल्या परिसरातच जनावरे चरतात. याव्यतिरिक्त जर जनावरे रस्त्यावर आली वा मोकाट सुटलेली दिसली तर सरकार त्या जनावरांचा नंबर बघून त्या शेतकऱ्यांना जबरदस्त दंड ठोठावते. त्यामुळे कुठेही रस्त्यावर मोकाट जनावरे वा त्यांचे मलमूत्र पडलेले दिसत नाही.

या उलट आम्ही! आरामात उठणार, चूळ भरणार, चहा होईपर्यंत शेजारी गावगप्पा, मग नाष्टापाणी, बीडीतंबाखू करून आरामात दहावाजेपर्यंत शेतात जाणार (अपवाद वगळून) मग
पाच वाजले की घरी परतणार. त्यात पारंपारिक पद्धतीमुळे व अज्ञानामुळे यांत्रिकीकरणाचा अभाव आणि आणले तरी अनेक छोट्या छोट्या तुकड्यात विखुरलेली शेती, सहकाऱ्याचा अभाव, धुऱ्यांचे, भाऊबंदकीचे वाद! यामुळे न परवडणारा खर्च, वेळ वाया जाणे! शेतात वास्तव्य नसल्याने शेतीसाठी वेळ कमी, तसेच चोर चिलटे व जनावरांमुळ मालाचे होणारे नुकसान. हे लिहित असतांनाच गावाकडून माणसाचा फोन आला की शेतातील वायर, पाईप चोरीला गेला. मागील वर्षी विहिरीतील मोटर चोरी गेली. तसेच आधुनिक तंत्रज्ञान व प्रशिक्षण यांच्या अभावामुळे मालाचा निकृष्ट दर्जा! तरीही सर्व मदत सरकारनेच करावी ही अपेक्षा!!

पाळीव प्राण्यांच्या बाबतीतही निष्काळजीपणा तर विचारता सोय नाही. 'सब भूमी गोपालकी' या उक्तीप्रमाणे चोफेर मोकाट सोडलेली अस्वच्छ जनावरे. अर्थात काही थोडेसे अपवाद असतात. काही प्रमाणात पश्चिम महाराष्ट्र व केरळकडे सुधारित शेती व शेतातच राहणारे शेतकरी दिसतात. पण स्वतःला दुष्काळी म्हणवणाऱ्या विदर्भात अजून ही मानसिकता रुजली नाही. पण मला खात्री नाही तर विश्वास आहे की आपला शेतकरी

गावातील त्या अस्वच्छ, दहा बाय दहाच्या कोंदट, अंधाऱ्या खोलीत न राहता शेतीतच राहिला तर नक्कीच त्याच्या उत्पनात व आरोग्यातही फरक पडेल. अस्मानी संकटे तर सगळीकडेच आहेच पण इस्रायलने त्यावर मात केलीच की! गरज आहे फक्त निर्धाराची! शेवटी आपल्याच घरातील एखादी व्यक्ती चुकत असेल तर तो कुठे चुकत आहे हे दाखवून त्याला योग्य मार्ग दाखवणे व 'बुडती हे जन न देखे डोळा'
हाच लिहिण्याचा हेतू! कुणी गैरसमज करू नये! ओम् शांती.

*युरोपायन: भाग ३ - तारीफ करु क्या उसकी?*

युरोपमधील लक्झरी बसमधून प्रवास करत असतांना बसचा प्रवास इतका आनंददायी व आरामशीर असू शकतो याची मी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. असे वाटायचे कारण ही तसेच होते कारण दर महिण्याला मी आपल्याकडील लक्झरीने प्रवास करते तेव्हा दुसऱ्या दिवशी हाडे पार खिळखिळी झाली असतात.

पण लंडन ते इटलीपर्यंत ह्या संपूर्ण प्रवासात शंभरच्या स्पीडने बस धावत असतांनाही विमानात बसल्या सारखे वाटत होते. कुठे हेलकावे नाही की उसळणे नाही. अंगी फोटोग्राफिचे कौशल्य नसूनही धावत्या बसमधूनही काढलेले फोटो इतके सुंदर आले ते त्या बसच्या रचनेमुळेच. पारदर्शक स्वच्छ काचेच्या खिडक्या त्यामुळे बाहेरचे संपूर्ण दृश्य दिसते.

आपल्याकडे जेवढे मागे बसू तेवढा त्रास जास्त. पण इथे उलटेच! एकतर कुठेही बसा सारखाच फिल येतो. मागे तर जास्त मजा येते. कारण मागील सीट थोडी उंच असते. त्यामुळे समोरचे व डाव्या, उजव्या अशा दोन्ही बाजूचे निसर्ग सौंदर्य मनसोक्त न्याहाळता येते. निर्जीव वस्तूपण तुमच्याशी बोलत असतात. आपल्यालाच त्यांना वाचता आलं पाहिजे!
म्हणूनच जेव्हा शेवटचे तीने इटलीच्या विमानतळा जवळ सोडले तेव्हा मी गेटच्या आत जाईपर्यंत 'कन्या सासूरासी जाये, मागे परतोनी पाहे' ह्या भावनेने तीच्याकडे पाहता पाहता मनात म्हणत होते: ' तारीफ करु क्या उसकी, जीसने तुम्हे बनाया ' अलविदा.

*युरोपायन: भाग ४ - देशाभिमानी क्लारा*

लंडनच्या प्रसिद्ध स्थळांची माहिती'अवघे पाऊण शे'वयोमान असणाऱ्या व सदाबहार दिसणारी क्लारा (तेथील गाईड) समरसून देत होती. अवघे पाऊणशे वयमान म्हणन्याचे कारण म्हणजे वयाची साधी पन्नाशी ओलांडली की आमचे नेत्र पैलतीर बघायला लागतात (अपवाद वगळता), आता आपल काय राहिले, लोक काय म्हणतील इत्यादी अनेक गोष्टींचा बाऊ करुन आपणच आपल्याला झाकोळून टाकतो. आज जगातील बलाढ्य देशांच्या

तुलनेत भारतात सर्वात जास्त तरुण आहेत. पण आपल्यात सामर्थ्य, उत्साह, नाविन्य, धाडस, कल्पकता हे गुण फारसे दिसत नाही. अजूनही आपण रुढीवादी, आत्ममग्न असेच आहोत.

संसाराच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या, मुल बाळं मार्गी लागलीत असे म्हणून आपण निवृत्ती घेतो. पण इथे फक्त क्लाराच नाही तर तिच्या सारख्या साठी उलटलेल्या, चैतन्याने रसरसलेल्या अनेक ललना गाईड म्हणून वावरताना दिसल्या. खरंच आहे, मनात तीव्र इच्छा शक्ती असेल आणि त्याला अथक, मनापासून प्रयत्नांची जोड मीळाली तर एखादे अवघड वाटणारे कामही आनंदाने करता येते. याचे सुंदर उदाहरण म्हणजे क्लारा!

चॉकलेट फँक्टरी असो, सायन्स म्युझियम, ब्रिटिश लायब्ररी असो किंवा राजप्रासाद वा राष्ट्रीय स्मारक असो सगळयांची माहिती जणू पहिल्यांदाच सांगत आहे असे वाटावे इतक्या उत्साहाने सांगत होती आणि हे सांगतांना त्या सगळयांन बद्दल असलेला तिचा जाज्वल्य देशाभिमान सतत जागृत होता.

त्यासरशी मला आठवली ती आपली उथळ व बेगडी देशभक्ती. स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी कार्यक्रम झाल्यावर पायदळी पडणारे असंख्य तिरंगी झेंडे. राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहायचे की नाही याचा वाद, अनेक ऐतिहासिक वास्तूंचा केलेला आणि करत असलेला विध्वंस! कानाने जरी ती सांगत असलेली माहिती ऐकत व डोळयाने तिचे निरीक्षण करत असले तरी डोक्यात अनेक विचारांचा कल्लोळ माजला होता. ती ज्या अभिमानाने लंडनचे वैभव दाखवीत होती. (त्यात कोहिनूर व बाकी भारतातून आणलेल्या गोष्टींचा उल्लेख नव्हता) ते पाहून का कुणास ठाऊक सारखे मनात येत होतं, " ज्या वैभवाचा समृद्धीचा तुम्हाला अभिमान आहे गर्व आहे, ते खरं तर आमच होतं. आमच्या जीवावर तुम्ही येवढी समृद्धी उपभभोगताय!" माझाही स्वाभिमान उफाळून आलाच व मी बोलून गेलेच!!"
Where is the kohinoor Diamond? Where are the king shivaji's Throne and his sword? And where are all things of my India?

आणि ते ऐकून एकच क्षण का होईना ती हडबडली. लगेच सावरुन आठवल्यासारखे करून कोहिनूर कुठे आहे ते सांगितले व शिताफीने तेथून निसटली. बाकी काही असो. आपल्या वयाचा बाऊ न करता एखाद्या खळाळत्या झऱ्यासारखी भासली मला क्लारा. तिच्याकडे बघून वाटले आयुष्य समरसून जगता आले पाहिजे. ती कला आत्मसात झाली की अनेक दु:खद प्रसंगाच्या आठवणी अंगावर येत नाही. पानगळीतही मनात सुखद क्षणांना लगडलेला वसंत उधाणत असतो. रीतरंजन.

*युरोपायन: भाग ५- केल्याने होत आहे रे*

काही दिवसांपूर्वी सोशल मीडिया, टि. व्ही. चँनेलवर शेतकरी संपाच्या नांवाखाली दूध, भाजीपाला यांची जी नासाडी चाललीय ते बघून मन विषन्न झाले आणि एकदम आठवलं आमच्या टूर मॅनेजरने स्विझरलँडची संस्कृती, तेथील लोकांची मानसिकता सांगत असतांना जेव्हा तेथे दुधाचे उत्पादन जास्त झाले तेव्हा तेथील सुबुद्ध नागरिकांनी त्यावर समजूतदारपणे स्वतःच्या हुषारीने कसा मार्ग काढला ते पण सांगितले.

अर्थशास्त्राच्या नियमाप्रमाणे मागणी जास्त उत्पादन कमी व उत्पादन जास्त मागणी कमी. अशी परिस्थिती दुधाच्या बाबतीत जेव्हा निर्माण झाली तेव्हा, दूध हे तर नाशवंत पदार्थ त्याचा साठाही करता येत नाही, उत्पादन जास्त झाल्यामुळे भाव पण नाही, जनावरांचा खर्च पण नीघणे मुश्कील, म्हणून त्यांनी रस्त्यावर दूध ओतून समाजाला, देशाला वेठीस धरले नाही. पऱ्यावरण व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणले नाही. तर स्वत:ची बुद्धी वापरून त्यापासून वेगवेगळया स्वादाचे चीज, चाँकलेट घरोघरी बनविणे सुरु केले. क्वांटिटी, क्वालिटी आणि आकर्षक पँकींगमुळे आज त्यांचे हे पदार्थ हजारो रुपये खर्चून सगळं जग खरेदी करतय!

प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टींची उत्तम सजावट उत्तम सादरीकरण करून त्याची जाहिरात कशी करावी ह्याच अजून एक उदाहरण म्हणजे त्यांची जगप्रसिद्ध 'काऊ बेल'. आपण रोज देवासमोर वाजवतो तशी छोटी घंटी आकर्षक सजावट करून हजार बाराशे रुपयाला विकतात आणि पर्यटक ती भेट देण्यासाठी म्हणून पाच दहा पीस घेतात.

पुढे जाऊन हे पण कळले की त्यांच्या गाईच्या दुधापेक्षा आपल्या गाईचे दुध व वेळू हे अधिक उत्तम दर्जाचे असतात. त्यासाठी आपला वेळू व त्यांच्या गाईपासून एक वेगळीच संकरीत जात निर्माण करण्यासाठी ते आपल्या केंद्र सरकारशी चर्चा करणार आहेत.

आणि आम्ही काय करतोय? जीला 'गोमाता' म्हणतो, जिच्या जगण्यामारण्याच्या वादातून माणसांच्याच जीवावर उठतो आज तीचेच दुभते हजारो लाखो मुले कुपोषित, उपाशीपोटी असताना रस्त्यावर ओतून सर्व जगासमोर ओंगळवाणे प्रदर्शन करतोय. ह्याचे परिणाम भंयकर आहेत. आपला भविष्यकाळ, आरोग्य, समृद्धी, स्वातंत्र्य सारं काही धोक्यात येत आहे.

आपण जर खोलात जाऊन विचार केला तर हे लक्षात येईल की ह्या राडा संस्कृतीमुळे व समाजव्यवस्थेमुळे जो धोका निर्माण होत आहे ती संस्कृती व व्यवस्था किती कचकड्याची व कमकुवत आहे.

कुठलेही संप, आंदोलने करतांना त्या प्रश्नांचा गांभीऱ्याने विचार केला व त्यावर सकारात्मक उत्तरे शोधली तर त्या आंदोलनाला काही उचित व चांगला अर्थ लाभेल. अन्यथा संपाच्या नावाखाली साजऱ्या होणाऱ्या राडा संस्कृतीमुळे, बेशिस्त झुंडशाहीमुळे पऱ्यावरणाची समाजाची व सर्वार्थाने देशाची जी हानी होतेय, तो मार्ग फरत आपल्याला पारतंत्र्याकडे घेऊन जात आहे हे निश्चित समजा आणि बलवंतांच्या बलदंड मेळाव्यात कोणत्याही दुर्बल, असहाय माणसांची, देशांची खरेदी विक्री करणाऱ्या धनवंतांच्या, राजकारणाच्या मंडईत आपल्या सारखे सामान्यच भरडले जातात हे इतिहासपण सांगतो.

सब चाहते है मंजील पाना, लेकीन चले बिगर। जन्नत भी सबको चाहिए, लेकीन मरे बिगर।
ही धारणा आम्हाला बदलावीच लागेल. ओम् शांती.

*युरोपायन: भाग ६- कॅबरे शो ऑफ पॅरिस.*

पॅरिस मधे आपल्याला काय काय बघायचे आहे त्याची माहिती आमचा टूर मॅनेजर आम्हाला देत होता. शेवटी म्हणाला इथला ‘PARA DIS LATIN’ म्हणून एक कॅबरे शो प्रसिद्ध आहे. कॅबरे नाव ऐकल्याबरोबर हे काय भलतच काहीतरी म्हणून अनपेक्षितपणे आम्ही संकोचून एकमेकींकडे पाहू लागलो.

आमच्या मनातील भाव ओळखून तो पुढे म्हणाला हा तुमचा ऐच्छिक प्रश्न आहे. पण मी ऐवढेच म्हणेन कुठलाही पूर्वग्रह मनात ठेवून नेहमीच त्याच नजरेने एखाद्या गोष्टीकडे बघू नये. तर एक कला म्हणून बघा असे म्हणून त्याने निर्णय आमच्या वर सोपवला आणि म्हणाला ज्यांना कुणाला जायचे असेल त्यांनी आठ वाजता खाली कँराडोर मधे जमावे. रात्रीचं रात्री बघू म्हणून आम्ही पण दुसऱ्या विषयाकडे वळलो.

जसे रात्रीचे आठ वाजले तसे बघूया तर खरं काय असतं असा विचार करुन आम्ही खाली आलो. बघतो तर काय सतरा वर्षापासून ते पंच्याहत्तर वयाच्या आजीपर्यंत सगळयाच्या सगळया त्रेचाळीस जणी तयार होऊन आल्या होत्या. ते पाहून आमचचं आम्हाला खूप हसू आले. त्याच मुडमधे कधी हॉटेल आले कळलेच नाही. काहीशा संकोचानेच आम्ही आत गेलो. एखाद्या बॉलीवूडमधे असतो तसा देखणा हॉल. सुंदर झुंबरांची सजावट, टेबलांची आकर्षक मांडणी, त्यावर कोल्ड्रिंक्स पासून वाईन पर्यंत ज्याला जे हवे ते सर्व्ह केल्या जात होत जोडीला म्युझिक असा सर्व थाट होता.

थोड्याच वेळात लाईट ऑफ झाले व शो ला सुरुवात झाली. एकाहून एक सुंदर अप्सरा आपली कला सादर करीत होत्या आणि आपल्या इकडच्या कॅबरेतला आणि तिथल्या कॅबरेतला फरक आम्हाला जाणवत होता. संपूर्ण

विवस्त्र असूनही कुठेही त्या वल्गर (Vulger) वाटत नव्हत्या ना त्यांचे नृत्य अश्लील वाटले ना त्यांचे हावभाव! त्यांना पाहून कुणीही शीट्या वाजवीत नव्हते ना अश्लील शेरेबाजी करीत होतं. 'न्यूड'नंतर दुसऱ्यांदा मी इतक्या मोकळेपणाने कुठेच खाली मान न घालता व एक दुसऱ्यापासून नजर न चोरता स्वच्छ पणे हा शो पाहत होते.

“ आपणच घालतो आपल्या भोवती, अनेक बंधनाचे कुंपण, कधी करावी सैल बेडी, अनुभवावे स्वप्नांचे स्पंदन!”

असे मनाला बजावत रात्रीचे रंगीन पॅरिस पाहण्यासाठी हॉलमधून बाहेर पडलो. मुळातच सुंदर असलेले पॅरिस रात्री सप्तरंगात नाहून निघाले होते. आयफेल टॉवर तर लाईटिंगमुळे अधिकच सुंदर दिसत होता. शंभर वर्ष जुनी रस्त्यातील स्ट्रीट लाईटस ज्या पद्धतीने अजूनही जतन केले आहेत ते ही रस्त्याच्या सौंदऱ्यात भर घालीत होते. त्यावरून अनेक जोडपी हातात हात घालून मुक्तपणे विहरत होती. प्रत्येक जण आपापल्या विश्वात मग्न होते.

हे सगळं बघतांना मला आपल्या व त्यांच्या मानसीकतेतला एक मोठा फरक जाणवला. तो म्हणजे तिथे सगळ्या गोष्टीत मोकळेपणा असूनही आपल्याकडे दिसतात तसे पावलागणिक आंबटशोकी टवाळखोर नव्हते. एकट्या तरुण मुलीही मुक्तपणे फिरत होत्या. पुरुषांच जाऊ दे, मुळातच तो एक चंचल भ्रमर असतो. पण मी एक 'स्त्री' असूनही अधून मधून त्यांच्याकडे एक चोरटा कटाक्ष टाकून त्यांचे निरीक्षण करत होते. याचं कारण जन्मापासूनच आपल्या समाजात, आपल्या मनात काही धारणा खोलवर रुजल्या असतात. म्हणूनच तर अगदी वर्ष दोन वर्षाच्या अबोध, लहान निरागस मुलं जेव्हा संपूर्ण दिंगबर अवस्थेत असतात आणि अशावेळेस जर घरी कुणी आले तर आपण चटकन त्याला/तीला म्हणतो चल लवकर कपडे घाल, नाहीतर शेम शेम म्हणतील, असं म्हणून लहानपणीच एखाद्या अवयवाबद्धल त्याच्या मनात बागुलबुवा उभा करतो आणि काही कारणाने त्या धारणांना धक्का बसला की समाजात, घरादारात, आपल्यात अवस्थता पसरते. खरंच कितीतरी गोष्टींचे अनावश्यक ओझे तनामनावर घेऊन आपण जन्मभर वावरत असतो हे अनेक प्रसंगात दिसतं.

ज्या वेळेस दुसऱ्या विमानासाठी दोन तीन तासासाठी दुबई एअरपोर्ट्वर आमचा मुक्काम होता. त्यावेळेस मी पाहिले की दोघीतीघी आया आपल्या लहान मुलांना कुठल्याही संकोचाविना स्तनपान करीत होत्या. ना त्यांच्याकडे कुणी बघत होते ना त्या मायलेकराना याचा गंध होता. ते दृश्य पाहून मला ह्या नैसर्गिक गोष्टीसाठी ही आपल्याकडे अनेक आयांची होणारी कुंचबणा आठवली. एकत्र कुटुंब असो वा सार्वजनिक ठिकाणं वा समारंभ कार्यक्रमाच्या ठिकाणी बाळ भुकेने कितीही रडत असो, योग्य आडोसा मिळाल्याशिवाय ती मोकळेपणाने स्तनपान देखील करु शकत नाही. कायम कुणी येईल का, कुणी पाहिल का नाना धास्तीनेच उरकावे लागतं!!

अर्थात त्यांच्या आणि आपल्या संस्कृतीत, परिस्थितीत जमीन आसमानचा फरक आहे. तिकडच्या वातावरणामुळे त्यांच्या शरीराला महिनोन्महिने सूर्यप्रकाश व मोकळा वारा मिळत नाही. त्यामुळे त्यांची त्वचा फार सेंन्सेटीव्ह झालेली असते. अशावेळेस जेव्हा सूर्य उगवतो ते दिवस त्यांच्यासाठी एखाद्या उत्सवासारखे असतात. म्हणून त्याचा उपभोग घेण्यासाठी ते सारेजण ह्या काळात बाहेर पडतात. त्यामुळे कपडेही कमीतकमी असतात की ज्यामुळे शरीराला जास्तीत जास्त सुर्यप्रकाश व ताजी हवा मीळेल. त्यामुळे त्याचं ते कल्चर आहे म्हणून ते वावगं वाटत नाही. त्यात एक सहजपणा वाटतो.

या उलट आपल्याकडे वेगवेगळया राज्यातले वेगवेगळे वातावरण, अठरा पगड जाती, त्यानुसार प्रत्येकाची संस्कृती, भाषा, वेष साऱ्यातच वेगळेपण! धारणाही अलग अलग. म्हणूनच आपण जेव्हा अनाठायी त्याचं अनुकरण करायला जातो तेव्हा ते नैसर्गिक न वाटता स्वतःच्या देहाच प्रदर्शन केल्यासारखे वाटते. त्यातच तळागाळातील प्रत्येक समाजाची लोकांची मानसिकता वेगवेगळी. तीला आपण सध्यातरी बदलवू शकत नाही. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्य, कसे, कोणते, कुठे आणि कशासाठी याचा विचार होणे गरजेचे आहे. तरच आपण खऱ्या अर्थाने एक व्यक्ती म्हणून मोकळेपणाने जगू शकू!

म्हणोत कोणी या जगण्याला नश्वर वा खोटे, सूर भावला ज्याला, त्याला परमेश्वर भेटे.
असोत कितीही खेद खंती वा शल्याचे पूर, त्या सर्वांचे सार्थक, एकच निखळ मुक्त सूर
आसवात तु सूर भिजवूनी, स्वरात ओल्या गा, गाणे गा रे! रीतरंजन.

*युरोपायन: भाग ७- जखमी सिंह*

जेव्हा कुणावर बेसावध असतांना हल्ला करुन त्यांना मारले जाते तेव्हा त्या हल्याला आपण भेकडपणाचे कृत्य, भ्याड हल्ला किंवा पाठीत खंजीर खुपसणे म्हणतोआणि जगात असे हल्ले आधीही झाले व आताही होतात.

असाच भ्याड हल्ला स्विझरलँडच्या शूर सैनिकांवर ते बेसावध असतांना झाला. त्यात त्यांचे अनेक लोक व सैनिक मारल्या गेले. त्याचं शल्य त्यांच्या जिव्हारी लागलं. त्याची आठवण व प्रतीक म्हणून ल्युसर्न शहरात हे जखमी सिंहाचं स्मारक आहे. बारकाईने पाहिल्यावरही त्यातला अजून एक संदेश आमच्या लक्षात नाही आला. पण जेव्हा आमच्या टूर मॅनेजरने सांगितले की, " तो एक उत्तम गाईड पण आहे. लक्षपूर्वक बघा त्या सिंहाच्या वर जो काळा आकार दिसतोय त्याचा आकार डुकरासारखा आहे आणि युरोपियन लोकांमध्ये हा शब्द शिवी

समजला जातो!" म्हणजेच तो जखमी सिंह म्हणजे त्यांचे शूर सैनिक व तो आकार म्हणजे बेसावध असतांना पाठीत खंजीर खूपसणारे भ्याड शत्रू!

प्रत्येक कलाकृती तिच्याही नकळत काही संदेश देत असते. तो संदेश ती भूमिका म्हणजे आपल्याला उपदेश नसतो की बोधही नसतो. तो प्रचारही नसतो तर आपले माणूसपण व माणूसकी अधोरेखित करणारे अमोलिक अशी मुल्यात्मक स्वरुपाची जाण असते. हेच कार्य शिल्पकार घटना, प्रसंग, संवेदना हे सारे त्या शिल्पात ओतून नकळतपणे त्यात एक जाणिवेचे बीज पेरतो.

अशी 'स्मारकं' समाज शुद्धीकरणाचेही काम करीत असतात. त्यातून संस्कृती विकृती पासून वेगळी होते आणि हाच संदर्भ पकडून ज्या छोट्या छोट्या देशांनी आपापल्या वेगळया चुली मांडल्या होत्या त्यांना आता कळून चुकले की सामर्थ्यवानाच्या शांततेलाच अर्थ असतो. म्हणून ती छोटी छोटी राष्ट्र एकत्र आली व ठरविले की आपण जरी स्वतंत्र असलो तरी आपले चलन एकच राहील व एकमेकांच्या देशात येण्यासाठी कुणाला सीमा बंदी नसेल. थोडक्यात अपयश माणसाला शहाणे बनवते. पुन्हा उभे राहण्याची ताकद देते व आपला पाया भक्कम करण्यास मदत करत. खरचं अपयशानं माणूस जे काही शिकतो ते यश मिळविल्यानंतरही कामी येतं. कदाचित हाच संदेश द्यायचा असेल! ओम् शांती.

*युरोपायन: भाग ८- अखंड उर्जेचा प्रवाह (जॉय ऑफ युरोप)*

युरोप मधील प्रवास सुखकर व आनंददायी करणाऱ्या अनेक व्यक्तींपैकी लक्षात राहणारी व्यक्ती म्हणजे बसचा कोच कॅप्टन! म्हणजेच आपलाकडचा ड्रायव्हर! तिकडे त्याला "ए ड्रायव्हर" म्हणून संबोधणार नाही, तर कॅप्टन म्हणून सन्मानपूर्वक वागणूक देतात!

असा हा जॉय नावाप्रमाणेच सतत आनंदी हसतमुख व अखंड उर्जेचा स्त्रोत असणारा. आम्ही बसमधून केव्हाही चढत उतरत असतांना गुड मार्निंग, गुड आफ्टरनुन, हॅव अ नाईस डे असं त्या त्या वेळेप्रमाणे शुभेच्छा देणारा! या उलट आपण माणसं अगदी सहजपणे जात, धर्म, रंग, रुप, आर्थिकता इत्यादी प्रकाराने समाजाला विभागतो. त्यापेक्षा कालानुरूप दिलेल्या अशा शुभेच्छा अखंड उर्जेचा स्त्रोत घेऊन, चेतना बनून शरीरात जीवनरस ओततात. त्यामुळे आपल्या वाटेला आलेला प्रत्येक क्षण खऱ्या अर्थाने व आनंदाने जगायला शिकवतो. व्यक्तिगत संवेदना, आनंद सामाजिक सार्वत्रिक होत जातात. त्यामुळे सतत आनंदी राहण्याचा मार्ग सापडतो.

ह्या न्यायाने आमच्या त्रेचाळीस जणींच्या जवळजवळ ऐंशी नव्वद बॅगा तो एकटाच रोज सकाळी डिक्कित ठेवणार व रात्री काढणार, ते ही व्यवस्थितच! कुठेही कशाही न फेकता लाईन मधे ठेवणार!

अशावेळेस आम्हालाच लाज वाटून त्याला आम्ही “कॅन आय हेल्प यू?” म्हणत असू तेव्हा नम्रपणे (लाचारीने नव्हे) नकार देऊन हसून “नो प्राब्लेम” म्हणतं असे. अशावेळी मला आपल्याकडचा शिवनेरी बसचा प्रसंग आठवला. एकदा पुणे नासिक प्रवास करीत असताना बसमध्ये दोन तीन वयस्कर बायामाणसं होती. नासिकला गाडी थांबल्यावर त्यांना स्वतःच डिक्की उघडून त्यांच्या बॅगा काढाव्या लागल्या. गाडीत कंडक्टर असूनही कुठलीही मदत न करता निघून गेला. त्यातच आमच्या भारतीयांची अवजड सामानाच्या बाबतीत जी मानसिकता आहे ती टूर कंपन्यांनी कितीही सोय केली तरी बदलायला तयार नाही. काही तुरळक अपवाद वगळता प्रत्येकीच्या दोन दोन अवजड बॅगा, हॅंडबॅग वेगळयाच! याउलट तेथील लोकांच्या बॅगा एखादा लहान मुलगाही ओढू शकेल इतक्या छोट्या असतात.

वेळ पाळण्याच्या बाबतीतही हे लोक एकदम कडक शिस्तीचे! जी वेळ ठरली असेल त्याच वेळेस हजर! एक मिनिटही मागेपुढे नाही की विडी तंबाखू खात टाईमपास नाही. माझ्या पाठीवर व बॅंगवर शाकाहाराच्या समर्थनार्थ लावलेले बॅनर बघून एकदिवस तो आमच्या टेबलकडे उत्सुकतेने आम्ही काय जेवतो हे बघण्यास व जेवण्यासाठी आला. मी केलेली वड्याची भाजी व पालक पुरीचा स्वाद त्याने आवडीने घेतला व प्रामाणिकपणे कौतुक ही केले.

कुणीतरी म्हटलंय, “ये दुनिया ताकद से नही, रंगो से नही, मोहब्बत से चलती है!”
खरचं आहे ते: अवघे विश्वची माझे घर. ओम् शांती.

*युरोपायन : भाग ९- आहे मनोहर तरी.*

युरोपायनच्या या लेखमालेतून लंडन ते इटली या आठ, दहा देशांचे धावते वर्णन करतांना आलेले अनुभव आणि त्याचे मनात उमटलेले पडसाद मांडले. वरवर जरी ते बघायला व ऐकायला मनोहर वाटत असले तरी म्हणतात ना नाण्याला दोन बाजू असतात. त्याप्रमाणे ह्या देशांची दुसरी बाजू काही वेगळचं सांगत होती.

लंडन बघत असताना एकीकडे डोळयात कौतुक व कुतूहल दाटत होते तर दुसरीकडे विचारचक्र चालू होते, हे सार साम्राज्य दुसऱ्याला लुटून उभं केलय यांनी व काही अंशी का होईना वर्णभेदही आहे. आपल्या देशातही उत्तुंग इमारती आहेत, आकाशाशी स्पर्धा करणारे गिरीशिखरे आहेत, दुर्गम गड किल्ले आहेत, तरीसुद्धा आपण पर्यटन क्षेत्रात ही इतके मागे का? तर निसर्गानेच आपल्याला दोन्ही हाताने भरभरून फुकट दिल्यामुळे आपल्याला त्याचे मोल नाही?

चोवीस तास स्वर्गीय सुखाच्या रंगीन दुनियेत डुबलेले पॅरिस बघताना जाणवले, विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या साहाय्याने सुखोपभोगांची मुबलक साधने यांना प्राप्त झाली आहे. त्यामुळे पैसा कमवणे आणि सुखोपभोगांसाठी त्याची उधळपट्टी करणे हाच बहुतांश लोकांचा एककलमी कार्यक्रम असावा असे वाटते. त्यामुळे अशा या अनिर्बंध जीवनशैलीमुळे स्पर्धा, संघर्ष, मानसिक तणाव, असुरक्षितता, परस्परांविषयी अविश्वास या गोष्टींनी त्यांचे जीवन सैरभैर होत आहे. त्याचमुळे कदाचित तेरा चोदा वर्षाची मुलांची हिंसक होऊन पिस्तुलाने अनेकांचे प्राण घेण्यापर्यंत मजल जात आहे. त्यातच आता निर्वासितांच्या लोंढ्यामुळे तेथेही चोऱ्यामाऱ्या गुन्हेगारी वाढली आहे.

स्विझरलँडचे माऊंट टिटलीस पाहतानाआपल्या कडील सोनमर्ग, लडाख, दार्जिलिंगची हिमशिखरे आठवली. जरी स्विझरलँडला पृथ्वीवरचा स्वर्ग म्हणून ओळखले जात असले तरी त्यातही आपल्या भारतीयांचाच मोठा वाटा आहे कारण परकियांच्या आश्रयाने स्वकीयांनाच लुटण्याचा सोपा मार्ग स्वतःला संस्कृती रक्षक, समाज रक्षक म्हणवणाऱ्यांनी स्विकारला व अरबो खरब संपत्ती त्यांच्या बँकेत ठेवली आहे आणि जेव्हा त्यांचे अकस्मात निधन होते तेव्हा पुराव्या अभावी कितीतरी अब्जो रुपये तसेच पडून राहतात व कालांतराने त्याच पैशातून त्याच पैशातून त्यांनी त्यांच्या देशाचा स्वर्ग भासावा असा विकास केला. म्हणून तर सिनेमाच्या शुटिंग द्वारेही आपण त्यांना प्रसिद्धी मीळवून दिली.

थोड्याफार फरकाने सर्व युरोपमधील देशांची कहाणी सारखीच आहे. त्यांच्या पूर्वजांनी जे बक्कळ कमवून ठेवले व जो वारसा जतन करून ठेवलाय त्यावरच ही राष्ट्रे ऐशोआराम भोगत आहेत. थोडक्यात आपल्याकडील लाडावलेल्या बाळासारखी ही राष्ट्रे आहेत. सिंगापूर, दुबईशी तुलना करता गेल्या वीस पंचवीस वर्षात यांनी एकही नवीन शोध लावला नाही. आहे त्या विरासतीची उधळपट्टी चालू आहे. त्यामुळे त्यांनाही बेकारीची समस्या भेडसावत आहे.

इटलीच्या एकदिवसीय वास्तव्यात तेथील वास्तू पाहतांना अचंबित व्हायला होतं. आमचा टूर मॅनेजर सांगत होता हा देश इतका मोठा आहे की तो सर्व पाहण्यासाठी एक महिना ही कमी पडेल. तेवढं एक सोडले तर तो भारताचाच भाऊ शोभावा असा आहे कारण तेथेही प्रत्येक गोष्टीत भ्रष्टाचार आहे, बेशिस्तपणा आहे. याची थोडी जाणीव त्या देशात प्रवेश करतांनाच होते कारण संपूर्ण युरोपमधे अगदी शेवटच्या सीटवर बसूनही विमानात बसल्यासारखे वाटत होतं. ते आठवून मलाच माझे हसू आले. वाटलं आम्ही जे दहा बारा दिवस हवेत तरंगत होतो, ते आता जमिनीवर येण्यासाठी! मुद्दाम इटलीला शेवटी ठेवले असावे त्यामुळे भारतात त्याच वातावरणात जाण्यासाठी मानसिकता तयार व्हावी.

थोडक्यात काय तर "दिसतं तस नसतं" या म्हणीप्रमाणे सर्व युरोपियन एकाच साच्यातून काढलेल्या शाडूच्या मूर्तीप्रमाणे वाटतात. रंगरुप, वेषभूषा, संस्कृती, खाणेपिणे जवळपास सारखेच! या उलट आपल्या देशात दर दहा मैलावर बदलणारी भाषा, वेगवेगळे रंगरुप, संस्कृती, निरनिराळी वेषभूषा त्यामुळे कशी विविधतेतही एकता दिसते. फक्त गरज आहे त्याला प्रामाणिकतेची, स्वच्छतेची व शिस्तीची जोड मिळण्याची. तेव्हा आपल्यासारखे आपणच असू कारण देशाची आर्थिक व सामाजिक व्यवस्था निकोप असेल तर त्याच देशाचा दर्जा उंचावतो. शेवटी एवढेच म्हणेन!

अनेक भाषा, जातीपंथ, याभूमीचे वैशिष्ट्य असे। विविधतेत, या वैचित्र्यातही, भारत परी एकात्म दिसे।
भारत माझी माय माऊली, भारतीय मी प्रथम असे। या श्रद्धेला, परंपरेला, शत्रूचे आव्हान असे। जय हिंद.

*युरोपायन: भाग १०- स्वार्थ ते परमार्थ*

पर्यटन म्हणजे फक्त मौजमजा करणे नव्हे तर आपले व्यक्तीमत्व समृद्ध करण्यासाठी आपल्याला विविध प्रांत, देश, त्यांची संस्कृती, इतिहास, वर्तमान इत्यादी बघण्याची एक अपार उत्सुकता जवळ बाळगावी लागते. त्याचबरोबर आपल्याही एखाद्या तत्वाचा प्रसार करता आला पाहिजे. म्हणूनच युरोप बघत मौजमजा करतांनाही जे जीव स्वत:ची बाजू मांडू शकत नाहीत, स्वतःच्या समर्थनार्थ बोलू शकत नाही, त्यांच्यासाठी बोलून शांतपणे त्यांची बाजू मांडण्याच काम मी करण्याच ठरविले.

कारण वास्तव भयंकर आहे. फक्त प्राणीच नव्हे तर आपले आरोग्यही धोक्यात आहे कारण निसर्गसाखळीच आपण धोक्यात आणली आहे. या सर्व परिस्थितीस अज्ञानी नाही तर स्वतःला पदवीधारक, सुशिक्षित समजणाऱ्यांचेच कर्तृत्व कारणीभूत आहे. मानवाचा दिवसेंदिवस वाढणारा क्रूरपणा शिक्षणामुळे का थांबला नाही बरं? अहिंसा, सहिष्णू या भावना फक्त पुस्तकांची शोभा वाढविण्यापुरत्या राहिल्या आहेत, व्यवहारात मूल्य निष्फळ ठरत आहे कारण मुल्यांऐवजी स्वार्थाला, व्यवहाराला आपण महत्त्व देत आहोत. मुक्या प्राण्यांच्या जीवापेक्षा, यातनेपेक्षा कुतर्क करण्याकडे कल वाढतोय. हे वांरवार घडणाऱ्या घटनांकडे बघतांना जाणवते. आपण जे करत आहोत त्याबद्दल सारासार विचार करण्याचीही तसदी आपण घेत नाही.

खरतरं तत्वज्ञान, अध्यात्म, अहिंसा, फक्त मानवाची नाहीतर सर्व प्राणीमात्रांबद्धल समता, करुणाभाव या साऱ्यांचे प्रथम पुरस्कर्ते आपण आहोत आणि स्वतःच्या जीभेचे चोचले पूरवन्यासाठी निष्पाप, दुर्बल, मुक्या प्राण्यांचा केला जाणारा छळ, त्यांची निर्घृण कत्तली व त्याचे मतलबी समर्थन याची पराकोटीही आपल्याच देशात सर्वाधिक वेगाने होते आहे.

या उलट थोर संस्कृती, थोर इतिहास हे काहीही नसणाऱ्या विदेशीयांची नैतिकता, प्राण्यांप्रती असलेल त्यांच प्रेम, मोजक्याच का होईना जेन गुडैल सारख्या काहीजणी स्वताचा जीव धोक्यात घालून प्राण्यांच्या अस्तित्वासाठी वर्षोनवर्षे जंगलात राहून धनदांडग्यांशी लढा देत आहे. बाकी गोष्टींप्रमाणे त्यांच्या ह्या वृत्तीचं अनुकरण आम्ही का नाही करत? उलट त्या विरोधात अधिक उन्मादाने मुक्याप्राण्यांना उलटे सुलटे फिरवून सर्व जगासमोर किळसवाणे प्रदर्शन करतो.

अशावेळी मुठभर का होईना, सगळ्या प्राणीमात्रांच्या अस्तित्वासाठी लढण्याचे दिवस अजूनही संपले नाहीत. सारेच दीप काही मंदावलेले नाहीत. निष्ठा, समर्पण, मूल्य ह्या शब्दांचे अर्थही बदलले नाहीत अजून! प्रश्न आहे तो ह्या साऱ्या प्राण्यांप्रती आपल्याही मनात करुनाभाव जागृत होण्याचा!

मला माहीत नाही माझा हा हेतू किती सफल होईल? पण त्यांच्या विचारांना न बोलता, कुठलीही घोषणा न देता एक छोटासा धक्का देण्याच काम मी पाठीवर व बॅगवर शाकाहाराच्या समर्थनार्थ बॅनर लावून नक्कीच केलं. याचा पुरावा म्हणजे शेकडोजण मेसेज वाचत होते तर काही फोटो देखील काढत होते. तरीही आपण जेव्हा सामाजिक परिवर्तनासाठी काम करतो तेव्हा आपल्या अपेक्षांमधे अशीही एक शक्यता ठेवली पहिजे की कदाचित आपल्या हयातीत काहीच बदल होणार नाहीत. तरीही आपल्याला काम करायचं आहे कारण जबरदस्त इच्छेचा पारसमणी हातात असला की आपण जगही बदलू शकतो.
शेवटी हीच प्रार्थना, जे टाळणे अशक्य, दे शक्ती ते सहाया| जे शक्य साध्य आहे, निर्धार दे कराया | ओम् शांती.

*युरोपायन: भाग ११- जिने को और क्या चाहीये*

ज्यांच्यामुळे मी नेहमीच्या अनुभवापलीकडल्या प्रदेशात पाऊल ठेवू शकली व अनेक स्नेहीजण जोडल्या गेले त्यामुळे माझं अनुभवविश्व अधिक समृद्ध झाले. ह्याचे सारे श्रेय मी प्रथम माझ्या मिस्टरांना देते. दोन्ही मुलं व्यवस्थित सेटल झाल्यावर मी मिस्टरांना सांगितले की आतापर्यंत मी माझ्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडल्यात. त्यामुळे आता मला वर्षातून पंधरा दिवस फक्त स्वता:साठी जगायचे. पण नक्की कुठे जायचे असा काहीच प्लॅन नव्हता. जाऊ एखाद्या विपश्यना शिबिरात असा विचार केला होता. कारण एकटी दुसरीकडे कुठे जाणार! पण एकदिवस योगायोगाने'वुमन्स स्पेशल'ची जाहिरात वाचण्यात आली आणि माझ्या मनाने परत उचल घेतली. मला माझे इप्सित साध्य झाल्यासारखे वाटले.

पण नेहमीच आपण ठरवतो तसेच घडू देईल ती नियती कसली? ती आपला तडाखा देतेच. त्यामुळे आयुष्यात आलेल्या काही अकस्मात कठीण प्रसंगांना तोंड देता देता सार आर्थिक गणित कोलमडलं. पण त्यावरही मात करत आमच्या ह्यांनी मला थायलंडच्या रुपाने पहिली परदेशवारी घडवून आणली. खरतरं मनातून थोड गिल्टी वाटत होते! पण म्हणाले मला माहिती आहे तुला जग बघण्याची खूप हौस आहे! तू निसंकोचपणे जा! याचा अर्थ असा नाही की आम्ही, “जो तुमको हो पसंद वही बात करेंगे, तुम दिनको रात कहो तो रात कहेंगे” या कॅंटेगरीतले आहोत!

तर, “भाडणं, रुसवेफुगवे, थोडासा ईगो” ह्या सर्व गोष्टींनी परिपूर्ण असे सामान्यच जोडपं आहोत! तरीही आमची जोडी कशी जोडाक्षरा सारखी, एकमेकांना विलग केल्यास अर्थ नसल्या सारखी अशी अतूट आहे!

त्यानंतर माझे दोन्ही मुलं आपापल्या कामाचा व्याप सांभाळून दूर असूनही आमची काळजी घेणारे! अकस्मात आलेल्या संकटांना न डगमगता सामोरं जात वरतून, “आई तू जा फिरायला, होईल सारं नीट, आम्ही आहोत ना!” म्हणून धीर देणारे! माझे स्वप्न पूर्ण करण्याची दोघांमध्ये जणू चढाओढच लागलेली असते.

ते म्हणजे माझ्यासाठी. “मेरे दो अनमोल रतन, एक है राम और दूजा लखन” आहेत.

आणि त्यांच्या पाठीशी माझ्या दोन्ही सुना आनंदाने उभ्या असतात. माझ्या ह्या महागड्या छंदाबद्धल त्यांची कधीही कुरकुर नसते. उलट जास्तीत जास्त नवीन नवीन तंत्रज्ञानाची मला ओळख करून देऊन मला अधिक स्वावलंबी बनवतात. त्याच बरोबर माझ इंग्रजीचे ज्ञान वाढविण्यासही मदत करतात. त्यामुळे बाहेरच्या जगात वावरताना सोपे जाते. सुना नावालाच! आमच्यात मैत्रीचेच नातं अधिक! त्यामुळे त्यांना नात्याच दडपण व मला अपेक्षांचे ओझे बाळगावे लागत नाही.

आणि शेवटी ज्याच्या निरागस हास्यामुळे व मोहक बाललीलांमुळे मी सारी दु:ख विसरून नव्या उमेदीने रोजच्या जगण्याला सामोरी जाते तो माझा गोंडस नातू! खरंच - जिनेको और क्या चाहीए?

मी युरोपला जायचे ठरवले तेव्हा माझी एक मैत्रीण जी कॉंलेजची प्रिन्सिपल होती. मागील वर्षीच रिटायर झाली. मी तीला म्हणाले चल आता परत जुने दिवस आठवून आठ दहा दिवस एन्जॉय करुया, तर म्हणाली, “अरे किती भाग्यवान आहेस गं तू! माझे मिस्टर तर मला एकटीला सोडतच नाहीत. आम्ही म्हणजे सोन्याच्या पिंजऱ्यात फडफडणारे पक्षी आहोत! तू खरी करोडपती!”

तिच्या त्या शब्दांमागची वेदना मनात कालवाकालव करुन गेली. पण त्याच बरोबर आज मला सार्थ अभिमान आहे कारण पैशाने नसली तरी अनुभवसंपन्न जग पाहण्याची श्रीमंती
आणि त्यामुळे पाहिलेले जीवनातील चढ उतार! अस आयुष्यावर बोलण्यासारखं माझ्याकडे खूप काही आहे. म्हणून आज मी करोडपती पेक्षाही स्वतःला श्रीमंत समजते. म्हणून माझ्या ह्या पार्टनरला परत एकदा थँक्स म्हणून त्यांच्या एकसष्टसाव्या वाढदिवसाची ही माझी शब्दरुपी भावसुमनांजली!

नाही आणलेत आकाशातले तोडून जरी तारे, नव्या नव्या विचारांचे रोज घातले वारे
नसेल कधी आणला गजरा माझ्यासाठी, आयुष्याच सुगंधित केले सतत राहून पाठी. रीतरंजन.

*युरोपायन: भाग १२- विडे निरोपाचे*

युरोपायनच्या लेखमालेतील हा शेवटचा लेख. अनेक देश फिरतांना आलेले अनुभव व सोबतच्या सगळयांच्या सहवासातून निर्माण झालेले मैत्रीचे नाते. हे सगळं अनुभवल्यानंतर त्याचे मनात उठलेले तरंग हे सगळं तुमच्या समोर मांडतांना स्वतःच अनुभवविश्व अधिकाधिक समृद्ध होत असल्याच जाणवत होत. तसेच तुमच्या प्रांजळपणे उस्फूर्त दाद देणाऱ्या प्रतिक्रिया मला नेहमीच आनंददायक वाटतात. त्याबद्दल वाचून व्यक्त होणारे व अव्यक्तांनाही मनापासून धन्यवाद. तसेच सोशल मिडीयाचेपण आभार मानते कारण इथे आपला एकलव्य होत नाही. त्यामुळे मुक्तपणे विचार मांडू शकतो आणि त्या द्वारे जर कुणाच्या भावनांना मोकळे होण्याची वाट मिळत असेल तर माझ्यासाठी तो आनंदाचा, समाधानाचा क्षण आहे. कारण प्रत्येकाच्या मनात जरी असेच भाव असले तरी सगळयानांच नाही व्यक्त होता येतं. म्हणून ह्या साऱ्या भावना माझ्या एकटीच्या नाहीत तर आपल्या सर्वांच्या आहेत. म्हणून मी सहसा आभार मानन्याच्या फंदात पडत नाही. कारण तुमचे स्थान माझ्या ह्दयात आहे.

शेवटी इतकेच म्हणेन की वाचकांपैकी काहीजणी जरी वर्षातून चार आठ दिवस फक्त स्वता:ला नव्याने ओळखण्यासाठी परत एकदा भूतकाळातल्या सारखे समरसून जगण्यासाठी व त्याच त्या मऱ्यादित परिघात फिरून डाऊन झालेली बँटरी खऱ्या अर्थाने रिजार्ज करण्यासाठी सगळया पाशातून मुक्त होऊन एकदा तरी परदेशात प्रवासाला जावे. त्या निमित्ताने सर्व गुणदोषासकट आपणच आपल्याला नव्याने सापडतो आणि आपले ओठ एक से. मी. ने का होईना सगळयांनकडे बघून प्रसरण पावतात!

मला माहिती आहे 'बँग भरो निकल पडो' हे म्हणायला सोपे आहे पण ते कृतीत उतरवनं तितकेच कठीण आहे. कारण एकतर'स्त्री'ला स्वतः एकटीने प्रवासाला जाण्याची हिंमत नाही आणि चुकून केलीच तर तशी पाठवण्याची

पुरुषांची मानसिकता नसते.  पण 'वुमन्स स्पेशल' टूरला असणारी गर्दी पाहून बराच बदल झालेला दिसतो. प्रश्न आहे अजून जिथे राहिलाय तीथे होण्याचा! तसा काही बदल घडला तरी या लेखमालेचा उद्देश सफल झाला असे मी समजेन!

बापरे; युरोप फिरतांना नाही दमले एवढे त्याचे वर्णन रंगवन्यात दमछाक झाली.  चला तर आता हे निरोपाचे विडे तुम्हाला पण पर्यटनाच्या आनंदात रंगण्यासाठी देऊन तुर्तास तुमचा निरोप घेते!
स्वर्ग नको सुरलोक नको, मज लोभस हा इहलोक हवा. मुक्ती नको मज तृप्ती नको, मज येथील हर्ष नि शोक हवा.
सध्या एवढीच भावना. बायबाय.



# ऑस्ट्रियाची सफर - समीर गर्दे

*भाग १: व्हिएन्ना आणि बुडापेस्ट*

ऑस्ट्रियाला जाऊन देखील बरीच वर्षे झाली. मे मधे आठवडाभर सुट्टी काढून ऑस्ट्रियाला गेलो होतो. व्हिएन्नाला माझा मावसभाउ असतो. त्यामुळे संधी मिळाली की तिकडे जायचेच होते. आपलं कोणी असेल तर सगळं कसं निवांत होतं. दोन महिने आधी भावाला फोन करुन तो आहे का ते विचारुन घेतलं आणि विमानाची तिकीटे काढली.

कधी नव्हे ते जाताना ऑस्ट्रियन आणि येताना एअर फ्रान्सची तिकिटं स्वस्तात (हे महत्वाचं!) मिळाली. जरा बरं वाटलं की यावेळी सामान चेक-इन करुन नेता येइल! पण त्यानंतर आठवडाभराची आखणी भावावर सोडून दिली. ते निघण्याच्या आठवडाभर आधीपर्यंत आम्ही काही म्हणजे काहीही विचार केला नाही!

व्हिएन्ना तर बघायचं होतंच, त्याबरोबर आधी प्राग (चेक रिपब्किक) आणि बुडापेस्ट (हंगेरी) बघावं असं चाललं होतं. (म्हणजे अजुन दोन देशही झाले असते!) पण बुडापेस्टला भाऊच नेणार होता (एका दिवसात!) आणि प्राग तसं लांब पडतं. मग वाटलं ऑस्ट्रियाच नीट पाहावं. त्यामुळे साल्झबर्ग आणि इन्सब्रुक (स्वारोस्की क्रिस्टल्स् फेम) बघायचं ठरलं.

जाताना ऑस्ट्रियनच्या विमानात गरमागरम जेवण काय सही होतं, शाकाहारी पऱ्याय देखील होता. सगळ्या विमानात नसतात. स्वस्त विमानात तर काहीच (फुकट) मिळत नाही. पण परत येताना बघितलं, एअर फ्रान्स मधेपण थंड आणि (फक्त) मांसाहारी जेवण!'शाकाहारी आहे का?' हे विचारल्यावर ती फ्रेंच (हवाई) सुंदरी 'नाही' म्हणाली आणि (कुणीही न सांगता) चक्क माझ्यासमोर ठेवलेलं ते थंड चिकन उचलून घेतलं! शेवटी मीच म्हणालो, ठिक आहे बाई, चिकन तर चिकन. काहीतरी खायला मिळू दे!"

तर, १ मे रात्री आम्ही व्हिएन्नाला पोचलो. दादा-वहिनी विमानतळावर न्यायला आले होते! इथुन आमचा आराम सुरू झाला. त्यांच्या गाडीतुन थेट त्यांच्या घरी, मग मस्तपैकी घरचं जेवण. नाहीतर एरवी विमानवळावरुन मेट्रो/बस ची सोय बघा. मग हॉटेलात चेक-इन करा. ते कसं असेल काय माहीत. मग आपल्याला काहीतरी खाता येइल असे एखादे हॉटेल शोधा. केवढ्या कटकटी! आणि ही तर सुरवात असते. मग

सकाळी पर्यटन कार्यालय शोधा. हॉप ऑन बस. बऱ्याच ठिकाणांपैकी आज काय करायचं? सकाळी कुठ जायचं? आणि बरेच प्रश्ण. पण इथे दादा-वहिनीवर सगळं सोडुन आम्ही निवांत होतो.

दुसऱ्या दिवशी, ठरवल्याप्रमाणे, दादा (शनिवारी) आम्हाला व्हिएन्ना जवळची दुसऱ्या महायुद्धावेळची एक छळछावणी बघायला घेउन जाणार होता. दुसरा काहीच पर्याय नव्हता, कारण रविवारी आम्ही बुडापेस्टला जाणार होतो आणि बाकी आठवडाभर त्याला ऑफिस होते.

ही छळछावणी माउथ्हाउजन (Mauthausen) या गावी आहे. व्हिएन्नाहुन ऑटोबाह्न घेउन अडीच-तीन तासात तिथे पोहोचता येतं. ऑटोबाह्न म्हणजे जर्मनी-ऑस्ट्रिया मधले हमरस्ते, जिथे प्रती तास १३० कि. मी. एवढ्या वेगात गाड्या जातात. पहिल्यांदा त्या वेगाची थोडी भितीच वाटते! जर्मनी-पोलंड इथल्या मानानी ही छळछावणी तशी मोठ्ठी नाही. पण क्रौर्य सगळीकडे तेच. जवळपास लाखभर लोकांनी इथे प्राण गमावले. आत्तापर्यंत फक्त ऐकले होते. प्रत्यक्ष बघणं हा थरारक अनुभव होता.

**प्रवेशद्वार:**



ऑडिओ गाइड सगळं ऐकणं पण शक्य झालं नाही. पोटात कालवाकालव होऊ लागते. ते प्रवेशद्वार, बंदिवानांची बराक्स, गॅस चेंबर, मानेत गोळी घालायची जागा, रोगी बंधकांना एकाकी ठेवण्याची जागा सगळेच पाशवी.

**गॅसचेंबर:**




असे म्हणतात की त्या छावणीबाहेरच्या गावातल्या लोकांना माहीतीही नव्हतं म्हणे इथे आतमधे काय चालते ते. खरं खोटं देव (किंवा हिटलर आणि कंपनी) जाणो. आता इथे बऱ्याच देशांनी स्मारके बांधाली आहेत. इथुन व्हिएन्नाला परतताना ऑटोबाह्ननी घेतला नाही, तर डेन्युबच्या किनाऱ्यानी तिच्याबरोबर वळसे घेत घेत निघालो. बाहेरच्या निसर्गसौंदर्यानी छळछावणीच्या आठवणी कधीच पुसुन टाकल्या. आम्ही जात होतो तो वखाउ प्रदेश वाइन साठी प्रसिद्ध आहे. तिथल्याच एका खेड्यात दादानी गाडी थांबवली. इतके सुरेख खेडे मी याआधी





पाहिले नव्हते. छोटे छोटे दगडी रस्ते, बाजुला जुनी घरं.
या खेड्यातुन एक रस्ता डोंगरावर जातो. वरती ११ व्या शतकातील किल्याचे अवशेष आहेत. वरुन आजूबाजूचा परिसर अतिशय सुंदर दिसतो. विखुरलेले डोंगर, वळसे घालत जाणारी डेन्युब, मधेमधे रेखिव घरांचे समुह, द्राक्षाच्या बागा आणि दुरून ऐकु येणारे संगीत. शनिवार संध्याकाळनिमित्त कुठेतरी वाजवले जाणारे. असे वाटत होते की तिथेच बसावे!
खाली आल्यावर त्या खेड्यात एका उंच लाकडावर काही सजावट दिसली. भावानी सांगितलं की इथली प्रथा आहे. त्याला मे-पोल म्हणतात. त्यानंतर ऑस्ट्रियात इतरत्र फिरताना बऱ्याच वेळा **हे दिसले**. (बाजूचे चित्र पहा)
तसेच डेन्युबच्या कडेकडेने एक छोटा सायकलचा रस्ता जात होता. हा रस्ता म्हणे जर्मनी-ऑस्टिया-स्लोव्हाकिआ-हंगेरी-पुढे बाल्कन देशातुन शेवटी (डेन्युब बरोबर) काळया समद्रात जातो. साधारण २००० कि. मी. लांबीचा रस्ता! हौशी लोकं



सायकलवर सगळं सामान घेउन प्रवास करताना आम्ही बघीतली. नदीकिनारी या लोकांसाठी खास हॉटेल (सायकल साठी विशेष सोईंसकट!) आहेत. काय काय करतील ही लोकं, काही नेम नाही. डेन्युबमधुन पर्यटकांसाठीची मोठ्ठी जहाजं देखिल चालतात. अशाप्रकारे ऑस्ट्रियातला पहिला दिवस मजेत गेला. आता दुसऱ्या दिवशी, रविवारी, दुसऱ्या देशात! हंगेरीची राजधानी बुडापेस्टमधे!
व्हियेन्नापासून गाडीने तीन तासावर बुडापेस्ट! दादा आधी बऱ्याच वेळा गेला होता त्यामुळे काही चिंता नव्हती. सकाळी (शक्य तितक्या) लवकर निघालो, पुन्हा ऑटोबान्ह् पकडला. दोन तासांनी हंगेरीची सीमा लागली. हंगेरी युरोपियन संघटनेत उशिरा (२००४ साली) आलेला देश. त्यांचे चेलनही वेगळे आहे. हे माझ्यासाठि नविनच होते. मला वाटे युरोपीयन संघटनेतील सगळया देशांचा एकच व्हिसा (श्यांगेन) आणि एकच चलन (युरो) आहे, पण तसे नाही. युरोपात युरोपीय व्यापार समुह, श्यांगेन व्हिसा आणि युरो वापरणारे असे देशांचे (आणि अजुन बरेच) वेगवेगळे समुह आहेत. त्यामुळे काही विशेष उदाहरण तयार होतात, जसे खालील सगळे देश युरोपीय संघटनेत आहेत, पण -

- इंग्लंड मध्ये युरो चलन चालत नाही आणि त्यांचा व्हिसापण वेगळा आहे.
- आयर्लंडचा व्हिसा वेगळा आहे पण तिथे युरो वापरतात.

- तर, पोलंड, स्विडन आणि हंगेरीत व्हिसा युरोपाचा पण युरो चालत नाही.

अधिक माहितीसाठी विकीपिडिया बघा.

युरो चलन वापरायचे असेल तर त्या देशाच्या अर्थव्यवस्थेला काही किमान अटी पुर्ण कराव्या लागतात! अर्थातच हंगेरी त्याला पात्र नाही. आम्ही गेलो तेंव्हा एका युरोला २८० हंगेरिअन चलन मिळाले. त्यामुळे तिथल्या किंमती हजारोंमधे होत्या. खरेदी करताना सहज लाखो (हंगरियन) रुपये उडवले! इथल्या किमती (ऑस्ट्रियाच्या तुलनेत) कमी असल्याने सीमाभागातील ऑस्ट्रिअन हंगेरीत खरेदीला जातो म्हणे! बुडापेस्टला पोचल्यावर बाकी युरोपापेक्षा हा देश गरीब आहे हे लक्षात येते. सार्वजनीक स्वत्छतागृह देखिल फुकट नाही.

(हा काही देश गरीब असण्याचा निकष नाही. हे आपलं माझं निरीक्षण!)

व्हिएन्नामधुन पुढे डेन्युब बुडापेस्टमधून जाते. नदीच्या एका तिराला 'बुडा' आणि दुसरीकडे 'पेस्ट'वसलेले आहे (खरचं!). आख्ख शहर पाहायचं असेल तर सितादेला वरून मस्त दिसतं. सितादेला म्हणजे किल्ला. इथेच हंगेरिअन स्वातंत्रदेवतेचा पुतळा पण आहे.




इथुन आम्ही बुडा किल्यावर गेलो. हा किल्लापण छोट्या डोंगरावर आहे. वरती किल्यात अजुनही वस्ती आहे. इथली मुख्य आकर्षणं आहेत फिशरमन्स बाश्चन, तिथले चर्च, मुख्य महाल आणि खाली दिसणारे शहर.



**बुडा किल्यावरचा महाल:** इथे थोडी पेटपुजा केली आणि खाली उतरुन गाडीने पलीकडल्या तीरावर, पेस्ट गावात गेलो. तिथे बघण्यासारख्या गोष्टी म्हणजे हिरोज् स्केअर (राष्ट्रीय स्मारक), जगातील पहिली मेट्रो (हंगेरीयन लोकांच्या मते) आणि मिक्लोस लोगेटीचा 'अज्ञात' पुतळा. ह्या पुतळ्याने हातात एक लेखणी धरलीये. त्या लेखणीचा रंग अजुनही मुळचा पिवळा आहे तर बाकी पुतळा 'गंजुन' काळपट हिरवा झाला आहे. त्या लेखणीला हात लावणाऱ्याला म्हणे थोडे शहाणपण मिळते म्हणे.

म्हणून प्रत्येकाने हात लावल्याने तिथला रंग मूळचा पिवळा राहिला आहे. आम्हीपण थोडे शहाणपण घेऊन तिथून निघालो, जगातील पहिली मेट्रो (इ. स. १८९६) बघायला.

बुडापेस्टच्या मेट्रोचे बांधकाम लंडन मेट्रोच्या आधी सुरु झाले पण लंडनमधे मेट्रो पहिल्यांचा कार्यान्वीत झाली, त्यामुळे दोघेही म्हणतात की आमचीच जगातली पहिली मेट्रो! (कोणाची का असेना आपली नाहीये ना, मग आपल्याला काय फरक पडतो!) तो जुना दोन-अडीच बस एवढा फलाट त्यांनी तसाच ठेवलाय. तेवढ्यात एक मेट्रो खडखडत आली आणि आम्ही तिथून बाहेर पडलो.






आता तसे सगळे बघून झालं होतं. थोडी पोटपूजा करून रात्र व्हायची वाट पाहणार होतो.त्याआधी लाखो (हंगेरीअन) रुपये उधळून स्मरणिका विकत घेतल्या. हंगेरीचे चलन निराळे असले तरी छोट्या-मोठ्या खारादेसाठी दुकानदार युरो घेतात. पण उरलेले पैसे युरोमध्ये देतीलच याची खात्री नाही. परत निघण्यापूर्वी रात्रीचे बुडापेस्ट डोळे भरून बघितले. युरोपात कोठेही जा, सगळी ठिकाणं दिवसा आणि रात्री परत बघायलाच पाहिजेत.

**रात्रीचा एलिझाबेथ पूल बघा: (पार्श्वभूमीला सितादेला)**



तर असे पहिले दोन दिवस गेले. परत निघायला शनिवारच्या विमानाची तिकिटे काढली होती. म्हणजे आमच्या हातात पाच दिवस होते. ठरल्या प्रमाणे दोन दिवस व्हिएन्ना, दोन दिवस साल्झबर्ग आणि एक दिवस इन्सब्रुक करणार होतो. हॉटेल आधीच बुक केली होती. आता सोमवारी पहिल्यांदा रेल्वे स्टेशनावर जाऊन व्हिएन्ना-साल्झबर्ग-इन्सब्रुक-व्हिएन्ना अशी तिकिटे काढली.

युरोपातील प्रत्येक शहर दुसऱ्यापेक्षा वेगळे भासते. (युरोपातलंच का? तसं तर कुठलंही शहर दुसऱ्या कुठल्याही शहरापेक्षा वेगळ असतंच!) पॅरिस कसं इतकं निटनेटकं आहे की फिरताना सगळया गल्ल्या एकसारख्याच वाटतात. एक लेनचा रस्ता, बाजुला (असल्यास) पार्किंग आणि दोन्हीकडे दगडाच्या चार-पाच मजली इमारती, मधे छोटासा पादचारी मार्ग. सगळं आहे रेखीव पण त्यात एक तोचतोचपणा येतो. बार्सिलोना अगदी वेगळं, कुठल्याही दोन शेजार शेजारच्या इमारती एकसारख्या नसल्या पाहिजेत असा नियम आहे बहुतेक! प्रत्येक इमारतीला बाल्कनी असतेच आणि त्यांची रचनाही निरनिराळी असते. या कशातही सुत्रबद्धता नसली तरी बार्सिलोना आवडलं. व्हिएन्नापण या दोन्हीपेक्षा वेगळं. गावाच्या मध्यभागी स्टिफन्सडोम नावाचं चर्च आहे त्याच्या अजुबाजुला रस्ते अगदीच लहान आहेत. पण तेवढे सोडले तर बाकी ठिकाणी रस्ते प्रशस्त आहेत. अगदी दोन्हीकडे पार्किंग मग प्रशस्त पादचारीमार्ग आणि त्यापलिकडे जुन्या गिलावा केलेल्या इमारती. व्हिएन्नामधे मेट्रो आहेच शिवाय ट्रामही बऱ्याच आहेत. त्या ट्रामच्या तारा डोक्यावरुन जातात. त्या तारांसाठी खांब न बांधता अजुबाजुच्या इमारतींवरुन तारांनी ओढुन धरल्या आहेत तिच गोष्ट रत्यावरच्या दिव्यांची, त्यामुळे रस्त्यावरुन जाताना डोक्यावर तारांचं जाळ दिसतं. मला नेहमी वाटयचं की या तारांवर एक ताडपत्री पसरुन दिली की पूर्ण रस्ताभर मस्त शेड होईल.



कुणीतरी केलेल्या पाहाणीत व्हिएन्नात म्हणे वृद्ध/अपंग व्यक्तिंसाठी सर्वाधीक सोयी आहेत. हे मात्र लगेच लक्षात येतं. प्रत्येक भूमिगत मेट्रो स्थानकात लिफ्ट आहे. नवीन ट्राम पायरी नसलेल्या आहेत (वर चढायची गरज नाही), शिवाय पुढची अपंगांसाठी सोईची ट्राम किती मिनीटात आहे हे देखिल थांब्यांवर दाखवलं जातं. तुलना पॅरिसशी करायची तर, मेट्रोमधे लिफ्ट सोडा सगळीकडे सरकते जिने देखिल नाहीत. धडधाकट माणुस देखिल बरोबर सामान घेउन जाताना असला वैतागतो! अन मेट्रो बदलायची असेल तर इतकं चालावं लागतं. त्यामुळे पॅरिसमधे वृद्ध/अपंगांना बसशिवाय पऱ्याय नाही.

यावेळी पहिल्यांदाच वाया-मिशेलिनचे पर्यटक मार्गदर्शक (travel guide) वापरले. मस्त उपयोग झाला त्याचा. व्हियेन्नामधे भाऊच असल्याने इथेतरी आम्ही टूर घेणार नव्हतोच. कुठुन कसे जायचे आणि काय काय बघायचे ते दादानी सांगितले, बाकी सगळी माहिती त्या पुस्तकात व्यवस्थित मिळाली. शिवाय एक पायी फिरण्याचा रस्ताही त्यात असतो, तो केल्याने जुन्या व्हिएन्नातील जवळपास सगळी ठिकाणे कमी वेळात बघता आली. व्हिएन्नामधे आम्ही खालील ठिकाणं पाहीली, यातली काही पर्यटकांमधे प्रसिद्ध आहेत तर काही माझ्या भावामुळे आम्हाला बघायला मिळाली.

**श्योनबृन महाल:** पॅरिसजवळील व्हर्सायिच्या (व्हर्सायिचा तह फेम) महालाची आठवण करुन देणरा. समोर आडवा पसरलेला महाल, मागे लांबवर बाग, बागेत बरेच पुतळे, फस्त बागेच्या त्या टोकाला तळयाऐवजी एक टेकडी.



त्या टेकडीवरुन आख्ख व्हियेन्ना बघता येतं:





**स्टिफन्सडोम (सेंट स्टिफन्स चर्च):** व्हियेन्नाचे सगळयात महत्वाचे चर्च. अजुबाजूला चिक्कार पर्यटक (आमच्यासारखे). चर्चच्या एका भागाचे अजुनही नूतनीकरण चालू आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या अशा जखमा अजुनही बऱ्याच ठिकाणी बघायला मिळतात.

चर्चच्या आत पहिल्यांदाच मला ऑर्गन पाइप ठळकपणे दिसले. हे पियानो आणि बासरी यांचे हायब्रीड वाद्य यानंतर ऑस्टियात इतर चर्चमधेही दिसून आले.





**ऑस्ट्रियाची संसद:** ही बाहेरुन पॅन्थिऑन सारखी दिसणारी भव्य इमारत आतुनही पाहाण्याचा योग आला. दुसऱ्या महायुद्धात याचेही बरेच नुकसान झाले होते. ऑस्ट्रियाची लोकशाही बरिचशी आपल्यासारखी (संसदीय) असली तरी बराच फरक आहे. आत आम्ही तीन वेगवेगळी मोठ्ठी दालने बघितली. एक बरेच जुने होते. त्याचे काचेचे छत अतिशय सुरेख होते. सुदैवाने महायुद्धात त्या छताला काही झाले नाही.



**बेलवेडेर महाल:** ह्या महालाच्या पुढे-मागे प्रशस्त बाग आहे. महालात एक संग्रहालय आहे पण आम्ही ते पाहिले नाही. (अजुन पॅरिसमधेली बरीचं संग्रहालयं राहिली आहेत!)

**वायनर रेसनराड:** डेन्युबच्या किनाऱ्याला, व्हियेन्नाच्या थोडे बाहेर एक मनोरंजन उद्यान (amusement park) आहे. तिथला १०० वर्ष जुना पाळणा प्रसिद्ध आहे. जवळपास तो 'लंडन आय' चा पूर्वज वाटतो.

**गॅसोमिटर:** ह्या इमारती बाहेरुन बघायला काहितरी विचित्र वाटतात. फार पुर्वी शहरात इंधन म्हणुन नैसर्गिक वायू वापरला जात असे. त्याच्या ह्या टाक्या होत्या. तंत्रज्ञानातील बदल आणि इतर कारणांसाठी या टाक्यांचा वापर थांबवण्यात आला आणि आता त्यांचे बाहेरील स्वरूप तसेच ठेउन आतमधे मोठ्ठे शॉपिंग सेंटर उभारले आहे.



**स्टाड बाग:** येथील जॉह्न स्ट्रॉसचा पुतळा हा फोटो काढायचे पेटंट ठिकाण आहे.



हा स्ट्रॉस काळा की गोरा मला अजुनही माहिती नाही. हातात व्हायोलिन आहे म्हणजे संगितकार असावा. ऑस्टिया देश हा संगितासाठीही प्रसिद्ध आहे. बिथोवन, मोझार्ट झालचतर हा स्ट्रोस यांची ही कर्मभूमी. मला त्यातलं ओ की ठो कळत नाही. त्यामुळे मी काय जास्त त्यांच्या वाट्याला गेलो नाही.

**वॉहरिंग सिमेट्री:** इथे बिथोवनचे थडगे आहे. तसेच मोझार्टचे स्मारक ही आहे. पहिल्यांदाच असे स्मशानातुन (दुसरं काय म्हणू?) फिरत होतो. वेगवेगळया प्रकारची अनेक कलाकुसर केलेली थडगी बघितली.

*भाग २ - साल्झबर्ग आणि इन्सब्रुक*

आता पुढचा टप्पा होता साल्झबर्ग आणि इन्सब्रुक. सगळा प्रवास ऑस्टियन रेल्वेने, स्वस्त आणि मस्त! व्हिएन्नाला आल्यावरच पुर्ण प्रवासाचे आरक्षण केले होते. रेल्वे स्थानकांजवळची हॉटेल महिनाभर आधीच आरक्षित केले होते. साल्झबर्ग ही दादाची शिफारस होती तर इन्सब्रुकला स्वारॉस्की क्रिस्टल वर्ल्ड बघायला जायचं होतं.

बुधवारी सकाळी व्हिएन्नाहुन निघुन साल्झबर्ग, तिथुन दुसऱ्या दिवशी रात्री इन्सब्रुक आणि शुक्रवारी रात्री परत व्हिएन्ना असा दौरा होता. साल्झबर्गला पोचल्यावर बघतो तर धो धो पाऊस. रेल्वे स्थानकावरच असलेल्या प्रवासी मदत केंद्रातून माहिती घेतली. इथे तशा बऱ्याच सफरी आहेत, आम्ही दुपारी निघणारी ‘डोंगर आणि तळी ’ (Lakes and Mountains) ही सफर आरक्षित केली. इथे या सफरी घेउन जाणाऱ्या दोन संस्था आहेत साल्झबर्ग साइटसीइंग आणि पॅनॅरोमा टूर्स. त्यापैकी आम्ही साल्झबर्ग साइटसीइंग नी गेलो कारण त्याच तिकिटावर दुसऱ्या दिवशी शहरात फिरायला हॉप-ऑन-हॉप-ऑफ बस दोन तास फुकटात मिळणार होती. हॉटेलात जाइपर्यंत पाऊस पडतच होता. सफर वाया जाणार या तयारीने आम्ही सांगितलेल्या जागी पोहोचलो. पावसामुळे बऱ्याच जणांनी सफर रद्द केली होती त्यामुळे दहा जणांच्या गाडीत आम्ही दोघं, एक दुसरा चिंकी पर्यटक आणि आमची गाइड कम चालक एवढे चारच जण होतो. जास्त आपेक्षा न ठेवता सफर सुरु झाली. आमची चालक-कम-गाइड शहरातुन जाताना शहराचा इतिहास-भुगोल सांगत होती.

जर्मनमध्ये 'साल्झ' म्हणजे 'मीठ' आणि 'बर्ग' म्हणजे 'किल्ला'. या शहराच्या आजुबाजू डोंगरात खनिज मीठ मुबलक प्रमाणात होते. या मिठाची बाजारपेठ म्हणून हे शहर नावारूपाला आलं. त्याचबरोबर इथल्या धर्मप्रमुखाचे पदही बरेच शक्तिशाली झाले. शहराच्या मध्यभागी असलेल्या डोंगरावर किल्ला बांधून त्यात तो राहत असे. शहर आणि तो किल्ला आम्ही उद्या फिरणार होतो. आज शहराबाहेराची तळी आणि डोंगर बघणार होतो. वेळेअभावी अजून काही करणं शक्य नव्हतं, नाहीतर इथल्या खनिज मिठाच्या खाणींची सफरही आकर्षक होती. शहराच्या आजु बाजु आल्प्स पर्वत रांगा आहेत. पाउस-पाणी मुबलक. त्यामुळे ७० टक्के वीज ही जलविद्युत आहे (स्वस्त आणि तुलनेने पऱ्यावरणाला कमी हानिकारक) त्यामुळे सार्वजनिक वाहतुक करणाऱ्या बसही विजेवर चालतात.

आमच्या गाडीनी शहर सोडलं आणि वळणदार रस्त्याने एक डोंगर चढू लागली तेंव्हा अचानक ढग दूर झाले आणि सूर्य बाहेर येऊ लागला. तो डोंगर पार करेपर्यंत मस्त उन पडले. आता आम्ही खेड्यात आलो होतो. आजूबाजूला मोजकी घरं आणि विस्तीर्ण माळरान. असं वाटत होतं की चारी बाजूला विन्डोसचा वॉलपेपर लावलाय.

मिठाच्या व्यापाराबरोबर इथला दुसरा मुख्य धंदा दुधाचा. या माळरानात अनेक गाई चरत असलेल्या दिसत होत्या. आमची गाईड त्यांना happy cows म्हणे. कारण त्यांना कोणी खाणार नव्हतं! त्या गाईडचे सामान्य ज्ञान अगदीच सामान्य नव्हतं. भारतात holly cows असतात हे ही तिला महिती होतं!!

आजूबाजूला काही तासांपूर्वीच धुऊन काढलेले मस्त हिरवे गार डोंगर होते. त्यावर गाई-गुरं (क्वचित पाळलेली हरणं देखिल) चरत होती. मागे राहिलेले काही ढग टंगळ-मंगळ करत होते. मध्ये मध्ये लहान मोठी तळी होती. असं वाटतं होतं की कुठलातरी हॉलिवुडपट बघतोय. मी स्वतः हे बघतोय यावर विश्वासच बसत नव्हता. याआधी 'आयफेल टॉवर' समोर मला असंच वाटलं होतं. आमच्या गाईडनी सांगितलं की इथे घर बांधायचं असेल किंवा काही बदल करायचे असतील तर फार अवघड जातं, कारण सरकार पासुन पार शेजार्यांचीही परवानगी घ्यावी लागते. शिवाय पर्यटन विभाग परिसराच्या सौंदऱ्याला काही बाधा होणार नाही याचीही काळजी घेतो.

या सफरीत पाच सहा तळी दाखवली जातात आणि एका मोठ्या तळयातून फेरी बोटीतून पलीकडल्या गावात घेऊन जातात. थोड्याच वेळात ते सेंट गील्गन नावाचं गाव आलं. हे मोझार्टच्या आईचं गाव. गाव छोटं आणि अगदी टुमदार!

आम्ही बोटीच्या धक्यावर गेलो. पाऊस थांबला होता तरी हवेत गारवा होता. आम्हाला बोटीची तिकिटे देऊन आमची गाईड गाडी घेऊन तळयाला वळसा घालून पलीकडे गेली. आम्हाला बजावून गेली की सेंट वुल्फगांग या गावी न चुकता उतरा!

आम्ही बोटीच्या डेकवरून आजूबाजूचे डोंगर बघत होतो. दोन-तीन थांब्यानंतर आमचा थांबा आला. धक्यावर गाईड होतीच. गाव आणि तिथल्या चर्चची चक्कर मारताना गाईडने त्या सेंट वुल्फगांग यांची कथा सांगितली. याच गावातून एक छोटी रेल्वे वरती डोंगरावर चढून जाते. तीव्र चढावर चालण्यासाठी रॅक-पिनिअन वापरणारी हि रेल्वे अजूनही वाफेच्या इंजिनावर चालते. आम्ही गेलो तेंव्हा ती चालू नव्हती.

आता आमचा परतीचा प्रवास सुरु झाला. हा रस्ता वेगळा होता, यावरही अजून एक दोन तळी होती. प्रत्येक तळयाची काही दंतकथा होती पण आमच्या सफारीचा उच्च बिंदू येऊन गेला होता त्यामुळे हे तळे बघितले तरी लेक वुल्फगांगचीच आठवण येत होती.

साधारण तीन-चार तासात आम्ही साल्झबर्गला परत आलो. हॉटेलात थोडा आराम करून पोटपूजेची जागा शोधात फिरू लागलो. इथे एक बरं असतं की मेनू बाहेरच लिहिलेला असतो. असाच एक मेनू बघून आत गेलो. आतली सजावट अनोखीच होती. एक आख्ख घर तयार केलं हकेलं, अगदी वाळत टाकलेल्या कपड्यांसकट! प्रत्येक खोलीत टेबल-खुर्च्या होत्या. आम्ही दिवाणखान्यात बसून जेवलो. मी घेतला सालमन मासा आणि बायकोसाठी चीज-बटाटे असलेली कसलीतरी ऑस्ट्रिअन डिश होती. दुसऱ्या दिवशी साल्झबर्ग शहर बघायला सकाळी लवकरच बाहेर पडलो. कालच्या सफरीच्या तिकिटावर आज त्याच कंपनीची हॉप ऑन-हॉप ऑफ बस दोन तासासाठी मोफत होती. आज हवामान एकदम मस्त होतं. ही तर युरोपातल्या हवेची खासीयत आहे. एका रात्रीत हवामान यू-टर्न घेते. आज निरभ्र आकाश आणि गरम हवा होती. बस घेऊन आम्ही शहरातून निघालो. प्रत्येक ठिकाण पाहायचा मूड नव्हता. अजुनही कालची सफरच डोक्यात होती. दादाने हेल्ब्रून महालामधली कारंजी जरून बघायला सांगितली होती त्यामुळे आम्ही हेल्ब्रून महालाच्या थांब्याला उतरणार होतो आणि पुढच्या बसनी बाकीची सफर पूर्ण करून मुख्य शहर आणि मधल्या डोंगरावरचा किल्ला बघणार होतो. आमच्याच बसमध्ये असलेले एक 'देसी' कुटुंब आमच्याबरोबर हेल्ब्रूनला उतरले. बोलता बोलता त्या काकांनी सांगितले की त्यांच्या मुली जर्मनीमध्ये शिकतात आणि ते पती-पत्नी त्यांच्याकडे आले होते. बसमधून

मला बाहेरचे निसर्ग सौंदर्य बघू न देता हे श्रीमान मला सांगत होते की ते इथे इटलीहून आले आणि त्यांना काही इथे यायचं नव्हतं, हे काही त्यांना 'खास' वाटत नव्हतं. पण त्यांच्या मुलिंनी आधीच हे ठरवलं होतं, आणि ट्याँ. ट्याँ. ट्याँ!! उतरल्यावर त्यांना करंज्याबद्दल सांगितलं पण त्यांना काही त्यात रस नव्हता.

त्यांना कसबसं कटवून आम्ही कारंजी बघायला गेलो. तो काय प्रकार होता (तो म्हणजे कारंजी. काका नाही) याचा आम्हाला काही अंदाज नव्हता. तिकीट खिडकीवर कळले की कारंजांची गायडेड टूर असते. आमची टूर काही मिनिटातच सुरु झाली. आमच्याबरोबर युरोपातल्या कुठल्यातरी शाळा-कॉलेजातली बरीच मुलं-मुली होती. गाईडनी आधी आम्हाला एका ठिकाणी बसवून या जागेचा इतिहास सांगितला. आमच्या समोर दगडी टेबल-खुर्च्या होत्या त्यावर आमच्यापैकीच काही उत्साही मंडळींना बसवलं.

तर अर्थातच सांगण्यासारखी गोष्ट आहे हा किल्ला! आपल्या महाराष्ट्रासाराखेच ऑस्ट्रिआमधेपण आम्हाला बरेच डोंगरी किल्ले दिसले. साल्झबर्गच्या किल्यावर चढायची गरज नाही. एक कॉग रेल्वे सरळ वर (किल्यावर) नेते! वरती किल्यावर तर फिरता येताच, शिवाय तटबंदीच्या 'आतमध्ये' घेऊन जाणारी एक सफरही आहे. ऑडिओ गाईड आणि सुरक्षा रक्षका बरोबर पर्यटकांच्या समूहाला पाठवलं जातं. आपण एका दरवाज्यातून आत जातो आणि तटबंदीवरून (आणि मधून) फिरून दुसऱ्या दारातून बाहेर पडतो. आतमध्ये ऑडिओ गाईडवर किल्ल्याचा इतिहास-भूगोल सांगितला जातो. या किल्यात इथला आर्च बिशप राहायचा. आधी फक्त त्याला राहण्यापुरता असलेला हा किल्ल्याचा आकार, बिशापचे सामर्थ (आणि शत्रू) यांबरोबर वाढू लागला. नव्या इमारती, दुहेरी-तिहेरी तटबंदी असे करत करत बराच मोठ्ठा पसारा झाला. जिथे शत्रू वाढले तिथे लढाया या व्हायच्याच. अशाच एका लढाईत किल्ल्याला वेढा पडला. काही केल्या तो सुटेना. किल्यावर लोकांचे पोट भरायला एक एक बैल कापला जाऊ लागला. शेवटी एकाच बैल उरला होता. आता पराभव निश्चित होता. किल्ल्याखाली शत्रूची परिस्थितीपण जास्त वेगळी नव्हती. कुणाचं मनोबल पहिल्यांदा ढासळेल तो हरला! अशातच किल्ल्यावर कुणालातरी एक कल्पना सुचली. त्या शेवटच्या बैलाला रोज वेगवेगळा रंग लाऊन तटबंदीवरून खालच्या शत्रूला दाखवत फिरवले जाऊ लागले. याचा परिणाम व्हायचा तोच झाला आणि शत्रूंनी माघार घेतली. त्याची आठवण म्हणजे हा बैल!

आमच्या सफरीत पुढे आम्ही तटबंदीमधून काढलेल्या छोट्या छोट्या मार्गांवरून पुढे गेलो. कधी कधी गोल जिन्याने वर जाऊन बुरुजावरून आजूबाजूचा परिसर न्याहाळला. शेवटी खाली उतरण्याआधी एक जुना 'म्युसिक प्लेअर' बघितला! या मोठ्ठ्या ऑर्गनमधून येणारे सूर एका फिरणाऱ्या नळीवरील उंचसखल भागांवर अवलंबून असतात. इथून वाजवलेल्या या ऑर्गनचा आवाज खाली साल्झबर्गकरांना ऐकू जायचा.

अशा प्रकारे साल्झबर्गने सुखद धक्का दिला. साल्झबर्ग मस्त बघायचे असेल तर तीन दिवस तरी हवेतच. पण आम्हाला संध्याकाळी इंन्सबृकला निघायाचेच होते. रात्री इंन्स्बृकला पोचल्यावर आम्ही सरळ हॉटेलात जाऊन ताणून दिली. सकाळी उठून इंन्सबृक रेल्वे स्थानाकासमोरून आम्ही स्वरोस्की क्रिस्टल वर्ल्ड साठी बस पकडली. बऱ्याच हिंदी गाण्यांचे छायाचित्रण इथेही झाले आहे. हा मोठ्ठा हिरवा चेहरा बऱ्यापैकी परिचयाचा झाला आहे.

इथले स्वरोस्कीचे दुकानही बरेच मोठ्ठे आहे. मला आख्या ऑस्ट्रियामध्ये जेवढे देसी दिसले नाहीत इतके या दुकानात दिसले. प्रदर्शनात नाही. इंन्सब्रूक शहरातही कोणी नव्हते!! भारतातून युरोप वारीला आलेली ही प्रजा इंन्सबृकला फक्त स्वरोस्कीच्या दुकानात आले होते. आम्हीदेखील तुरळक खरेदी करून इंन्सबृक शहरात परतलो. इथून इंन्सबृकची सैर सुरु झाली. इथेही मगाशी सांगितल्यासारख एक ‘वैशिष्टपूर्ण’ चर्च, एक जुना रस्ता, एक ऐतिहासिक इमारत आणि शहरामधून जाणारी नदी आहे. खरतर ह्या गोष्टी सोडून बाकी इथे जास्त काही नाही. हिवाळ्यात आलात तर बाजूलाच असलेल्या आल्प्समध्ये बर्फात जाता येईल. स्की करता येतील. पण आम्हाला संध्याकाळी आठ पर्यंत वेळ घालवणं देखील अवघड होऊन बसलं. त्यामुळे लवकरच्या गाडीने आम्ही व्हिएन्नाला परत निघालो. माझ्या वैयक्तिक मतानुसार तरी इंन्सब्रूकला जायची काही खास गरज नाही. स्वरॉस्कीला जायचं नसेल तर! बाकी सफर मस्त झाली. रात्री दादा व्हिएन्ना रेल्वे स्थानकावर घ्यायला आला होताच! ऑस्ट्रियामधे शेवटचा दिवस राहुन पॅरिसला परत आलो. काय करणार. सगळया चांगल्या गोष्टी कधी ना कधी संपतातच! पण ऑस्ट्रियापेक्षा सुंदर देश मी याआधी बघितला नव्हता आणि नंतरही बघेन असं वाटत नाही.

# मोठयांचे मोठेपण - अविनाश हळबे

✉ avinash.halbe21@gmail.com ☎ 9011068472

*(लेखक टाटा मोटर्स मधील निवृत्त डिव्हिजनल मॅनेजर असून ते लेखक, प्रवचनकार, कथाकथन कार, व्याखाते, भारुड सम्राट आहेत आणि या सर्व क्षेत्रांत त्यांनी अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत)*

माणसाचे मोठेपण वय, शिक्षण, शारीरिक आकार, ताकद, सांपत्तिक स्थिती, हुद्दा, घराणे, वक्तृत्व आणि विद्वत्ता इत्यादी गुणवैशिष्टयांतून ठरते असे सांगतात. परंतु काही माणसांत एकाच वेळी अनेक गुणांचा संगम आढळून येतो. याबाबतीता मला आलेले दोन मोठया माणसांचे हृद्य अनुभव येथे देत आहे.

पहिला अनुभव डॉ. विजय भटकर यांचा आहे. पुण्यातील श्री सद्गुरू जंगली महाराजांच्या पुण्यतिथी ऊत्सवात, सायंकालीन ज्ञानसत्रामध्ये, व्याख्यानांच्या आयोजनाची सेवा माझ्याकडे असते. एके वर्षी यात डॉक्टरसाहेबांचे व्याख्यान असावे असे वाटून, मी अपॉइंटमेंट घेऊन माझ्या पत्नीसह त्यांना, सकाळनगर मधील काऱ्यालयात जाऊन भेटलो. व्याख्यानास त्यांनी रूकारही दिला. बोलणे चालू असताना माझे लक्ष त्यांच्या टेबलावरील आद्य शंकराचार्यांच्या संगमरवरी पुतळयाकडे गेले आणि त्यांना आपण एक वस्त्र अर्पण करावे असे वाटले. डॉ. ना विचारताच, त्यांनी त्यासाठी अनुमती दिली. लगोलग माझ्या पत्नीने एक भरजरी कापड आणून स्वत: शिवून ते तयार केले. कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका देण्याचे वेळी आम्ही ते डॉक्टरसाहेबांकडे सुपूर्त केले. डॉक्टरसाहेबांनी “संन्यासी व्यक्ती साध्या सुती कापडाची भगवी छाटी धारण करतो, भरजरी अथवा अन्य कोणत्याही कापडाची चालत नाही” असे सांगून नम्रपणे ती परत केली. ही गोष्ट माहिती नसल्याने आम्ही काहीसे खजील झालो. पण काही दिवसांतच चूक सुधारून, त्यांनी सांगितल्याप्रमाणे बनवलेली छाटी घेऊन जाताच, डॉक्टर साहेबांनी आनंदाने ती शंकराचार्यांना घातली.

मंदिरातील व्याख्यानाचे वेळी डॉक्टरसाहेब एक आंतरराष्ट्रिय ख्यातीची व्यक्ती असल्याने, आम्ही पारंपारिक व्यासपीठा ऐवजी, टेबलखुर्चीची व्यवस्था केली होती. परंतु, डॉक्टरसाहेबांनी “मी उभा राहूनच बोलेन” असे सांगितले. मी नम्रपणे कारण विचारताच “स्वत: महाराज समोर उभे असताना, मी बसून बोलणे बरोबर आहे कां?” असे स्मितहास्यपूर्वक उत्तर दिले. (मंदिरातील श्री जंगलीमहाराजांची तस्बीर उभ्या पविञ्याची (स्टॅंडिंग पोश्र्चर् मधील आहे) आम्ही त्या तस्बीरीकडे केवळ प्रतिमा म्हणून पाहात होतो परंतु डॉक्टरसाहेबांची भूमिका समोर प्रत्यक्ष महाराज उभे आहेत अशी होती. त्यांच्या या भक्तीभावनायुक्त नम्रतेस काय म्हणावे?

दुसरा अनुभव डॉ. रघुनाथ माशेलकर यांचा आहे. मी एक व्याख्याता आहे. साधारणपणे 2008 च्या सुमारास, डॉ. अब्दुल कलाम, डॉ. विजय भटकर आणि डॉ. माशेलकरांच्या लेख, भाषणे, इतर कामगिऱ्यांतून प्रेरणा घेऊन, मी 'भारताची गौरवगाथा' या माझ्या भाषणाची बांधणी करून, त्यावर एक पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनही बनवले. ते डॉ. रघुनाथ माशेलकर यांना दाखवून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे, या हेतूने मी डॉक्टरसाहेबांची अपॉईंटमेंट घेऊन, एन. सी. एल. मधील त्यांच्या कार्यालयात जाऊन भेटलो. मला 5 मिनीटांचा अवधी मिळाला होता. त्यांच्या स्वीय सहाय्यकांनी निर्देश करताच मी केबीनपाशी गेलो, तो खुद्द डॉ. माशेलकरांनीच दार उघडून माझे स्वागत केले! मी भेटीचे प्रयोजन सांगताच, त्यांनी ते प्रेझेंटेशन, त्यांच्या आसनाच्या डाव्या बाजूला असलेल्या, पीसीवर (कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर) दाखवण्यास सांगितले आणि आपली जागा सोडून टेबलासमोरच्या खुर्चीत बसले. मी तातडीने तिथे जाऊन पेन ड्राईव्हवरून माझे प्रेझेंटेशन त्यांच्या पीसी वर मराठी फॉंटसह लोड केले. सुरूवात करताच त्यांनी 'अहो उभे कशाला रहाता, बसून बोला की' असे मला स्मितहास्यपूर्वक सांगितले. मी नकळत खाली बसून, माझे प्रेझेंटेशन माझ्या विवरणासह स्लाईड बाय स्लाईड त्यांना दाखवण्यास सुरूवात केली. प्रत्येक स्लाईड डॉ. काळजीपूर्वक पहात होते आणि काही सूचना किंवा अधिक माहिती पण सांगत होते, जी मी टिपून घेत होतो. आमची भेट खरेतर 5 मिनिटांची ठरली होती, पण हा कार्यक्रम साधारणपणे पाऊण तास चालूनही, एकदाही त्यांनी मला वेळेची जाणीव करून दिली नाही, अथवा थांबण्यास सांगितले नाही. उलट सर्व स्लाईडस् दाखवून झाल्यावर त्यांनी माझे कौतुक केले आणि भावी व्याख्यानांसाठी मला शुभेच्छाही दिल्या.

पेन ड्राईव्ह वगैरे काढून आवराआवर करताना, एक गोष्ट माझ्या लक्षात आली आणि मी विलक्षण दचकलो! ती म्हणजे प्रेझेंटेशन दाखवताना पाऊण तास मी पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या Executive Chair मध्ये बसलो होतो अणि ते स्वतः मात्र, टेबलापलीकडे माझ्या समोर एखाद्या विद्यार्थ्याप्रमाणे शांतपणे बसून ऐकत होते! या नम्रतेस काय म्हणावे? निघताना न रहावून मी त्यांना चरणस्पर्शपूर्वक नमस्कार केला. बाहेर आलो तो 'कास्प' या स्वयंसेवी संस्थेचे लोकप्रिय प्रणेते डॉ. शरश्चंद्र गोखले हे डॉक्टरसाहेबांच्या भेटीसाठी ताटकळत बसले होते. मी काहीसा ओशाळून त्यांनाही अभिवादन करून निघालो.

या दोनही प्रसंगातून एक इंग्रजी वाक्य मला उद्धृत करावेसे वाटते. ते असे की –
Great People do not do any extra ordinary things, but they do ordinary things extremely well! पुढे माझी या विषयावर शेकडो व्याख्याने झाली. यथावकाश मी या दोघांवर लेखही लिहीले. पण या दोघा महान व्यक्तींनी घालून दिलेले आदर्श मी आजन्म विसरू शकणार नाही!!

# पर्यावरण आणि बांधकाम व्यावसायिक – प्रवीण गिरजापुरे

✉ pravin.girjapure@gmail.com ☎ 7972466295 / 8149108897
*(लेखक प्रिंट मिडीया क्षेत्रातील असून त्यांनी आजवर अनेक वर्तमानपत्रात काम केले आहे)*

आपल्या मुलांना भविष्यात काही वर्षांनंतर योग्य ऑक्सिजन मिळणार नाही फक्त एकदाच विचार करा, केवळ शरीरातील ऑक्सिजनची कमतरता लक्षात घेऊन समाजातील लोक मरणार आहेत. ही एक गोष्ट नाही जी मी तुम्हाला सांगत आहे, जर आपण वेळेत जागे होणार नाही, तर हे नक्कीच होईल. आजकाल वृक्षारोपण आणि मृतावस्थाबद्दल कोणतीही गोष्ट चिंताजनक नाही. जर आपण पुरेशी झाडे लावणार नाही तर हे नक्कीच होईल. जर आपण झाडांना जिवंत ठेवू शकलो नाही तर हे नक्कीच होईल. म्हणूनच आपण सर्वजण जेथे शक्य असेल तेथे वृक्षारोपण करू. आपण प्रत्येक जन्माच्या दिवशी एक वृक्ष लावावे हे ठरवावे लागेल.

आजकाल आम्हाला महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये उंच इमारती आढळतात. केवळ महाराष्ट्रातच नाही तर आम्हाला संपूर्ण भारतातील उंच इमारती आढळतात. आम्हाला या उंच इमारती फक्त शहरी भागातच आढळत नाहीत, आम्हाला अशा प्रकारची इमारती अर्ध-शहरी आणि शहरे क्षेत्रातील देखील आढळतात.

शहरी भागात घरे आवश्यक असल्यामुळे रिअल इस्टेटचा व्यवसाय कशाहीसारखा उदय झाला आहे. जर आपण आमच्या शहराच्या पुण्याबद्दल बोललो तर असे बरेच उप-शहरी भागात आहेत जे सिमेंट जंगले बनत आहेत.

या व्यवसायात बिल्डर्स इतके पैसे कमावत आहेत. आणि ते फ्लॅट मालकांना विविध सुविधा पुरवत आहेत. जेव्हा हे सर्व होत आहे, बिल्डर्स किंवा फ्लॅट मालक पऱ्यावरणाबद्दल विचार करीत आहेत? मी म्हणालो की ते पऱ्यावरणाबद्दल विचार करीत नाहीत. बिल्डर्स कमाई करत असलेल्या पैशाबद्दल विचार करीत आहेत आणि फ्लॅट मालक त्यांच्याकडून मिळालेल्या फ्लॅट्सबद्दल चिंता करतात.

सर्व बांधकाम व्यावसायिकांना त्यांच्या एफएसआयच्या विरूद्ध झाडे लावणे आवश्यक आहे, परंतु त्यांच्या एफएसआयच्या विरूद्ध झाडे लावण्याऐवजी बिल्डर्स त्यांच्या अनुपालन प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पीएमसीकडे ठेवी देतात. आणि पीएमसीच्या ठेवीबद्दल त्यांना त्रास होत नाही. आणि पीएमसीला या वृक्षारोपण बद्दल चिंताही नाही, त्यांच्याबरोबर ठेवी ठेवण्यात देखील त्यांना आनंद आहे.

या बांधकाम करणाऱ्या समाजाला या सर्व मृतावस्थेतील क्रियाकलाप कधी बंद करतील? पीएमसीच्या वृक्ष दक्षण विभागात गेल्यास तुम्हाला पुण्यातील नवीन बांधकामासाठी किती वृक्ष लागतील हे कळेल. बांधकाम व्यावसायिकांच्या वृक्षारोपणांविरूद्ध पीएमसीने कोट्यावधी रुपये जमा केले आहे. आणि त्या कोट्यावधी रुपये पीएमसीने बऱ्याच वर्षांपासून आयोजित केले आहेत. या विषयावर विचारणारा कोणताही राजकीय नेता नाही, असा कोणताही सामाजिक कार्यकर्ता नाही जो पीएमसी किंवा रिअल इस्टेट प्लेयर्सवर प्रश्न विचारत आहे. वरील सर्व लिहायचे माझे हेतू आहे की तुम्ही सर्व पीएमसीच्या वृक्षसंवर्धन विभागात जाल आणि त्यांना समान समस्येबद्दल प्रश्न विचारा. अन्यथा आमच्या envornment मध्ये ऑक्सिजन कमतरता मिळविण्यासाठी प्रतीक्षा करा.



# सेल्फ मेडिकेशन - आशिष कर्ले, शिराळा

✉ ashishkarle101@gmail.com ☎ 9765262926 *(लेखक औषधनिर्माण क्षेत्रात कार्यरत आहेत)*

सेल्फ मेडिकेशन म्हणजे वैद्यकीय तपासणी व सल्ल्याशिवाय स्वतःहून औषधांचा वापर करणे होय. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात झालेली वाढ आणि सहजतेने उपलब्ध झालेले माहितीचे स्रोत यामुळे सेल्फ मेडिकेशन मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे.

सेल्फ मेडिकेशन चे काही फायदेदेखील आहेत.

यामुळे आरोग्य यंत्रणांवरील ताण कमी होतो शिवाय डॉक्टरांची वाट पाहण्यामध्ये जाणारा वेळ वाचतो, काही काळापुरते त्रासापासून मुक्तता मिळते, अविकसित व विकसनशील देशातील लोकांची आर्थिक परिस्थिती तसेच विकसित देशातील महागड्या आरोग्यसेवा यामध्ये कुठेतरी सेल्फ मेडिकेशन लोकांना फायदेशीर ठरते, परंतु यामध्ये आरोग्यासंदर्भात दुष्परिणाम संभावण्याचा व रुग्णाच्या जिवावर भेतण्याचा धोका असतो. त्यामुळे शक्यतो सेल्फ मेडिकेशन टाळावे.

सेल्फ मेडिकेशनचा माहीत स्रोत हा इंटरनेट, यापूर्वी त्या औषधाचा वापर केलेले रुग्ण, जाहिराती, दूरदर्शनवरील व इतर प्रसार माध्यमातील विविध आरोग्यविषयक कार्यक्रम असतात.

बऱ्याचदा लक्षणे सारखी असली तरी आजार वेगळे आसू शकतात त्यामुळे सारख्या लक्षणांसाठी एकच औषध वापरणे टाळावे शिवाय रुगणाचे वय, लिंग, वजन यानुसार औषधाची मात्रा (डोस) बदलत असतो.

प्रथमोपचारामध्ये सेल्फ मेडिकेशन बऱ्यापैकी फायदेशीर ठरते ज्यामुळे पुढे जाऊन उद्धभवनाऱ्या समस्या काहीअंशी टाळल्या जातात.

सुरक्षित सेल्फ मेडिकेशनसाठी औषधे व आरोग्यसंदर्भात माहिती असणे गरजेचे आहे. यासाठी शक्यतो स्वतःहून औषधांचा वापर करण्यापूर्वी फार्मासिस्ट किंवा डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्यावा.

सर्वसाधारणपणे Over The Counter Drugs (औषधयोजनेशिवाय घेता येणारी औषधे) यांचाच सेल्फ मेडिकेशन म्हणून मोठ्या प्रमाणात वापर केला जातो परंतु दुर्दैव बऱ्याच ठिकाणी जी औषधे फक्त औषधयोजना

दाखवूनच खरेदी करता येतात अशी औषधे सुद्धा सहजतेने उपलब्ध होतात. त्यामुळे सेल्फ मेडिकेशनचा धोका संभावण्याची शक्यता असते.

सुरक्षित सेल्फ मेडिकेशन व सेल्फ मेडिकेशनमुळे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी वैद्यकीय सेवा पुरवणारे फार्मासिस्ट, डॉक्टर परिचारिका (नर्सेस) यांनी जनजागृती कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

सेल्फ मेडिकेशन मध्ये फार्मासिस्टची भूमिका महत्वपूर्ण ठरते. फार्मासिस्ट हा औषधातील कार्यकारी तत्व, औषधाचा शरीरावर कसा परिणाम होतो, शरीरावर होणारे दुष्परिणाम याबद्दल सविस्तर माहिती देऊ शकतात. सेल्फ मेडिकेशन मध्ये औषधेही थेट फार्मासिस्ट कडूनच खरेदी केली जात असल्यामुळे यामध्ये फार्मासिस्टचा भूमिका खूपच महत्वपूर्ण आहे त्यामुळे रुग्णांनी स्वतःहून औषधाचा वापर करण्यापूर्वी फार्मासिस्टचा सल्ल जरूर घ्यावा.

आणि शक्यतो सेल्फ मेडिकेशन टाळावे व औषधे ही डॉक्टरांकडून तपासणी करून डॉक्टर व फार्मासिस्ट यांच्या त्यांच्या सल्ल्यानेच घ्यावीत तसेच औषधाचा वापर केल्यानंतर होणाऱ्या समस्यांबाबत फार्मासिस्ट आणि डॉक्टरांशी संपर्क करावा.

जरी तुम्ही स्वतःहून कोणतेही औषध घेतले असेल आणि काही दुष्परिणाम जाणवू लागले असतील तर त्वरित त्या औषधाचा वापर थांबवून फार्मासिस्ट आणि डॉक्टरशी संपर्क साधावा.



# जनांचा प्रवाहो चालीला - हेमंत बेटावदकर, जळगांव

☎ 9403570268

*(लेखक सातत्याने वर्तमानपत्रांत लिहित असतात तसेच त्यांची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत)*

---

गेल्या महिन्यापासून संपूर्ण महाराष्ट्रात पंढरीच्या वारीचीच चर्चा सुरू आहे. गावागावातूनवारकऱ्यांच्या दिंड्या विठूनामाचा जयघोष करत हातात टाळ, खांद्यावर भगवी पताका घेवून पायी मजल दरमजलकरित विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरच्या दिशेने जात आहेत.

“सुंदर ते ध्यान उभे विटेवरी कर कटावरी ठेवूनीया” तुकोबारायानीवर्णन केलेले विठ्याचे ते सावळे पितांबर नेसलेले रुप पहाण्यासाठी भेटीलागी जीवा लागलीसे आस असे भाव मनात ठेवून जनांचा हा प्रवाहचालतो आहे.

चला पंढरीसी जाऊ रखुमादेवीवरा पाहू॥ डोळे निवतील काना मना तेथे समाधान।।

समस्त वारकरी या एकाच ध्येयाने प्रेरित होवून पावसा पाण्याची, उन्हा तान्हाची, कापड्या लत्त्याची इतकेच काय पण तहानभूकेचीही पर्वा न करता है शेकडो मैलाचे अंतर पायी पायी कापत आहेत.

“रूपे संदर सावळा गे माये” अशा त्या विठूरायाच्या पायाशी जाऊन पडण्याची काय ही ओढ? चंद्रभागेत स्नान करावे, वाळवंटात रंगणाऱ्या भजन किर्तनाचा आस्वाद घ्यावा, पुंडलीकाच्या पायरीवर माथा टेकवावा आणि शतजन्माचे पुण्य पदरी पाडून घ्यावे.

“तुका म्हणे डोळा। विठो बैसला सावळा।।” असे तुकोबाच्या नेत्रांनीच त्याचे रुप डोळयात साठवावे आणि अश्रुंना मोकळी वाट करुन देत माघारी परतावे. या वारीला जातांना सगळयांच्या मनात एकच भावना असते. सुखलागी जरी करिसी तळमळ। तरीत्पैदरीशीजाय एकवेळ॥ मग तूअवघाचि सुखरुप होसी। जन्मोजन्मीचे दुःख विसरशी।।

वाटेवर इतर दिंड्या येवून मिळतात, भक्तीचा महापूर येतो टाळ आणि मृदंगच्या सोबतीने कधी चालत, कधी नाचत, कधी फेर धरत, तर कधी रिंगण करत हा महासागर जेंव्हा विठ्ठल मंदिशचे कळसदर्शन होते तेव्हा बेभान होतो आणि त्याच्यापाशी एकच मागणे आर्ततेने मागतो. विठुराया रे, पाहू नको अंत। बोलावी मज सत्वरी आता।।

# नामदेवराव: प्रेमाचा निर्मळ झरा - किरण दहीवदकर, पुणे

✉ kirand.personal@gmail.com ☎ 7757025122

*(भावस्पर्शी व्यक्तिचित्रण या लेखमालिकेतील हा तिसरा भाग. लेखक IT क्षेत्रात कार्यरत आहेत)*

संध्याकाळ झालेली होती. थोडासा अंधार पण पडलेला होता. दुपारी लग्न विधी आटपून आता नवरदेव नवरीच्या स्वागत संमारंभाची जय्यत तयारी सुरू होती. सगळीकडे धामधूम सुरू होती. नुकत्याच सजविलेल्या प्रवेशदवारातून नवरदेव आणि नवरीचे आगमन झाले होते. स्टार्टर, शितपेय, चहा आणि कॉफीची रेलचेल चालू होती. प्रशस्त जागेवर सुरेख ओळीने खुर्च्या मांडल्या होत्या. काही मंडळी खुर्च्यांवर विसावुन, आपापल्या गंप्पामध्ये रंगली होती. सुलंग्न लावण्यासाठी लोक ओळींनी सभामंडपावर आणि खालीही रांगेत उभे होते. नवरदेवाच्या बाजुने एक आणि नवरीच्या बाजुने एक असे दोन लहान मुली मिळणारा भेटवस्तु लगबगीने घेत होत्या. वधुवरही सगळयांचे हसतमुखानं स्वागत करीत होते आणि पाया पडून भावी जीवनासाठी आशीर्वाद घेत होते. नवरदेवाचा भाऊ आणि बहीण त्यांच्या परिने आलेल्या पाहुणेमंडळीचे आदरातिथ्य करत होते सगळ कसं आनंदी आनंद चाललेले होते. नव्हते फक्त नामदेवराव आणि त्यांच्या पत्नी. आज त्यांच्या सर्वात लहान मुलाचा लग्नसंमारभ चालु होता. हे सर्व पहात असतांना माझ्या डोळयांच्या कडा मधुन, मधुन ओलसर होत होत्या आणि उरही भरून येत होते. हा लग्नसोहंळा पाहण्यासाठी नामदेवराव आणि त्यांच्या पत्नी असायला हव्या होत्या. मुलं सर्वकाही रितसर पार पाडीत होती. नामदेवरावांच्या मुलीशी बोलतांना असे कळले की आईनी जाण्यापुर्वी मुलांना सांगीतले होते की आमच्या नंतर डोळयात पाणी आणुन रडायचे नाही, कायम आनंदी राहायचे. असे सांगत असतांना तिच्या चेहरांवरील संमिश्र भाव माझ्या नजरेतून सुटले नाहीत. मोठ्या हिंमतीने आपल्या भावंनावंर नियत्रंण ठेऊन हसतमुखानं सर्व समारंभात ती मुलं कार्यरत होती. त्या मुलांकडे बघुन मीसुद्धा माझ्या भावंनावर आवर घालण्याचा निष्फळ प्रयत्न करीत होतो.

माझी नजर सहजच आकाशात असणारा दोन विशिष्ट तारकांकडे गेली. ते फक्त दोनच तारे एकाच ठिकाणी लुकलुकत होते. मला खात्री झाली की हे दोन तारे म्हणजेच नामदेवराव आणि त्यांच्या पत्नी आहेत. जे आकाशातुंन आपल्या लाडक्या मुलाच्या आणि सुनेच्या अंगावर पुष्पवृष्टी करून आशीर्वाद देत होते. त्या ताऱ्यांकडे पहात असतांना माझी नजर शुन्यात गेली आणि मी अचानक माझ्या लहानपणात, माझ्याच नकळत जाऊन पोहचलो.

माझ्या लहानपणी माझ्या आजोळी. नामदेवमामा म्हंटले की आम्हाला धडकी भरायची. नामदेवमामा हे एक धाक दाखवण्याचे मानवी यंत्र होते. शाळेत जायचे नाही म्हंटले की नामदेवला बोलवू का ? असे म्हणायची देर की आम्ही मुकाट शाळेत जायला तयार. आमच्या कुठल्याही बालहट्टांचा एकमेव रामबाण उपाय म्हणजे नामदेव मामा. त्यांच्याबद्दल भिती वाटण्याचे कारण ही तसेच होते, ते चालता बोलता आमच्या सर्व लहानांच्या सतत खोड्या काढत असत. कधी कोणाला तुला ससा दाखवतो म्हणुन दोन्ही कान उपटून, कानांच्याच आधारावर उचलून घेणे. ससा दिसणे तर दुरच पण कान प्रंचड दुखायचे. कोणाला चिमटे काढणे. एखादा आपला ऐटीत

चालत जात असेल, तर हळुच त्यांच्या डोक्यावर टपली मारणे आणि सर्वांत भयानक धमकी म्हणजे शाळेत गेला नाही तर लिबांच्या झाडाला उलटा टागूंन ठेवेल. या सर्वच प्रकारामुळे आम्हाला त्यावेळेस त्यांची प्रचंड भिती वाटायची आणि या सर्वांचाच गैरफायदा आमची पालक मंडळी त्याकाळी घेत असत. याचा अर्थ असा नाही की नामदेवमामा खुप क्रुर होते. त्यांचे आमच्या सर्वांवर प्रेमही तेवढेच होते. त्याकाळी दहा, वीस पैसेही खुप होते. ते आमच्यासाठी संत्र्याच्या गोळया, अस्मंताराच्या गोळया आणत असत. अगदीच काही नसेल तर आमच्या हातावर दहा, वीस पैसे ठेऊन तर कधी, कधी एक रुपया ठेऊन दुकानात गोळया आणायला पिटाळत असत. आमच्या आजोळी संयुक्त कुटुंब पध्द्ती होती. अगदी गोकुळ होते. माझी आजी कृष्णाची भक्ती करायची. तिच्या तोंडी सतत गोपाल कृष्ण, राधे कृष्ण असा जप चाललेला असायचा. आम्ही आठ, दहा असे बालगोपाल त्या एका मोठया वाड्यात गोकुळासारखे खेळत असायचो. आमचा वाडा अगदी प्रशस्त होता. दोन्ही बाजुच्या मुख्य रस्त्यावर, वाड्याची प्रवेशव्दार उघडायची. भव्य आणि सुदंर अश्या वाड्यात आमचे बालपण गेले.

आजोबांनी लहानपणी सांगितलेल्या माहितीनुसार, आम्हाला नामदेवरांवाचे बालपण आणि संघर्ष याविषयीची माहिती मिळाली. नामदेवरावांची कौटुंबिक परिस्थीती फार बिकट होती. नामदेवराव दोन वर्षांचे असतांना त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. आई दोन, तीन घरांची धुणी भांडी करून आपला व लहान नामदेवाचा उदरनिर्वाह करीत असे. नामदेवाच्या आईचा तिच्या मुलावर प्रंचड जीव होता आणि नसेलही कसा म्हणा, तिचा नामदेवच तिच अवघ विश्व होता. नामदेवाच्या आईने नामदेव जेवल्याशिवाय कधी अन्नग्रहण केले नाही आणि हा नियम त्यांनी आपल्या अखेरच्या श्वासांपर्यंत पाळला.

लहान नामदेव आपल्या आईसोबत, आईच्या कामासाठी घरोघंरी फिरत असे. आई काम करत असतांना आईच्या नजरेसमोरच नामदेव खेळत असे. थोडा जरी आईच्या नजरेआड झाला तर आई अस्वस्थ होऊन जायची, असेच एकेकांकडचे काम आटपून आई, नामदेव सोबत आमच्या आजींच्या घरी यायची. आमच्या आजीशी नामदेवांच्या आईची मस्त गट्टी जमायची. हसत खेळत, गप्पा टप्पा करत, त्या आमच्या आजीला विनामूल्य मदत करायच्या. नामदेवसुद्धा आमच्या आजीच्या घरी येण्यास खुप उत्सुक असायचा. कारण त्याच्या वयोगटातील माझे मामा, आई, मावशी यांच्याशी त्याला खेळता यायचे म्हणुन. नामदेवाला आमच्या वाड्यात खेळायला खुप आनंद वाटायचा. नामदेव आणि त्याच्या आईला माझ्या आजोबा, आजीबद्दल फार प्रेम आणि आदर वाटायचा. माझे आजोबा शिक्षक असल्याने नामदेवाच्या शिक्षंणाबद्दल, भविष्याबद्दल त्या नेहमीच त्यांचा सल्ला आणि मार्गदर्शन घ्यायच्या. माझ्या आजोबांना सर्व अण्णा म्हणायचे. त्यांचा अण्णांवर ऐवढा विश्वास होता की, “अण्णा म्हनंतीन तस, आपल्याले काय समजते त्यातले” असे व-हाडी पध्दतीने बोलुन त्यांचा अण्णांवरील असलेला विश्वास व्यक्त करीत असत. अण्णांनी नामदेवावर आपल्या मुलांप्रमाणे प्रेम केले. शैक्षणीक मार्गदर्शंनासोबतच वेळप्रसंगी आपल्या मुलांसोबत नामदेवलासुद्धा कपडेलत्ते, वह्यापुस्तके आणि अडीअडचणीला शाळेची फी भरणे असे चाललेले असायचे.

नामदेवलासुद्धा अण्णांच्या प्रेमाची जाणीव होती. ते त्यांना पितासमानच मानत आणि सन्मान देत असत. अण्णांनीसुद्धा नामदेवाला आपला मानसपुत्र मानले होते. अण्णांकडे कुठलाही सुखांचा, दु:खांचा प्रंसग

असो अण्णांचे नामदेवाशिवाय पान हलायचे नाही. असेच दिवसां मागून दिवस गेलेत. नामदेव शिक्षणात प्रगती करीत होता. दहावी, बारावी सुद्धा यशस्वीरित्या पुर्ण केली आणि त्या काळातील अतिशय लोकप्रिय असलेला कोर्स आयटीआय च्या ईलेक्ट्रीकल शाखेत नामदेवनी प्रवेश मिळवला होता. नियोजित कालावधीत त्यानी तो कोर्स अतिशय मेहनतीने पुर्ण केला. उच्च शिक्षण घेण्याची क्षमता असतांना सुद्धा प्राप्त परिस्थितीचे भान राखून आणि आपल्या आईला तिच्या रोजच्या कष्टातुन मुक्ती मिळावी यासाठी त्यांनी लवकरात, लवकर रोजगार मिळवुन, आपल्या परिस्थितीची गाडी रुळावर आणण्याचा प्रयत्न केला. नियतीनीसुद्धा त्यांना चांगली साथ दिली, लवकरच नामदेवनी राज्य सरकारची महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची नोकरी मिळवली. नामदेव आणि आईच्या कष्टांना फळ मिळालं. आईचा आनंद गगनात मावेनासा झाला. आईला जणू आभाळच ठेगंणे झाले होते. नामदेवाला आता माझ्या आईचे कष्ट संपणार याचाच खुप आनंद झाला होता. दोघेही मायलेकांनी हा आनंद अण्णांच्या परिवारासोबत साजरा केला. नामदेवानी सर्वप्रथम आपल्या आईचे काम बंद केले आणि आईच्या आशिर्वादाने आपल्या नविन नोकरीला सुरूवात केली.

एकेका दिवसागणिक, नामदेवाची घराची आणि आर्थिक परिस्थिती सुधारत गेली. नामदेवाची संतोषी मातेवर खुप श्रध्दा होती. नदीच्या काठावर त्याच्या एका स्नेहींचें घर होते. त्यांच्या घरातच संतोषी मातेचे मंदिर होते आणि तिथे संतोषी मातेची भव्य मुर्ती होती. नामदेवाचा गावाला जाण्या, येण्याचा तोच रस्ता होता. नामदेवाचा एक अलिखीत नियम होता. ते गावांहुन घरी येतांना आणि गावांला जातांना न चुकता संतोषी मातेचे दर्शन घेत असत. मी सुद्धा लहान असंताना बरेचदा त्यांच्यासोबत जात असे. संतोषी मातेसोबंतच नामदेवांची महालक्ष्मी या संणावरती खूपश्रध्दा आणि भक्ती होती. पुर्वी परिस्थिती नसतांना सुद्धा राशीवरती का होईना पण महालक्ष्मीचे मुख ठेऊन आहे त्या परिस्थितीत ते महालक्ष्मीचा तीन दिवसांचा सण मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा करायचे.

सर्वकाही स्थिरस्थावर झाल्यानंतर नामदेवाच्या आईच्या मनात आता नामदेवाच्या लग्नाचे विचार घोळू लागले. आईनी हा विचार माझ्या आजीला बोलुन दाखविला आणि संधी मिळताच अण्णांच्या कानावर या विषयी बोलण्याची विनंती केली. माझ्या आजीला सुद्धा आनंदच झाला, शेवटी अण्णांचा मानसपुत्रच होता. आजीनीसुद्धा संधी साधुन अण्णांच्या कानांवर ही गोष्ट घातली. मग काय लगेचच नामदेवासाठी वधुसंशोधनाची प्रकिया सुरू झाली. नामदेव राज्य सरकारी कर्मचारी असल्याने आणि एकुलते एक असल्याने त्यांना स्थळांची कमी नव्हती.

आमचे नामदेव मामा दिसायला अगदी देखणे होते. सुदृढ, गोरेपान. अगदी ऋषी कपूर या नायकाप्रमाणेच म्हणां ना! मग या ऋषी कपूर मामासाठी वधूसुद्धा एखाद्या हिरोईन सारखीच लागणार ना! दैव योगाने लवकरच आम्हाला मामांसाठी एक सुयोग्य वधु मिळाली. ती पण ऐतिहासीक शहर असलेल्या ब-हाणंपुरात. त्यांचे नाव मंगला होते. मामी दिसायला खुपच सुंदर होत्या. त्यांचे डोळे खुपच बोलके आणि निळसर होते. त्या दिसायला बराच प्रमाणात जुन्या काळातील मंदाकिनी प्रमाणे दिसायच्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या सौदर्यांपेक्षा त्यांच्या मनाचे सौदर्य हे विशाल असे होते. तसे पाहिले तर नामदेवाचे लग्न हे रितसर वधुसंशोधन करून, स्थळ निवडून आणि चहा पोह्यांच्या पारंपारिक पध्दतीने झाले होते. परंतु त्या दोघांमधिल प्रेम आणि आपुलकी बघता, कोणीही त्यांना सहजच तुमचा प्रेमविवाह झाला आहे का हो ? असे पटकन विचारून जात असत.

नामदेवाचे लग्न ठरले तेव्हा त्यांची नेमणुक कु-हा काकोडा या गावी झाली होती. ते आपल्या आईसह तिथे स्थलांतरीत झाले होते. त्यांना एक छान टुमदार असे सरकारी घर मिळाले होते. एम. ए. सि. बी. मध्ये कार्यरत असल्याने सब स्टेशनला लागूनच त्यांचे कर्मचारी निवास स्थान होते. सबस्टेशन नविनच सुरू झाले असल्याने, नविनच बांधकाम आणि रंगरंगोटी झालेली होती. त्या सरकारी कॉलनीत तारेचे कुंपण होते. त्या कुंपणात सबस्टेशन आणि चारच कर्मचारी व त्यांचा परिवार राहील अशी दोन मजली इमारत होती. मी त्या वेळेस फार लहान होतो. मामांचे हे घर म्हणजे आमच्यासाठी राजाचा राजवाडाच होता. तारेच्या कुंपणाच्या आत वाटेल तसे खेळायचे. सबस्टेशनला जाऊन ते रंगबिरंगी गोल लाईट पाहायचे. मोठ मोठे, एका ओळीने लावलेले कपाट पहात राहायचे. तेथुन येणारे चित्र विचत्र आवाज ऐकत बसायचे. त्या जुन्या काळयाकुट्ट दुरध्वनीचा रिसीवर कानाला लाऊन मनात येईल ते नंबर फिरवत बसायचे. मामा आमच्यावर लक्ष ठेऊन असायचे. परंतु त्यांनी आम्हाला कधीही याला हात लाऊ नको, त्याला हात लाऊ नको असे सांगितले नाही. या उलट ते आमच्यात आमच्यातलेच लहान होऊन खेळायचे. एखाद्या सणांला भजे, वडे बनत असले तर ते बनत असतांना गुपचुप आमच्यापर्यंत पोहचवण्यात त्यांचे कौशल्य होते. माझे अजुन एक मामा एस टी महामंडाळात चालक या पदावर होते. ते नेहमी नांदुरा - कु-हा - काकोडा बस घेऊन जायचे. जेव्हा मला शाळेला सुटी लागायची, तेव्हा मामा मला गाडीत टिकीट काढुन, केबिनमध्ये बसवायचे. नामदेवमामा सबस्टेशनच्या थांब्यावरील ठिकाणी उपस्थित असायचे आणि मला बस मधुन उतरवुन घरी घेऊन जायचे. दोन, चार दिवस राहुन माझे मन भरले की पुन्हा त्याच पध्दतीने मी परत गावी यायचो. मी माझ्याच बालपणात रंगलो. असो.

तर मामाचे लग्न ठरले आम्ही सर्व पर्वीच्या काळी लग्नप्रवासासाठी वापरण्यात येणारा मॅटेडोअरनी ब-हाणपूरला लग्नांसाठी गेलो. मला चागंले आठवते की त्यांचे लग्न ज्या वर्षी झाले, त्याच वर्षी ॠषी कपूरचा ‘प्रेमरोग’ हा चित्रपट प्रदर्शित झाला होता आणि तो गाजलाही होता. त्या चित्रपटाची गाणीसुद्धा अप्रतिम होती. मामाच्या लग्नात बँडवरही तीच गाणी वाजली होती. लग्न थाटामाटात पार पडले होते. आम्ही वरातीसह परत आलो होतो. मामाचे दोनांचे चार हात झाले होते. नविन नवरीसह मामाचे वैवाहिक जीवन सुरू झाले होते. नविन मामी आमची खुप काळजी घ्यायची आणि आम्हाला हवे नको त्या सर्व गोष्टींची जातीनी लक्ष द्यायची, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आम्ही त्यांच्यापेक्षा लहान असुनही आम्हाला अहो, काहो असे म्हणुन आवाज देत असे. लहानपणात मिळणारा या मानामुळे आम्ही खुप सुखावुन जायचो आणि हा मान आम्हाला कायम मिळाला म्हणुनच त्या आमच्या लाडक्या मामी झाल्यात. मामी खुप चांगल्या स्वभावाच्या होत्या. नामदेव आणि त्यांच्या आई मध्ये असलेल्या प्रेमाचा त्यांनी प्रवेशव्दारांवरील माप ओलंडताच अदांज घेतलेला होता. नामदेवानीसुद्धा आपल्या नववधुला आपल्या आईच्या कष्टांची आणि जीवनातील तिच्या त्यागाची कल्पना दिली होती. मामींनीसुद्धा या गोष्टी समजुतदार पणाने समजावुन घेतल्या होत्या. मामींच्या आगमनानंतर बराच जणांनी असा अंदाज बांधला होता की मायलेकांच्या प्रेमात आता नविन सुनेमुळे नक्कीच अंतर पडणार. पण लोकांचा अंदाज मामींनी साफ खोटा ठरविला होता आणि याउलट मायलेकांच्या प्रेमाला मामींचाच जास्त आधार मिळाला होता. मामींना सासूबाईंनी घेतलेल्या कष्टांची पुर्ण जाणिव होती आणि या सर्व गोष्टींची जाणिव त्यांनी सासूबाईंच्या शेवटच्या क्षणांपर्यंत ठेवली. मी आजपर्यंत अशी एकही सुन नाही बघितली जी सासूंची ऐवढी जिवापाड सेवा करते आणि काळजी घेते. काही काही स्त्रियांना घडवतांना देव असा काही घडवतो की

राग, लोभ, ईर्ष्या, मत्सर, आणि संताप या दुर्गुणाचा लवलेशही त्यांच्या व्यक्तीमत्वात शोधुन सापडत नाही. अशा व्यक्ति खरोखरच फार दुर्मिळ असतात आणि आमच्या मामीही त्यापैकी एक होत्या.

नामदेवरावांचा संसार छान सुरू झाला होता. त्यांच्या घरी एका चिमुकल्याचे आगमन झाले होते. संतोषी मातेचे भक्त असल्याने, पहिल्या बाळाचे नाव संतोष ठेवण्यात आले. मामांकडे आता मामांचे बाळ आल्याने, आमच्या प्रेमात वाटा पडुन मामांचे आमच्यावरील प्रेम कमी होईल की काय ? अशी आम्हाला भिती वाटायची, परंतु प्रेम कमी होण्याऐवजी, त्यात वाढच झाल्यांचे आम्हाला जाणवले. संतोषच्या पाठीवर पुनम आणि पुनमच्या पाठीवर सुरज, असे आणखी दोन अपत्य मामांच्या कुंटुंबात जन्माला आलीत. मामा मामींने आपल्या परीने सर्व मुलांना चांगले आणि सारखेच संस्कार देण्याचा शेवट पर्यंत प्रयत्न केला. नामदेवच्या आईचे पण आपल्या नातवांवर प्रचंड प्रेम होते. मुलंही आपल्या आईवडीलांने दिलेल्या संस्कारांप्रमाणे आजीचा, आई वडीलांचा, येणारा-जाणारांचा मान सन्मान ठेवत असतं. कालांतराने आम्हीही मोठे झालो होतो. मामांनी आम्हांला स्वतःच्या मुलांइतकेच प्रेम दिले होते. आता ते आमच्याशी एका सच्चा मित्रांप्रमाणेच वागत असत. आता त्यांनी आपल्या गावांकडील मातीच्या घराचे बाधंकाम करून घेतले होते. सरकारी नियमांनुसार त्यांची बदली कु-हा या गावांहुन बोदवड या गावी झाली होती. आता घरात महालक्ष्मींचा उत्सव हा मोठ्या प्रमाणात साजरा होऊ लागला. धर्मशास्त्राप्रमाणे पूजा विधी करून, आप्तस्वकीय, गावांतील पाच पन्नास लोकांना जेऊ घालुन, गौरीपुजनांचा हा उत्सव अखंडपणे चालु होता. सर्वजण या उत्सवात सहभागी होऊन महालक्ष्मींचा आशीर्वाद घेऊन, तृप्त होऊन जात असत.

नामदेवरावांची मुले मोठी झाली संतोषला इंजिनियर बनवण्यांचा त्यांचा मानस होता. संतोषही चांगल्याप्रकारे प्रगती करत होता. पुनम शिक्षणांसोबत तिची आवड असलेल्या नृत्य कलेचे धडे घेत होती. लवकरच तिला मराठी दुरदर्शनच्या दे दमा दम या नृत्याच्या कार्यक्रमात तिला नृत्य करण्यासाठी तिची निवड झाली. नामदेवमामा आणि मामीना खुप आंनद झाला. ते दोघेही मुलीसह मुंबईला जाऊन नृत्याचे चित्रकरण करून आले. मामांनी आम्हाला सर्वांना कळविले. त्यांनी कार्यक्रम प्रक्षेपित होण्याची तारीख आणि वेळ आम्हाला सांगितली आणि कार्यक्रम पहाण्यासाठीची आग्रही विनंतीसुद्धा केली. आम्हीसुद्धा आमच्या शेजारांसह हा कार्यक्रम कौतुकांने पाहिला. मामांना कार्यक्रम झाल्यावर फोन करून नृत्य आवडल्याचे आवर्जुन सांगितले. छोटा सुरज ही अभ्यासात खुप हुशार होता आणि घरात सर्वात लहान असल्यांने सर्वांचा लाडका होता. त्यांच्या लहानपणीची एक आठवण मला येथे सांगाविशी वाटते ती अशी की पुर्वी आलेल्या ‘राम लखन’ या चित्रपटातील लखन या पात्रामुळे सुरज फारच प्रभावित झाला होता, इतका की त्याने आपले नावच लखन ठेऊन घेतले होते. कोणीही त्याचे नाव विचारले की तो त्याचे नाव लखनच सांगायचा. नामदेरावांकडे सगळा आनंदी आनंद होता. सगळे कसे मस्तच चालेले होते.

आता मुले मोठी झाली होती. मोठ्या मुलांनी आपले शिक्षण पुर्ण करून नाशिकला नोकरीसाठी प्रस्थान केले होते. पुनमसांठी वरसंशोधन सुरू झाले होते. प्रत्येक सामान्य माणसांप्रमाणे नामदेवरावांसुद्धा आपल्या जबाबदारीची जाणिव होती. आपली मुलं शिक्षण करून व्यवस्थित मार्गी लागावी. त्यांची लग्न कार्य सामाजीक चाली रितीने, सर्वसामांन्याप्रमाणे व्हावी. आपण उभा केलेला हा संसाराचा डोलारा, सणवार आणि जोडलेली

माणसे, नातेसंबंध पुढच्या पिढीनेसुद्धा योग्य पध्दतीने पुढे चालवावी. आपला मान-अभिमान आणि सामाजीक प्रतिष्ठा मुलांनी सुद्धा आपल्या प्रमाणेच जपावी. अशी सामान्य अपेक्षा त्यांना होती. आयुष्यभर कष्ट करून मिळवलेल्या पैश्या-अडक्यातुन तिन्ही मुलांची लग्नकार्य, सणवार आटपून त्यांची घडी बसवावी. उरलेल्या रक्कमेतुन आपल्या वृध्दावस्थेची तजविज करावी. अशी त्यांची योजना होती. पण असे म्हणतात की दैव जाणिले कोणी? नियतीचा डाव हा भल्या भल्यांना कळला नाही. मनुष्य ठरवितो काय आणि घडते भलतेच. असो.

नामदेवरावांच्या आई आता थकत चालल्या होत्या. आईना उठुन बसणे, चालणे दिवसं दिवस कठीण होत होते. आईची सप्तश्रृंगीच्या गडावर जाण्याची खुपच इच्छा होती. नामदेवानी लगेच ती इच्छा पुर्ण करण्याचे ठरविले आणि एक खाजगी वाहन करून गडावर दाखल झालेत. आईवरील प्रेम अजुनही तसेच होते. आईला स्वतः खांद्यावर घेऊन, संपुर्ण सप्तश्रृंगीचा गड चढुन जाणारे नामदेवरांव हे आजच्या काळातील श्रावण बाळच! पुर्ण गड चढुन गेल्यांवर मायलेकांच्या चेहरांवरील आनंदाचे वर्णन शब्दात करणे अशक्यच. वाचकांच्या माहितीसाठी त्यांच्या आईने वयांचे ऐंशी वर्ष पुर्ण केलेले होते आणि कष्टांने किरकोळ झालेली शरीरयष्टी होती. परंतु त्या मागची मुलांची, मातृप्रेमाची भांवना माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. त्यातच गर्दीमध्ये आई रस्ता चकून गेल्यांवर शोधतांना नामदेवरावांचा जीव अगदी कासावीस होऊन गेला. चेहरांवर अगदी लहान मुलाचा आईकडून हात सुटल्यावर जे भाव असतात, अगदी तेच भाव नामदेवरावांच्या चेहरांवर त्यांच्याकडून आईचा हात सुटल्यावर उमटले होते. सुदेवाने आई लवकरच सापडल्यात. हा एक भाग वगळता तिर्थयात्रा व्यवस्थीत पार पडली होती. आता मात्र आई खुप थकली होती. आईनी केलेल्या कष्टांचे चिज झाले होते. श्रावण बाळासारखा मुलगा, त्याचा बहरलेला संसार, सर्वकाही मनासारखे. वृध्दाअव्यवस्थेत याहुन अधिक काय हवे असते. मुल संस्कारी असणं हे आई वडीलांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे असते हे या मायलेकांच्या आयुष्यावरून जाणवते. मुल चांगले निघाले तर आई वडीलांच्या आयुष्याचे सोने नाहीतर मातीच.

आईची खुप सेवा केली, खुप सुख दिले आणि आईसुद्धा खुप समाधानी होती. वार्धक्याने आलेल्या सुरकुत्यावंरील चेहरांवरसुद्धा समाधानाचे आणि आनंदाचे तेज आईच्या चेहरांवर, अनंतात विलीन होण्यापुर्वीसुद्धा झळाळत होते. आईचा मृत्यु नैसर्गिक पध्दतीने झाला. अत्यंत दुःख अतंकरणाने नामदेवरावांनी आपल्या आईला शेवटचा निरोप दिला होता. जन्मापासुन असलेली साथ. आणि जगात कोणत्याही आईने आपल्या मुलाला इतके भरभरून प्रेम दिले नसेल, अशा आईचा आशीर्वाद आणि सोबतीशिवाय त्यांना जगणे बरेच दिवस जड गेले. धन्य ती माता आणि धन्य तो तिचा पुत्र.

नामदेवरांव आपल्या पुढील प्राप्त जबाबदारा पार पाडण्यासाठी सज्ज झाले होते. पुनमच्या वरसंशोधनाच्या प्रयत्नांना फळ आले होते. एक सुयोग्य स्थळ त्यांनी आपल्या मुंलीसाठी पसंत केले होते. मुलीची पसंती विचारात घेऊन धुमधडाक्यात लग्नाचा बार नामदेवरावांनी उडवून दिला होता. खंत होती ती फक्त आपली आई मुलीच्या लग्नात नसल्याची, बाकी सर्व आनंदात पार पडले होते. मुलगी आपल्या संसाराला लागली होती. नामदेवरांवपण कन्यादानांच्या जबाबदारीतुन मुक्त झाल्याने आनंदीत झाले होते.

आयुष्य पुन्हा एकदा नित्यनियमांने सुरू झाले होते. विनाकारणच्या एक, दोन कोर्टाच्या केसेस नामदेवरावांच्या मागे लागल्या होत्या. मनाने गोड असणारा नामदेवरावांन्हवर मधुमेहसुद्धा त्यांच्या प्रेमात पडला होता आणि त्यांना साथ देण्यास प्रारंभ केला होता. घरातील वातावरणही थोडे अस्थिर झालेले होते. दोन पिढ्यातील संघर्ष तोंड वर काढू लागला होता. वैचारिक मतभेद, अपेक्षांचे ओझे, भुरळ पाडणारी आधुनिक शैली, ही नामदेवराव उभयांतानांच्या पचनी पडत नव्हती. इतरांची घडी बसवणांरा नामदेवरावांना आपलीच घडी बसवंणे कष्टदायक होत होते. मनाने कोमल असणारा या माणसांचा तटस्थ असणांचा आव तरी किती दिवस आणता येणार होता. काही गोष्टी मनाविरूद्ध घडत गेल्या. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येत होते. मला त्यांचे वरचे वर फोन येत असत. मी मधस्थी करावी अशी त्यांची इच्छा होती. पंरतु जिथे ते स्वतः एवढे अनुभवी असतांना कमी पडलेत, तिथे माझ्यासारख्यांचे काय कौशल्य पणाला लागणार होते आणि एकदा सुटलेला बाण परत कधीच येत नाही ही वास्तविकता त्यांनी स्विकारली होती. माणसांना देवाने देताना सुखदुःखासह कमी जास्त प्रमाणात भोगही दिलेले असतात आणि ते येथेच भोगावे लागतात, तसे त्यांच्याही वाट्याला आले आणि ते त्यांनी आनंदाने स्विकारले आणि मोठ्या मनाने आणि समजुतदारीने आपल्या बाजुने या संघर्षावंर पडदा टाकुन नविन पिढीशी जळवून घेऊन, पुढील वाटचालीस सुरूवात केली होती.

असे म्हणतात की देवही अशाच व्यक्तिंची परिक्षा घेत असतो. ज्यांच्यामध्ये सामर्थ्य आणि क्षमता असते. नामदेवरांवाच्या बाबतीत तसेच घडले. एका मागोमाग एक अशा, सारख्या परिक्षा देव घेत राहिला आणि नामदेवराव त्या परिक्षा यशस्वीपणे देत राहीले. परतु देवानी अजुन एक कठिण परिक्षा त्यांच्यासमोर ठेवली. त्यांच्या पत्नीला एका दुर्दैवी आजारांने ग्रासले. नामदेवरावांसाठी हा खुप मोठा मानसिक धक्का होता. त्यातूनही त्यांनी आणि त्यांच्या परिवांराने प्रयत्नांची पराकाष्ठा करून आणि पैसा खर्च करून त्यांना त्या आजारांतुन मुक्त करण्याचा प्रयत्न केला. आता मांमीच्या प्रकृतीमध्ये अपेक्षीत सुधारणा झाली होती, प्रकृती स्थिरस्थावर झाली. पण नामदेवरावांना सतत आपल्या पत्नीच्या प्रकृतीबाबत काळजी असायची. या सर्व परिस्थितीचा त्यांच्या प्रकृतीवर सुद्धा परिणाम झाल्यांचे मला आमच्या एका भेटीत जाणवले होते. आमची एका रेल्वे स्थानकांवर अनपेक्षीत भेट झाली होती आणि खर तर तीच आमची शेवटची भेट ठरली.

त्याकाळात आमचे फोनवरून बोलणे चालु असायचे. मी त्यांना माझ्याकडे येण्याचा सारखा आग्रह करायचो. पंरतु मला माझ्या आयुष्यात, इतक भरभरून प्रेम देणाऱ्या या मामांनी त्यांची परतफेड करण्याची एकही संधी मला दिली नाही. माझ्या आयुष्यात एका मित्राची, एका आधाराची आणि एका मार्गदर्शकाची मोठी अशी पोकळी निर्माण करून हा माणुस अनपेक्षितपणे, माझ्यासह अनेकांना एक मोठा धक्का देऊन, जग सोडून गेला. त्यांच्या मुलांकडून कळले की निवृतीसाठी पंधरा दिवस बाकी असंताना, आपली नोकरी करत असतांना कार्यलयातच त्यांना मृत्यूने गाठले होते. मामी तर नामदेवरांवाशिवाय जगण्याची कल्पनाच करू शकत नव्हत्या, परंतु त्यांच्या पश्चात अपुर्ण असलेल्या त्यांच्या जबाबदा-रां पार पाडण्यासाठी त्यांनी हिंमत बांधली. लहान मुलांसाठी योग्य मुलगी पाहुन ठेवली आणि लवकरच साखरपुडा करण्याचा मामींचा मानस होता. मामाशिवाय या जबाबदारां पार पाडणे त्यांच्यासाठी सोपे नव्हते, तरीही उसने अवसान आणून कर्तव्यपुर्ती करत होत्या.

त्यांच्या आजाराने त्यांचेवर संपूर्णपणे ताबा मिळवला होता. एकीकडे आजाराशी लढा देत, तर दुसरीकडे एकेक जबाबदारी पार पाडणे चालु होते. माझ्या एका भेटीत त्यांनी मला सांगीतले. माझ्या जीवनांत आता राम उरला नाही. ते (नामदेवराव) माझी वाट पहात आहेत. मला लवकर गेलेच पाहिजे. हे ऐकतांना माझे डोळे पाण्याने डबडबलेले असायचे. देवानी त्यांची ही इच्छा लवकरच पुर्ण केली आणि जास्त नाही तर फक्त दोन वर्षांच्या कालावधीनंतर त्यांचे निधन झाले. त्या वेळेस त्या आपल्या मुलांसोबत येवला येथे शेवटचे काही उरलेले दिवस घालवत होत्या. मामांचे ज्या ठिकाणी अंत्यसंस्कार झाले अशा त्या बोदवड गावातच आणि त्याच ठिकाणी माझे अंत्यसंस्कार व्हावे ही त्यांची अखेरची इच्छा मुलांनी पुर्ण केली आणि नियतीने फोडलेली ही जोडी स्वर्गातसुद्धा पुन्हा एकत्र झाली. त्यांचे एकमेकांवरील असलेल्या प्रेमाची तुलना या जगात कुठल्याही प्रेमांशी होऊच शकत नाही. मला एक प्रश्न सतत पडत असतो. देव जगातील चांगली माणसे आपल्याजवळ लवकर का बोलावून घेत असतो ?उत्तरही तसेच आहे. जो आवडतो सर्वांना, तोची आवडे देवाला!!

अचानक वाजणाऱ्या या गाण्याच्या ध्वनीने मी भानावर आलो आणि नामदेवरांच्या मुलाला आणि सुनेला आशीर्वाद देऊन मणामणांचे ओझे घेऊन मी माझ्या गावाला परत निघालो.

# महादेव – सुवर्णा सोनवणे, चाळीसगांव

✉ suvrnasonawane777@gmail.com ☎ 7744880087

ज्ञानेश्वरी वाचल्यानंतर असं वाटत की निष्काम कर्मयोगाच्या मऱ्यादा आहेत ज्ञानाला मऱ्यादा नाही. पण पुर्ण ज्ञानाला भक्तीची जोड दिल्या खेरीज ज्ञानाला आनंदात्मक असं स्वरूप येत नाही. आजवर आपण ज्या संत महात्माच्या हातून जे सुंदर लिखाण झाले आहे त्या ग्रंथांचे आपण वाचन करतो त्यांची पुजा करतो.

संत महात्म्याना देव स्वरूप प्राप्त झाले ते त्यांनी केलेल्या भक्तीमुळेच. भक्ती शीवाय ज्ञानाची पुर्ण धारणा होत नाही. ज्ञानाची धारणा झाल्याशिवाय स्वतःचा पूर्ण परिचय मिळू शकत नाही आणि परमेश्वराची खरी ओळख मिळत नाही. परमेश्वराची खरी ओळख मिळाल्या शिवाय त्याची भेट घडू शकत नाही. परमेश्वर एकच आहे, तो सर्व आत्म्याचा एक पिता महादेव ज्याचे मुळ स्वरूप ज्योती रुप आहे. म्हणूनच आपण महादेवाची पुजा ज्योर्तीलिंग स्वरूपात करतो ज्याला स्वतःचा देह नाही आपले मुळ स्वरूप सुद्धा ज्योती स्वरुप आहे. आपण सर्व आत्मा आहोत शरीर नाही हे शरीर कर्म करण्यासाठी मिळालेले साधन आहे. आत्मा शरीराद्वारे कार्य करत असतो. कर्मबंधन संपले की आत्मा एक शरीर सोडून दुसरे धारण करतो शरीर विनाशी आहे आत्मा अविनाशी आहे. म्हणूनच आपण जन्मजन्मांतरापासून ज्योर्तिलिंग स्वंरुपातील महादेवाची पुजा करतो. मुर्ती स्वरुपातील शंकराची नाही. कुठल्याही मंदीरात शंकराची मूर्तीपूजन होत नाही. महादेव आणि शंकर हे वेगवेगळे आहेत शंकराला देह आहे महादेवाला नाही शंकर सुद्धा ध्यान मग्न अवस्थेत महादेवाचेच ध्यान करतो तिन्ही देवाची निर्मिती महादेवानेच केलेली आहे आपण नेहमी ॐनमःशिवाय म्हणतो ॐशंकराय नमः म्हणत नाही. कारण आपण व्दापारयुगा पासुन जन्मोजन्मी महादेवाची म्हणजेच शिव परमात्मा ची पुजा करीत आलो आहे म्हणूनच भारतात सर्वात जास्त महादेवाची पौराणिक मंदिरे आढळतात.

ब्रम्हा निर्माण करता सृष्टीचा विष्णू पालनकर्ता शंकर विनाशकारी जेव्हा जेव्हा नवसृष्टीची निर्मिती होते तेव्हा तेव्हा जुनी सृष्टीचा विनाश शंकराव्दारे केला जातो. ॐ शांती

# धैर्याचे घाव – ओशो

*(वाचलेल्या पुस्तकातील आवडलेले काही उतारे आम्ही प्रसिद्ध करतो. खालील उतारा ओशो यांच्या “पथ प्रदीप” या पुस्तकातील आहे!)*

ज्या व्यक्तीत सहनशीलता नाही ती त्वरित कोसळते आणि ज्या व्यक्तीने सहनशीलतेचे कवच धारण केले आहे, तिला जीवनात प्रतिक्षणी होणारे आघात अधिकच बलवान करीत राहतात.

मला एक गोष्ट माहीत आहे. कुणा लोहाराच्या दारावरून एकदा एक माणूस जात होता. ऐरणीवर पडणाऱ्या हातोड्याच्या घावांचा आवाज त्याच्या कानांवर पडला आणि त्याने आत वाकूनं पाहिले. तुटलेले आणि वाकलेले पुष्कळ हातोडे एका कोपऱ्यात पडलेले त्याला दिसले. जुने झाल्याने किंवा सतत वापरल्याने ते अशा अवस्थेत पडलेले होते.

त्या माणसाने लोहाराला विचारले, “इतक्या हातोड्यांना या अवस्थेपर्यंत पोहोचवावयास आपल्याला किती ऐरणी लागल्या?” तो लोहार हसायला लागला आणि म्हणाला, “अवघी एकच मित्रा. एक ऐरण शेकडो हातोडे तोडू शकते. कारण घाव हातोडे घालतात; परंतु सहन ऐरण करते”

जो धैऱ्याने घाव सहन करू शकतो, तोच शेवटी जिंकतो, हे सत्य आहे. ऐरणीवर पडणाऱ्या हातोड्यांच्या घावाप्रमाणेच त्याच्या जीवनात अनेक आघात निनादत असतात. शेवटी हातोडे तुटून जातात; परंतु ऐरण मात्र सुरक्षित राहते.

**तात्पर्य: धैऱ्याने घाव सहन करा व जीवन जिंका!**

# नागपंचमी ३२ शिराळा! – आशिष कर्ले

३२ शिराळा हे नाव ऐकताच डोळ्यासमोर येते ती नागपंचमी आणि तेथील जिवंत नागाची पूजा! ३२ शिराळा आणि येथील नागपंचमी संपूर्ण देशभरात प्रसिद्ध आहे.

शिराळा हे सांगली जिल्ह्याच्या पश्चिम भागातील एक गाव आहे, हे गाव अतिशय छोटे खेडेही नाही आणि अतिशय मोठे शहरही नाही, शिराळा हे ग्रामीण परंपरा जपणारे एक गाव आहे जे तालुक्याचे ठिकाण आहे. शिराळा हे जरी सांगली जिल्ह्यातील गाव असले तरी ते अतिशय पश्चिम भागात असल्याने कोकणाच्या अगदी जवळ आहे, त्यामुळे शिराळयाला मिनी कोकण असेही म्हटले जाते. शिराळा हे एक ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळी ३२ गावांचा कर येथे जमा केला जायचा त्यावरून गावाला ३२ शिराळा असे नाव आहे. गावात समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुती मंदिरापैकी एक वीर मारुती मंदिर आहे. संभाजी महाराजांना कैद करून घेऊन जात असताना त्यांना सोडवण्यासाठी शिराळा मध्ये प्रयत्न झाला होता.

शिराळा मधील नागपंचमी तर संपूर्ण देशभरात प्रसिद्ध आहे. नावनाथांपैकी एक गोरक्षनाथ महाराज यांनी येथील नागपंचमी सुरू केली आहे, इतकी प्राचीन परंपरा या नागपंचमीला लाभली आहे. गोरक्षनाथ महाराज भिक्षा मागण्यासाठी आले होते महाराज दारात उभे होते. त्यांना भिक्षा वाढण्यासाठी वेळ लागला. महाराजांनी याचे कारण विचारले असता मातेने सांगितले की आज नागपंचमी आहे त्यामुळे पूजा करायची असल्याने वेळ लागला. त्यावर महाराजांनी आशीर्वाद दिला व जिवंत नागाची पूजा सुरू केली व तेंव्हापासून ही नागपंचमी सुरू आहे.

नागपंचमीच्या एक महिना आधीपासूनच येथे नागपंचमीची तयारी सुरू होते. अंबाबाई मातेच्या मंदिराचे कौल लावल्यानंतर नाग पकडायला सुरवात केली जाते. पकडलेले नाग गडग्यामध्ये ठेवले जातात. नागाला कुठलाही त्रास व इजा होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली जाते. नागपंचमी संपल्यानंतर नागाला पुन्हा सुरक्षित रित्या पकडलेल्या ठिकाणी निसर्गात सोडले जाते.

येथील नागपंचमी ही शास्त्रीय पद्धतीने केली जाते. शिराळकर जाणतात की नाग हा दूध पित नाही त्यामुळे नाग दूध पितो अशी कुठलीच अंधश्रद्धा येथे नाही! खास नागराजाला खाण्यासाठी बेडूक पकडले जातात.

शिराळा व पंचक्रोशीत कुठेही जर साप आढळला तर त्याला मारले जात नाही. त्या नागाला पकडून सुरक्षित रित्या सोडले जाते. कित्येकदा विहिरीत पडलेले, जखमी झालेल्या नागांना पकडून त्यांच्यावर उपचार करून निसर्गात सोडले जाते. असे हे शिराळा व तेथील प्रसिध्द नागपंचमी ही आता कायद्याच्या बंधनात सापडली आहे. शिराळयातील नागरिकांचा आपली ही प्राचीन परंपरा कायदेशीर रित्या पुन्हा सुरू करण्यासाठी लढा सुरू आहे.

## डिस्कव्हरी वाहिनी मराठीत! – आशिष कर्ले, शिराळा

सर्व मराठी बांधवांच्या मागणीमुळे तसेच मराठी बोला चळवळ, मी मराठी एकीकरण समिती आशा बिगर राजकीय संघटनाच्या प्रयत्नांमुळे आता डिस्कव्हरी वाहिनी मराठी मध्ये उपलब्ध झाली आहे!

डिस्कव्हरी वाहिनी मराठीत कशी पाहाल?

डिस्कव्हरी वाहिनी मराठी मध्ये पाहण्यासाठी तुम्हाला डिस्कव्हरी वाहिनी सुरू केल्यानंतर तुमच्या डीटीएच किंवा केबलच्या सेटअप बॉक्सच्या रिमोटवरील निळे बटन दाबून मराठी भाषा निवडावी लागेल!
जर तुमच्या सध्याच्या पॅकमध्ये जर डिस्कव्हरी वाहिनी नसेल किंवा मराठी मध्ये ऑडिओ फीड दिसत नसेल तर डीटीएच किंवा केबल ऑपरेटरशी संपर्क साधा!
धन्यवाद!

# मी का  लिहिते? - अंजना कर्णिक,  मुंबई

✉ anjanakarnik@gmail.com

मी का  लिहते? असा प्रश्न मी कधीकधी स्वत:लाच विचारते!
उत्तर शोधायला गेले की नवे वाटत स्वता:शीच संवाााद   साधायला मी लिहते वा दुसऱ्यापर्यत पोचताच येत संवादातून!
संवाद  साधूनही समोर योग्य  तो परिणाम होत नाही म्हणून  निरुपायाने अधिक जणांपर्यत पोचण्यासाठी लेखणी हातात घेते?
कधी कधी आपल्या मनातलं  दुसऱ्या  कोणाला सांगावं, तोंडची वाफ दवडावी तर समोरच्यानी ते ऐकावं अस घडतही नाही!
मी तेंव्हा मात्र नक्कीच लिहते जेंव्हा मी अस्वस्थ असते पार आतून!
सभोवतालच्या  चक्रावून टाकणाऱ्या हिंसेमूळे,  दंगलीं,  जाळपोळ,  खून मारामाऱ्या अशा  भेसूर घटनांमुळे. दुबळयांवर  घडणाऱ्या अन्यायामूळे मी फार चिंतेत पडते.  हतबल वाटत मला.
अजाण पोरींवरच्या राक्षसी अत्याचारानी मी घुसमटते.  अशा वेळी काही कृती जर मी करु शकत नसेन तर माझ्या लेखणीलाच धार लावते मी.
मन विचारांनी,  भावनांनी भरभरून वाहू  लागल की लिहते! मना शून्यता दाटली की लिहते.

शाळेत शिकवत असताना नोकरीची तीस बत्तीस वर्ष प्रत्येक विद्यार्थी मला टोचत असे! ‘माझ्यावर लिही’ अस मला डोळयातून विनवत असे.  कधी कोणाची लेक  ऐन दहावीच्या वर्षात परिक्षा न देताच बोहल्यावर ढकलली जाण्याच्या संकटात पडे.  तिला त्यातून सोडवण्याचं अवघड काम करताना आम्ही सहकाऱ्यांनी  केलेला झगडा, संघर्ष, मिळालेल यश वा अपयश मला शब्दबद्ध करायला भाग पाडायच! कधी सुशिक्षीत कुटूंबातील गृहिणी शेजारच्या घरात मार खाताना गुरासारखी ओरडायची,  तिची सुटका केली,  तिला घरात आश्रय दिला,  तिचं दु:ख हलकं करायचा प्रयत्न केला तरी मनात प्रचंड खळबळ भरुन राहायची.

मग अशा वेळी तिचच मन माझ्या लेखणीतून झरायच.  कोणा गरीब विद्यार्थीनीस  जट राखून जोगतीण बनवण्याचा घाट पालकच करायचे! तिची सुटका झाली तरी माझ्या रात्री झोपेविना! ती पोर यायची आपली कैफियत घेऊन माझ्या लेखणीकडे!
माझे कथासंग्रह ‘प्रकाशवाट’ आणि ‘ज्याचा त्याचा संघर्ष’ अशा अनेक जीवनाच व्याकुळ करणार चित्रण आहे. आणि ते वाचणाऱ्याला विचार व कृती करायला ऊद्युक्त करेल एवढ नक्की!

कुचंबणा, अन्याय, भ्रष्टाचार एक ना अनेक कारणांनी जशी अस्वस्थ होऊन मी लिहते तशी या जगात जे सत्यम शिवम सुंदरम आहे ते मला कागदावर शब्दबद्ध करावस वाटत. जगवणारा पाऊस, रंगीबेरंगी निसर्ग, स्वर्णरंगी सुर्योदय, रंगगंधाची ऊधळण करणारे श्रावण आणि वसंत तर माझ्या कवितेत वारंवार डोकावतातच. पण जाळणारा ग्रीष्म, गोठवणारा, निसर्गाला ऊजाड करणारा शिशिर, भयाण वैशाख हे ही खुणावतात. कष्टकरी भूकेलाच राहतो, बहूमजली घरं बांधणारे मजूर बेघरच राहतात! भूमीची सेवा करणारा बळीराजा कर्जबाजारी होतो. कुटूंबास निराधार करुन प्राणत्याग करतो. ते दु:ख लेखणीतून उतरल्याशिवाय रहात नाही!

'वाचेल तो वाचेल' अस म्हणतात! मला तर वाटत, 'वाचेल तो लिहणारच' नक्की! पुस्तकांच किती अफाट विश्व पसरलेय सभोवती. जे वाचलं त्यावर, त्याबद्दल लिहावसं वाटतंच. त्यातल्या खऱ्या, काल्पनिक घटना, पात्र मनाला अस्वस्थ करतात! कधी भावतात तर कधी नकोशा वाटतात! ते ही कागदावर परिक्षणाच्या रुपात ऊतरतच!

शालेय वयापासून घरात, शाळेत राष्ट्रसेवादलासारख्या चरित्र घडवणाऱ्या सस्थेत वावरताना लिहावस वाटायच. कुवतीप्रमाणे लिहायला लागायची. पुणे येथील एस. पी कॉलेज मधे आणि विद्यापीठात असंख्य पुस्तक वााचता वाचता लेखणीकडे मन वळल आणि मी लिहु लागले. आता जगभर प्रवास करताना, सामाजिक संस्थांमधून काम करताना नवनव्या माणसांना जाणून घेताना , देशांना पाहताना निसर्गात रमताना ते लेखणीबद्ध करावस वाटतच!

आणि आता निवृत्तीनंतर तर लेखन हाच माझा श्वास झाला आहे. तो संपला की लिहणं संपेल!

# आईचे घर – मंजुषा सोनार, पुणे

✉ sonar.manjusha@gmail.com ☎ 9767676972

*(लेखिका अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासक, ज्योतिष विषयातील पदवीधारक तसेच अंकशास्त्र प्रवीण आहेत)*

स्वत:ला विसरून मुलांना घडवणारी, त्यांच्यावर संस्कार करणारी असते ती आई! आईचे व मुलांचे नाते जन्मोजन्मीचे असते. आपल्याला जीवनातील पहिला धडा आईच शिकवीत असते. परमेश्वराला एकच वेळी सर्व घरांकडे लक्ष देता येत नव्हते म्हणून त्याने आईला बनवले. आई हीच आपल्या जीवनाचा पहिला गुरु होय. तिच्या पंखाखाली आपण लहानाचे मोठे होतो. चूक झाल्यास आई आपल्याला आपल्या भल्यासाठी शिक्षाही करते. संतांनी देखील आईच्या मायेचे गोडवे गायले आहेत. तुकाराम महाराज म्हणतात, "माता गुंतली कामाशी, चित्त तिचे बाळापाशी! पिलू घेउनी उदरी, वानर हिंडे झाडावरी!" मातृत्व हीच स्त्रीची मुक्ती असते. आईच्या अस्तित्वाच्या खुणा प्रत्येक घरात असतात. प्रत्येक मनात असतात. घर हे आईच्या कुशीतून जन्म घेते. अशा घरला गंगेचे पावित्र्य लाभलेले असते. आईचे प्रेम निस्वार्थी असते, तिच्यामुळेच जगण्याला अर्थ प्राप्त होतो.

सर्वात सुंदर नाते आई आणि मुलांचे असते. आई म्हणजे असे रसायन की जिच्या कुशीत गेल्यावर आपल्या आयुष्याचा जीवनपट खुलतो आणि तिच्या कुशीत गेल्यावर स्वर्गीय सुखाचा ठेवा गवसतो. आई स्वत:ची दु:खे बाजूला ठेऊन कुटुंबासाठी झिजते. तिच्यात समर्पण वृत्ती असते म्हणूनच घराचे घरपण टिकते!

"आई म्हणजे मंदिराचा कळस, अंगणातील पवित्र तुळस, वेदनेनंतरची पहिली आरोळी म्हणजे आई, वाळवंटातील थंड पाणी म्हणजे आई!"

आमच्या लहानपणीचा तो काळ होता सत्तर आणि ऐंशीचे दशकाचा! माझी आई एक उत्साहाचा खळाळता स्त्रोत होती, तिला आळस म्हणून काही माहितीच नव्हता. माझ्या वडिलांची नोकरी खेड्यात. आम्ही ५ बहिणी. आमचे सर्वांचे प्राथमिक शिक्षण खेड्यात झाले. नंतर आम्ही पुढील शिक्षणासाठी मालेगांव येथे भाड्याच्या घरात राहू लागलो आणि नंतर मग घर विकत घेतले. माझे वडील कामाच्या ठिकाणी राहायचे आणि शनिवार रविवार असे दोन दिवस घरी येत आणि सोमवारी डबा घेऊन जात. त्यामुळे घराची वा आम्हा मुलींची जबाबदारी आईवर पडली. भाजी आणण्यापासून ते दवाखाना, आल्या गेल्यांचा पाहुणचार वगैरे तिलाच करावे लागे. आजीसुद्धा आमच्याकडे होती. तिला वेळेवर खायला देणे, औषध देणे आणि घरातील सर्व कामे हे सर्व आईच करत असे.

सायंकाळी साडेपाच वाजता आम्हा मुलींची शाळा सुटत असे. त्यानंतर तिला सर्व कामाचे नियोजन करावे लागत असे. आम्ही मुली घरी येईपर्यंत ती आम्हा मुलींसाठी जेवण आणि घरातली बरीचशी कामे करून ठेवत असे. त्यानंतर ती आम्हा मुलींचा अभ्यास घ्यायची. माझ्या आईने काटकसरीने संसार केला, मग ते आमचे

शिक्षण असो वा घरखर्च! प्रत्येक गोष्टीत तिचे उत्तम नियोजन होते. आम्हा मुलींना तिने शिस्त लावली, स्वत:ची कामे स्वत: करण्याची सवय लावली तसेच अभ्यासाची गोडी लावली. आम्हा मुलीना ती शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रम असो वा स्पर्धा यात भाग घेऊ द्यायची. सर्वांची तयारी करुण घेण्याचे तसेच प्रोत्साहन देण्याचे काम माझी आई करायची. आम्हा बहिणींमध्ये मी सर्वात लहान. मी बी. ए. ला कॉलेज ला पहिली आली. “यशवंत देव” यांचे तर्फे माझा सत्कार झाला. खरे तर ही माझ्या आणि तिच्या प्रयत्नांना आणि कष्टांना मिळालेली पावती होती. घरातील जबाबदाऱ्या निभावणे व त्या उत्तमरीत्या निभावणे या सगळयांवर तिने लक्ष दिले. नातेवाईकांचे लग्न, कौटुंबिक कार्यक्रम यातला तिचा सहभाग नेहमी उत्साही असायचा आणि आताही वयानुसार आहे.

माझ्या आईला अध्यात्माची प्रचंड आवड! चारीत्रावचन, ग्रंथवाचन हे आमच्या घरात नेहेमी व्हायचे. श्रद्धेमुळे अंगी नम्रता येते असे आई नेहमी सांगते. तिला पाककलेचीही खूप आवड. दर रविवारी नवीन पदार्थ असायचा. आम्हा मुलीना तिने विविध लोणचे, भाज्या, कोशिंबिरी, मुरब्बा, चटण्या, पापड शिकवले आणि हे पदार्थ आमच्या घरात कायम असतात. आमच्या घरासमोर छोटा बगीचा आहे.

करियर विषयी निर्णय घेतांना तिने आम्हा मुलींवर कसलेही बंधनं घातली नाहीत. आम्ही स्वत:च्या पायावर उभे राहून स्वावलंबी व्हावे यासाठी माझी आई व वडील दोघांनी आम्हा सर्वाना सतत पाठींबा दिला. लग्न होऊन आम्ही आता आमच्या घरी आलो तरी मागे वळून पाहता आईने केलेल्या त्याग आणि आमच्या प्रगतीसाठी तिने केलेली तडजोड आम्ही कधीही विसरू शकत नाही. आम्हा मुलींचे सणवार, बाळंतपण अगैरे याच घरात गेले. आईचे घर! जगण्याचे धडे आईने दिले. त्याचा फायदा आज होतो आहे. आजही आई वडील आमच्या सुख: दु:खात धावून येतात.

# माझ्या काळातील श्रावण - शरयू वडाळकर, मालेगांव

✉ sharayu.vadalkar@gmail.com ☎ 9527892995

*(लेखिका ज्येष्ठ गृहिणी आहेत. त्यांचे लेख सातत्याने नाशिक महाराष्ट्र टाईम्स मध्ये प्रसिद्ध होत असतात. त्यांना धार्मिक, आध्यात्मिक विषयाची फार आवड आहे)*

"हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या मखमालीचे"

साधारण 1960 चा काळ. श्रावण महिना आला म्हणजे उपवासाचा व व्रतवैकल्यांचा महिना. कुणाकडे हरतालिका असो वा मंगळागौर, बारसे असो किंवा देवाला फुले लागोत, "अहो जा की बेलपत्री व फुले आणायला भुजबळ यांचे मळयात तेथे हमखास आपले काम होईल" असे सर्वजण म्हणत.

माझ्या वडिलांचा मळा म्हणजे जळगाव जामोद या खेडेगावाचा केंद्रबिंदू. त्याला कोणी नंदनवन म्हणत. प्रवेशद्वाराजवळ मोठी बोगनवेल व गुलमोहर आपले स्वागत करीत असे. उजव्या बाजूला लाल कन्हेर, पांढरा कन्हेर आणि त्याच्यापुढे चांदणी दुधी मोगरा, नंतर डाव्या बाजूने जाईजुईचा मंडप व चमेली त्यावर दिसणारी पांढरी शुभ्र सुवासिक फुले. व नंतर पारिजातक. सुवासिक फुलांची उधळण बघून तर असे वाटत होते की सर्व आसमंत सुगंधाने दरवळला आहे.

पावसाळयात तेरडा बहरतो. गुलाबी शेंदरी केशरी पांढरा जांभळा अशा विविध रंगाच्या फुलांचे ताटवे बघितल्यावर असे वाटे की निसर्गाने रंगीबिरंगी फुलांचा गालीचा तयार केला आहे. हिरव्यागार वेलीवर केशरी गुलाबी जांभळया रंगाची फुले त्यावर रंगीबेरंगी फुलपाखरे इकडून तिकडे उडत. ही फुलपाखरेसुद्धा विविध रंगाची असत. काळा व त्यावर पांढरे ठिपके नंतर पांढरा व त्यावर काळे ठिपके असलेली, तसेच विविध रंगसंगती असलेली विविध रंगाची फुलपाखरे बघितल्यावर मंत्रमुग्ध होई. पक्षी किलबिल करीत. मधूनच कोकिळेचे कूजन ऐकू येई. फुलांवर भ्रमर गुंजारव करीत असत पोपटांचे थवे आकाशात उडत असत. चिमण्यांचा चिवचिवाट सुरू असायचा. थोडे पुढे गेल्यावर विहिर. विहिरीला बाराही महिने पाणी भरपूर असायचे. हौदाजवळ झोपडी होती. सखाराम नावाचा गडी तेथे राहत होता तो सर्व मळयाचा कारभार बघत असे. झोपडीच्या बाजूला एक लिंबाचे झाड होते. श्रावणात या हिरव्यागार झाडावर छान लिंबे लागत. जवळ चार-पाच हिरवीगार नारळाची झाडे होती त्यामुळे तेथील सृष्टीसौंदर्य नेत्रदीपक दिसे.

त्यापुढे सर्व पेरूची झाडे लावलेली होती, जवळपास अर्धा मळा पेरूचा होता. नंतर 500 झाडे बोरीची होती. बोरीच्या झाडाची खोडं इतके मोठे होते ते आपल्या कवेत मावत नव्हते. त्या झाडा खाली गेल्यावर ऊन लागत नव्हते, दाट सावली असायची. त्यामुळे ते दृश्य मनोहरी दिसत असे, जणू काही कोणी मंडप घातला आहे असा

भास व्हायचा. पाऊस पडू लागल्यानंतर त्याची शोभा अवर्णनीय दिसत असे. "परोपकार शरीरम्" या उक्तीची आठवण यायची. निसर्गाने वेली फुले वृक्ष नद्या सूर्य चंद्र तारे हे परोपकारासाठी निर्माण केले.

याच मळयाच्या मागच्या बाजूला 100 फुटांवर राजा भ्रतुर्हरीचे देऊळ होते. देवळापासून शंभर ते दीडशे फुटावर संत्री व मोसंबीचा अजुन एक मळा होता. फाटकातून आत शिरताच दुतर्फा मेंदीची झाडे व रामफळांची झाडे होती. नंतर मोठी विहीर होती. विहिरीत रहाटगाडगेची माळ होती. माळेमुळे संत्री व मोसंबीचा झाडाला पाणी जात असे. विहिरीजवळ झोपडी होती, तेथेही एक नोकर राहत असे. झोपडीच्या मागच्या बाजूला कांदे गाजर लसूण मिरची वांगी लावलेली असत. भरताचे अर्धा किलोचे एकच वांगे असायचे व चवदेखील गुळचट असायची. त्यामुळे वांग्याला खूप मागणी असायची. मळयातील संत्री व मोसंबीचे पेटारे मुंबई येथे जात असत, त्यामुळे माझ्या वडिलांचा नावलौकिक खूप वाढला. माल देखील उच्च प्रतीचा असे. संत्री व मोसंबी पातळ सालीची व गोड असतात.

परंतु एके वेळी कोणीतरी खोटे सांगून मधल्यामध्ये पैसे खाल्ले त्यामुळे वडिलांनी मुंबईला माल पाठवण्याचे बंद केले. अकोला खामगाव येथील व्यापारी घेऊन स्वतः घेऊन जात व काही माल गावात खपत असे. रामनवमीला एक बैलगाडी भरुन रामफळे शेगावला जायची. रामफळेदेखील मोठी व गोड होती. पेरू व बंदी बोरे व्यापारी स्वतः घेऊन जात. कित्येक मुले पेरू लिंबू घेऊन खामगावला विकण्यासाठी नेत.

गाई बैल व म्हशी साठी पावसाळ्यात मळयातले गवत रोज बैलगाडी भरुन येत असे त्यामुळे बैल गाई म्हशी धष्टपुष्ट असत. अधून-मधून जनावरांना सरकी मिळत असे त्यामुळे गाई म्हशी भरपूर दूध देत. घरी वापरायला दूध ठेवून काही बंध्या लावलेले असत उरलेले दूध डेअरीवर जायचे.

शेतात तूर भुईमूग ज्वारी राजगिरा उडीद कापूस मूग तीळ भगरी हे धन्य होत असे. त्या बरोबर कांद्याची सुद्धा रेलचेल होती. तिळाचे शेंगदाण्याचे तेल एक नोकर तेलाच्या घाणी वरून पिळून आणत असे. तिळाची वर शेंगदाण्याची ढेप नोकर लोकांना वाटल्या जाई.

चौथ्या-पाचव्या दिवशी एक मोठा कप भरून ताक व्हायचे, ते सर्व गल्लीत व ओळखीच्या लोकांना वाटले जायचे. गल्लीतले लोक ताकासाठी तांबे आणून ठेवायचे. ताक घट्ट व गोड असायचे. ताकावर माझ्या वडिलांनी दोन कुटुंबे पोसली. चक्कीतले पीठ, ताक मळयातील भाजी व फळे इत्यादी एक नोकर त्या कुटुंबाला नेऊन देत असे. ताकाचा व फुलांचा पैसा वडीलांनी कधीही केला नाही. अशाप्रकारे फळाफुलांनी समृद्ध बाराही महिने हिरवेगार दोन्ही मळे असत.

आता पेरणी बद्दल सांगते. प्रत्येक स्त्रीला माहेरचे आकर्षण जास्त असते पावसाळा म्हटला म्हणजे मला माहेरची पेरणीची खुप आठवण येते. माझ्या वडिलांकडे शेती पुष्कळ असल्यामुळे जवळजवळ महिनाभर पेरणी चाले. लवकर उठणे कामाची धावपळ गडी माणसांचे येणे-जाणे, घाईगर्दीच्या दिवस आई. उन्हाळा संपत आल्यानंतर

आमच्याकडे पाहुण्यांची वर्दळ कमी होत असे. शेतीची कामे नांगरणे सूरी होत असे. आणि मग आस लागलेली असते पावसाची! रखरखीत ऊन नको वाटे! आषाढ महिना उजाडतो, शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असतात.

“आखाड्याचे मौसम राहिला उभा, निळी कळी बघा गगनाची शोभा”

पहिला पाऊस पडतो मातीचा सुगंध दरवळतो. वातावरण थंड होते. दोन-तीन पाऊस झाल्यानंतर आमच्याकडे पेरणीची धावपळ सुरू होते. उडीद मूग ज्वारी कापूस तूर भुईमूग तीळ भगर व राजगिरा इत्यादी पिकांची पेरणी होत असे.

सकाळी पाच वाजताच माझे वडील व घरातील मोठी मंडळी उपस्थित नोकर मंडळी म्हशीचे व गाईचे दूध काढण्यासाठी येत. त्या सर्वांना चहा होत असे. काही ठिकाणी बंद्या लावलेल्या असत व उरलेले दूध डेअरीत नोकरी पोचवीत. गाईचे दूध घरी वापरायला असे.

सकाळीच माझी काकू किंवा आई चार-पाच नोकरांसाठी भाकरी, कधी मुगाची डाळ, कधी चवळीची उसळ, मूगवड्या, भाजी भाकरी, बरोबर लोणचे किंवा तिळाची चटणी, कधी शेंगदाण्याची चटणी अशी शिदोरी द्यायची. हे सगळे नऊ वाजेपर्यंत व्हायलाच पाहिजे असायचे. माझा मोठा भाऊ या नोकरांबरोबर शेतात जात असे. चौथ्या किंवा पाचव्या दिवशी ताक व्हायचे. एक बरणी भरून नोकरांसाठी शेतात ताक जात असे कारण पावसाळयाचे म्हणजे रोगाचे दिवस म्हणून ताजे ताक वडील आवर्जून शेतात पाठवीत. ताक म्हणजे अमृत, ते पाचक असते असे माझे वडील नेहमी म्हणायचे.

नोकरांची तब्येत जर बिघडली तर वडील डॉक्टरांकडून औषध उपचार करून घेत. वडील शेतमजूरांवर अत्यंत प्रेम करीत. तेसुद्धा वडिलांवर प्रेम करीत. त्यांच्या अडचणी जाणणे, त्यांना पैशांची मदत करणे, योग्य मार्गदर्शन करणे असे वडील करत. तेदेखील वडिलांना सल्ला विचारीत होतो आणि सल्ला त्यांना पटतही होता.

वडील नेहमी म्हणायचे, काळी जमीन, पाणी व मजुरांचे अथक परिश्रम यामुळेच माझी धान्याची कोठारे भरलेली आहेत.

शेतातून घरी परतल्यावर सर्व मजुरांना चहा होत असे नंतर गाई-म्हशींचे दूध काढून ते घरी जात. अशा प्रकारे पेरणीचे दिवस म्हणजे अतिशय कष्टाचे! नंतर निंदणी व कोळपणी! घरात पीक येईपर्यंत त्याची निगा राखली जात असे. असे हे दिवस कधीही विसरायला होत नाहीत.

# माझ्यातल्या मीचा मान!! - उर्मिला देवेन, जपान

✉ urmiladev@gmail.com

*(लेखिका मुळच्या नागपूरच्या असून IT क्षेत्रात कार्यरत असतात आणि NGO तर्फे समाजसेवा करतात, लिखाण त्यांचा आवडीचा छंद आहे)*

---

**मी, जन्माला आली तेंव्हा मुलगी होती आणि आज परिपूर्ण स्त्री आहे. आणि मला मान आहेच माझ्यातल्या मीचा. का नसावा. ? जर तो मला नसला तर समोरचा कधीच देणार नाही.**

**ही कृतघ्न दुनिया आहे. इथे जन्म देणाऱ्यालाही विकत घेतल्या जातं आणि पालन पोषण करणाऱ्यालाही! इथे आईची आणि मायेची पण किंमत कळत नाही, दाखवून दिल्याशिवाय!!**

**मग मी तर नुसती मी आहे. माझी किंमत मलाच कळली नाही तर कुणाला त्याचं काय?**

दोन महिन्याआधी ह्याच्या मित्राकडे जेवायला आम्ही सर्वच गेलो होता. रती खूप छान गुजराती स्वयंपाक बनवते, हे मला त्या दिवशी समजलं. अगदीच एक एक गुजराती पदार्थच्या नावाने बोम फोडत होती. ढोकला, फाफळा, थेपला, उंधिव तर खूपच चविष्ट बनवले होते. मी तर त्या बोम्च्या हल्याने पार शब्दहीन झाले होते. बापरे!! माझ्याकडचे सर्वच शब्द संपले होते स्तुतीचे. मग मी निनाद ला छेडलं, “मस्त मज्जा आहे रे तुझी, सुगरण बायको गवसली तुला. लकी ना. हुशार आहे रे रती”

त्यावर तो बोलला, “हो ना, आहेच मी. पण तिला नाहीना अजूनही कळत हे की ती स्वतः किती खास आहे”

मग माझा मोर्चा रती कडे वळला, एक ढोकळा हातात उचलत मी स्वयंपाक घरात गेले, “रती, खूप मस्त हा, मला नाही ग जमत एवढं”

त्यावर ती एवढ्या हळू शब्दात म्हणाली, “ त्यात काय एवढ, घरीच तर असते, स्वयंपाकच की तो सर्वच बायकांना येतो. मला हे येत, ते येत असं म्हणायला नाही आवडत मला. माझ्यासारखा अजूनही आहेतच की ह्या जगात”

तिच्या चेहऱ्यावर जराही आनंद नव्हता. तिच्या जागी मी असती, आणि कुणी माझी एवढी स्तुती केली असती तर मी तर अगदीच फुलपाखरू झाले असते. माझ्या हातात फाफळा देवून ती हॉल मध्ये जावून आली.

मला थोडं विचित्रच वाटलं, मग तिचा हातच धरला, “काय ग काय झालं असं बोलायला?”

ती, “काही नाही, हे काय चालायचंच, शेवटी आपण स्त्री आहोत, आपल्याला काहीही उत्तम रित्या जरी आलं, तरी आपले पंख काटले जातात मग कशाला हवेत उडायचं”

मग मीच म्हटलं, “आपण आधी मुलांना भरवत इथेच बसू, तिकडे त्या दोन मित्रांना जरा निवांत. कुठल्यारी प्रोजेक्ट वर बोलणं सुरु आहे. आपण आपला रोजचाच प्रोजेक्ट परत नव्याने सुरु करू. मुलांना भरवण्याचा”

आम्ही दोघी जरा हसलो. मी मुलींना हाक मारली आणि तिने तिच्या मुलांना. तिच्या स्वतःच्या नाराजीचा उगम मला जाणून घ्यायचाच होता. मी परत थेपला हातात घेत तिची मनसोक्त तारीफ केली आणि म्हटलं, “ ये, तू क्लास घेशील का, अगं अजूनही बऱ्याच नवीन मुलींना नाही जमत ग ढोकळा वगैरे. आणि घरी आई बनवते, सहज मिळतात बाहेर, आणि अभ्यासाच्या नादात आणि तारुण्याच्या मस्तीत राहूनच जातं शिकायचं. आता यु ट्यूब आहेच पण अगदीच प्रत्येक्षात बघितल्या शिवाय ढोकळा वगैरे नाही जमत. अजून कुणाला माहित आहे का तुला असं छान बनवता येते म्हणून”

ती खाली बघतच म्हणाली, “ कुणाला कशाला सांगायचं. मी. मी कुचल्याची बी. सांगून काय मग ते मला खूप मान वगैरे देतील का? वाह वाह छान म्हणूंन विषय संपवतील आणि मी जागच्या जागी”

मीही म्हटलं, “ ये रती फार झालं हा तुझं. मग तू तर माझ्यासारखीला काय समजत अशील ग. आगावू ना”

ती अगदीच अगतिकपणे, “ नाही ताई. असं नाही”

मीही शब्दाला उचलतच म्हटलं, “मग कसं अगं? तू तुलाच कळली नाही तर समोरच्याला कशी कळणार? ह्या वेळ नसलेल्या जगात कुणालाच कुणालाच जाणून घेण्याचा वेळ बीळ नसतो. स्वतःला जे येत ते सांगतांनाही स्वतःला मान द्यावा लागतो. समोरचा कशाला मान देईल तुला. तुझा मान तुलाच आधी करावा लागेल. तुला सुंदर कला अवगत आहे आणि तूच त्याला वाव देणार नसशील तर घेवून जाशील का जात्तानी सगळं बांधून”

आता ती हसली. “ नाही ताई, माहेरी आई बाबा म्हणायचे उत्तम स्वयंपाक हे उत्तम गृहिणीच लक्षणच असतं, मग लग्नानंतर सासरी सगळे गुपचूप खायचे. आणि आता आमचं कुटुंब तिकडे राहायला आलं तर तो उत्साह सवयीनुसार संम्पला माझा. आता वाटत आपण कितीही उत्कृष्ट कार्य केलं तरी ते कर्तव्यात मोडणार. मग उगाच कशाला तोरा. आणि मी हे सगळ कुणाला कळावं आणि त्यांनी मला मान वगैरे द्यावा हा उद्देशच नाही ना माझा”

मी, “अग त्याला तोरा म्हणत नाहीच, आपण सर्वांमध्ये काही खास अहो हि भावना मनाला चिरतारुण्य देवून जाते. आणि व्यक्त होण्यासाठी आधी तू स्वतःला मान दे, तूच असं स्वतःला मी स्त्री आहे, मला काय करायचं

आहे? मी काहीही केलं तरी कोण मला मान देणार. ? असं काही नसत, स्वतःचा मान स्वतःलाच द्यावा लागतो, आत्मविश्वास वाढला की मग आपण स्वतःहूनच सुंदर रित्या समोरच्यापर्यंत पोहचतोच"

"आता बघ, मला हा फाफळा नाही बनवता येत, आणि तू मला तो कसा बनवायचा ते सांगितलं तर मला तुझ्याबद्दल आदर वाटेल आणि ती भावना मला तुला सांगायची गरज नाहीच. ती तुझी तुलाच येईल आणि **तेच म्हणजे स्वतःला मान देणं.** अगदीच समोरच्यानं तू आलीस की उठून उभंच व्हावं, असं बीस नाही ग मान म्हणजे. तो स्वतःलाही स्वतःबद्दल आपल्या कामामुळे, गुणामुळे वाटला ना तरी आयुष्य सुंदर होत. तुझ्या एवढ्या सुंदर चेहऱ्यावर जरास स्वतःच्या मीचा मान झडकलना तर तू सर्व सुंदर स्त्रियांमध्येही सुंदर दिसशील. आणि त्याच्यासाठी कुणाच्या स्तुतीची गरजच पडणार नाही"

आमच्या चर्चा रंगतच होत्या तर माझे हे हॉल मधूनच म्हणाले, "अहो मॅडम लेक्चर झालं असेल देऊन तर निघायचं का?" मी तशीच भानावर आले आणि म्हणाले, " ये रती, जरा विचार कर ग, आणि मी जरा जास्त बोलली असेल तर सांग तस. शब्द मागे घेऊ शकत नाही पण सॉरी म्हणायला माझा मान कमी होणार नाहीच" आणि आम्ही दोघीही हसलो.

महिन्या भराने मला रतीचा फोन आला, "ताई तुम्हाला फाफळा शिकायचं होता ना. वेळ असेल तर या ४ वाजता" मी घाईतच होते हो म्हणून फोन ठेवला. तिच्या घरी गेले तर अजूनही काही नवीन मुली होत्या आणि रती त्यान्ना ढोकळा शिकवत होती. खूप उत्साहित होती. सर्वच तिची स्तुती करत होत्या. तिच्या गुणांचं तेज चेहऱ्यावरचं सौन्दर्य फुलवत होत. माझ्याशी खूप बोलायला तिला वेळ नव्हता. आणि माझ्या बोलण्याने तिच्यात बदल झाला आणि तिच्यातल्या मिला मान देत तिने स्वतःचा आत्मविश्वास वाढवला हाच तर माझ्यातल्या मिला मिळालेला मान होता. आणि हे ती समजली होती. एक स्मित हास्य देऊन मी तिथून निघाले. तिच्या सन्मानाची गरज नव्हती मला. कारण **मला मान आहे माझ्यातल्या मीचा.**

मैत्रिणींनो, तुम्हलाही मान असूच द्या तुमच्यातल्या मीचा. कुणासाठी नाहीच स्वतःसाठीच. तुम्ही स्वतःला कळले तरी तुच्यातल्या मिला मान मिळालाच समजा मग तो दुसरीकडून मिळायला वेळ लागत नाहीच. धन्यवाद!!

# श्रध्देला जेव्हा अंधश्रध्देचे ग्रहण लागते! - सुवर्णा सोनवणे, चाळीसगांव

आपला भारत देश विविधतेने नटलेला आणि विविध परंपरेने सजलेला आहे. आपल्या देशात विविध सण त्या त्या धर्माच्या परंपरेनुसार साजरे केले जातात. आपले सण व्रतवैकल्ये म्हणजे आपली संस्कृती. आजच्या युगात विज्ञानाने प्रगतीचे उच्च शिखर गाठले आहे. तरीही आपण संकटकाळी देवाचाच धावा करतो. उदा. आपल्याला ज्ञात आहे प्रदूषणामुळे दुष्काळाचे प्रमाण सतत वाढत चालले आहे तरीही आपल्या ओठी सहज शब्द येतात, " देवा आता तरी पाऊस पाड"

आपणच प्रक्रुतीच्या नियमांच्या विरुध्द जाऊन रस्ते रुंदीकरणासाठी डोंगर फोडू लागलो झाडे तोडू लागलो. विविध औद्योगिक कारखानांचे वाढते प्रदुषणामुळे पावसाचे प्रमाण घटत चालले आहे . तरीही मनात कुठेतरी एक आशा असते देवाच्या क्रुपेची. डॉक्टर सुद्धा ऑपरेशनच्या वेळी पेशंटच्या नातेवाईकांना धीर देतांना म्हणतात, "मी माझ्यापरीने पूर्ण पयत्न करेल पेशंट ला वाचवण्यासाठी बाकी सर्व परमेश्वराच्या हाती" यावरुन स्पष्ट होते विज्ञानाने प्रगतीची उच्च शिखरे गाठली तरी आपण देवा कडे मोठ्या आशेने पाहत असतो.

देवाला मानणारे म्हणजे त्याच्या वर श्रद्धा ठेवणारे आणि त्याच्या कडून अपेक्षा ठेवणारे. देवाला न मानणारे लोक म्हणजे देवा कडून कसलीच अपेक्षा न बाळगणारे लोक आपल्याला पहायला मिळतात.

ज्या भक्तीत निस्वार्थ प्रेम आणि विश्वास असतो तेच श्रध्देचं खरं रुप. ज्या भक्तीत स्वार्थ आणि भीती लपलेली असते ते अंधश्रध्देचं रुप.
ईश्वरावर मनापासून प्रेम करणारे अनेक भक्त होऊन गेले आहे. त्यांना आपण संत म्हणून आजही पूजतो. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत मीराबाई अशी अनेकानेक उदाहरणे आपल्या समोर आहेत. ईश्वरावर त्यांचे नितांत प्रेम होते. त्या प्रेमा पोटी त्यांनी अनेक यातना सहन केल्या. पण त्या यातनांची कधी ईश्वराजवळ तक्रार केली नाही. उलट ईश्वरावरील प्रेमाच्यामुळे त्यांच्यातील सहनशीलतेचे प्रमाण अधिकाधिक वाढतच गेले. संकटांना कधीही घाबरले नाही. ईश्वराधाना हेच त्यांचे जीवन बनले.

आपण ईश्वरावर मनापासून विश्वास ठेवला तर आपल्याला संकटांचा सामना कळण्याचे बळ मिळते. ही श्रध्दा अध्यात्म अध्ययनातून निर्माण होत असते.

अंधश्रद्धा ही आपल्या मनातील भीतीपोटी आणि स्वार्थापोटी निर्माण होत असते. अंधश्रद्धा हे कमजोर मानसिकता आणि मानोविकाराचे लक्षण मानले जाते. जसे रस्त्यावर चालतांना मांजर आडवे गेले तर अपशूकन समजला जातो. आता रस्ता सर्वांसाठी आहे मांजरासाठी ही आहे आणि आपल्यासाठीही आहे. मांजराच्यामनात येत नाही मनुष्य आपल्याला आडवा गेला मला अपशूकन झाला. विचार करण्यासारखी गोष्ट आहे जर मांजराच्या मनात भीती नसते मनुष्याविषयी तर मनुष्याच्या मनातच का अपशकुनाची भीती असावी.

अश्याप्रकारच्या अनेक अंधश्रद्धा मानवाच्या मनात आजही घर करुन आहेत. याचाच फायदा अनेक प्रकारचे भोंदूबाबा घेत असतात. टेबलावरचा टिव्ही आपण खिशात घेऊन फिरतो. पण आजही कमजोर मन भोंदू बाबांच्या भोंदूगिरी ला बळी पडतांना दिसते .

आजही संतती साठी, आर्थिक प्रगतीसाठी भोंदूबाबा च्या दारी जाणारे लोक आपल्याला पहायला मिळतात. त्या अशिक्षित लोक असतात पण सुशिक्षित लोक सुद्धा याला अपवाद नाहीत. अंगात देवीदेवता येतात असे भासवून लोकांची फसवणूक करणारे भोंदूबाबा आजही समाजात वावरताना आढळतात.

मुक्या जनावरांचा बळी देऊन देवाला प्रसन्न करण्याचा आव आणणारे भोंदू बाबा आपल्याला पहायला मिळतात. देवाला आपण माय बाप म्हणून हाक मारतो. मग तो भूतलावरील प्रत्येक प्राण्याचा मायबाप आहे. हे तर सर्व मान्य आहे. मग एका लेकराच्या सुखासाठी दूसऱ्या लेकराच्या जीवाचा बळी कसा स्वीकारेल ? विचार करण्यासारखी बाब आहे. याला कुठेतरी आळा बसला पाहिजे.

डॉ नरेंद् दाभोळकरांनी अंधश्रद्धा निर्मुलन समिती स्थापन केली. अंधश्रद्धा विरोधी कायदा व्हावा निर्पराध जीवांचा प्राण वाचावा यासाठी 16 वर्ष लढा दिला. त्या साठी त्यानी आपल्या जीवाचे बलीदान दिले. तरीही आजही काही लोक अंधश्रध्देला बळी पडतांना दिसतात.

जर एखाद्या व्यक्तीवर संकट आले तर देवच्या आधि पूरोहित आठवतात. मग जन्म पत्रीका पाहिली जाते. संकट मग काहीही असो, पूरोहितांचे उपाय ठरलेलेच असतात. नारायणनागबली, ग्रहशांती, आणि नवचंडी यज्ञ आणि कालसर्पशांती, मला एक कळत नाही, सर्पाचा आणि ग्रहांचा आपल्या संकटांशी काय संबंध ? ग्रह तारे निमुटपणे आकाशातून खालची गंमत पाहत असतात . सर्प मुका प्राणी कसा कुंडलीत शिरतो ? समजतच नाही. मुला मुलीला मंगळ कसा लागतो ? हेच मला कळत नाही, आणि शनीचीच साडेसाती का असते ?. त्यावरचा

उपाय पण हास्यास्पद  सांगितला जातो.  मुलीला मंगळ यंकर आहे.  तीचे लग्न मडक्याशी लावा म्हणजे अनिष्ट टळेल.  काय ते उपाय सुचवतात.  आणि लोक भीतीपोटी तसे करायला तयार होतात

विश्वास देवावर ठेवा  देवाचा बाजार मांडलेल्यांवर नाही.  आपल्या चांगल्या कर्मांवर विश्वास ठेवा.  आणि स्वबळावर विश्वास ठेवा  म्हणजे संकटातून सहज मार्ग सापडेल.

कोणाचे वाईट करु नये, कोणासाठी वाईट चिंतन करू नये. हीच आपल्या संतांची शिकवण ध्यानी ठेवा.  म्हणजे काहीही वाईट घडणार नाही.  आणि आलेल्या संकटांना सकारात्मक द्रुष्टीने पाहण्याचा प्रयत्न करा मार्ग नक्कीच सापडेल.

# 'शिक्षक' नवयुगाचा शिल्पकार! – सुवर्णा सोनवणे, चाळीसगांव

असं म्हणतात, आयुष्यात शिकणे कधी थांबत नसते. आपण सर्वच येणाऱ्या अनुभवातून काहीना काही शिकतच असतोच. आपल्याला घडविण्यात आपल्या पालकांबरोबर शिक्षकांचा अर्धा वाटा असतो. आपल्या आयुष्याला योग्य दिशा देण्याचे काम एक शिक्षकच करीत असतो. म्हणूनच शिक्षकांना गुरु म्हणतात. नव पिढी निर्मितीची मोठी जबाबदारी त्यांच्यावर असते.

शाळा म्हणजे विद्येचे मंदिर त्या मंदिरात विद्येचे दान होत असते. विद्येची देवता म्हणजेच सरस्वती आणि प्रत्येक शिक्षकांच्या मुखातून विद्यार्थ्यांसाठी निघालेले शब्द म्हणजेच सरस्वतीच्या हातातील लेखणीतून निघालेले काव्य . हेच सुर नवपिढी निर्मितीचे कार्य करीत असतात.

असं म्हणतात ज्ञाना पेक्षा श्रेष्ठ दान नाही. हे दान देण्याचे भाग्य शिक्षकांना लाभलेले असते. आईवडिलांनंतर बालकांवर संस्कार घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. ती जबाबदारी कुशलतेने पारपाडण्या साठी प्रत्येक शिकक्षक झटत असतो. माझ्याकडून प्रत्येकवेळी विद्यार्थ्यांच्या बुध्दी ला कोणते नवनवीन भोजन मिळेल! जेणे करून विद्यार्थ्यांच्या बुध्दिचा विकास होईल यासाठी सतत प्रयत्नशील असतो. बदलत्या काळानुसार शिक्षण पध्दतीत सतत बदल होत असतात. सतत अभ्यासक्रम बदलत असतो. नवनवीन विषयांची त्यात भर पडत असते. म्हणून प्रत्येक शिक्षकाला सतत नवनवीन अभ्यासक्रम व शिकवण्याच्या नवनवीन पध्दतींचा सतत अभ्यास करत रहावे लागते. नवीन पिढी घडवून नवं राष्ट्र निर्माण करण्यात शिक्षकांचा मोलाचा वाटा असतो. इथे मला आमच्या दहावीच्या वर्गाला शिकविणाऱ्या सहस्रबुद्धे मॅडमांचा उल्लेख करावासा वाटतो. माझ्या मते त्या एक आदर्श शिक्षिका आहेत. आजही तीस वर्षांनी सुद्धा त्या मला आठवणीत आहेत एक आदर्श शिक्षिका म्हणूनच. घरची जबाबदारी पारपाडून लोकलचा धकाधकीचा दीड ते दोन तासाचा प्रवास करुन त्या शाळेत येत असे. सतत वर्गात उभे राहून शिकविणे, धावपळ करून लोकल पकडणे या मुळे त्यांना वयाच्या पंन्नासाव्या वर्षी पाठ दुखीचा त्रास सुरू झाला. डॉक्टरांना दाखविले असता त्यांच्या पाठीचे काही मणके थोडे तिरपे झाल्याचे आढळले. त्यांच्याकडे नववी व दहावी च्या संस्कृत आणि मराठी या विषयाची जबाबदारी होती. त्या आम्हाला वर्गशिक्षिका म्हणून लाभल्या होत्या आणखी तीन वर्गांना त्या मराठी शिकवत. त्यांना होणाऱ्या त्रासामुळे संस्कृत विषय दुसऱ्या सरांकडे देण्यात आला. पण मराठी हा विषय त्यांच्या कडेच होता. नववी आणि दहावी हे महत्त्वाचे वर्गांना मराठी विषय त्या आधीपासूनच कुशलतेने शिकवत असे. त्यांचे मराठी आणि संस्कृत विषयाला आवश्यक असणारे अवांतर वाचनही खुप होते.

मराठी विषयातील प्रत्येक संदर्भ त्या योग्य उदाहरण देऊन स्पष्ट करण्यात पारंगत होत्या नवनवीन वाचनातील अनुभव सांगून त्यांनी विद्यार्थ्यांची मनं जिंकली होती. वर्गाचा मराठी विषय त्यांच्या कडे असला की प्रत्येक विद्यार्थी स्वतःला भाग्यवान समजत असे. आमच्या दहावी 'ब' या वर्गाची वर्गशिक्षिका म्हणून जबाबदारी त्यांना देण्यात आली. त्यांना होणारा पाठदुखीचा त्रास दिवसेंदिवस वाढतच होता. पण दहावीच्या मराठी विषयाची जबाबदारी त्यांच्यावर होती त्यामुळे त्यांनी कधीही रजा घेतली नाही. त्यांना डॉक्टरांनी सुरवातील सहा महीने संपूर्ण बेडरेस्ट चा सल्ला दिला होता त्यावेळी त्यानी तो नाकारला गोळया औषधे घेऊन शाळेत येणे हा त्यांचा नित्यनियम होता. पण एक जबाबदार शिक्षक म्हणून त्यांनी रजा नकारली. असं नाही की दुसरे कोणी मराठी विषय शिकवू शकत नव्हते. पण विद्यार्थ्यांच्या आवडत्या शिक्षिका होत्या. प्रत्येक वर्ग आम्हाला मराठी साठी त्याच शिक्षक पाहीजे म्हणून हट्ट करीत असे. त्यांनाही विद्यार्थ्यांचा लळा लागला होता. घरची मंडळी त्यांना राजीनामा देण्यासाठी आग्रह करत होते पण त्यांनी त्यांच्या आग्रहाकडे दुर्लक्ष केले.

दहावीच्या वर्गाची जबाबदारी माझ्याकडे आहे आणि माझ्यामुळे माझ्या विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले मला आवडणार नाही. असे सांगून घरच्या मंडळींना गप्प केले. दोन महीने उलटले त्यांचा त्रास दिवसेंदिवस जास्तच वाढू लागला. त्यांनी विद्यार्थ्यांना जास्तीचे तास घेऊन पोर्षण पुर्ण करून आणि मग मी राजिनामा देईल असे सांगितले. त्यांना होणारा त्रास त्यांनी आम्हाला सांगितला आता मला पाठीत असह्य वेदना होत आहेत डॉक्टरांनी पाठीच्या मणक्यांचे अॉपरेशन केले तरच हा त्रास कमी होईल पण तुम्हाला जास्त वेळ उभे राहणे आणि जास्त दगदग करता येणार नाही असे सांगितले आहे वर्गात एक दिवस त्यांनी सांगितले. पोर्षण पूर्ण झाला पण अजून विद्यार्थ्यांची मराठी विषयाची रिव्हिजन अजून बाकी आहे. माझ्यामुळे तुमचे कुठलेही नुकसान होऊ देणार नाही मी राजीनामा देण्याआधी तुमच्यासाठी एक मराठी मार्गदर्शक लिहून काढते.

त्यांची आमच्यासाठीची तळमळ आणि त्यांना होणाऱ्या वेदनाही आम्हाला जाणवत होत्या. सहामाही परीक्षा झाल्या शाळेला दिवाळीच्या सुट्टया लागल्या आणि त्या पंधरादिवसात त्यांनी पाठदुखीचा असह्य त्रास सहन करून त्यांच्या सहज आणि सोप्या भाषाशैली मध्ये 'मराठी सुलभ मार्गदर्शक' नावाचे प्रश्नोत्तरांचे पुस्तक प्रकाशित केले आणि प्रत्येक विद्यार्थ्याला परवडेल अशाच किंमतीत बाजारात प्रत्येक दुकानात उपलब्ध करून दिले. आणि त्यांनी राजीनामा दिला. त्यांची विद्यार्थांसाठीची धडपड ही खरचं प्रत्येकाच्या आठवणीत राहण्यासारखीच आहे.

आजही सहस्त्रबुद्धे मॅडम मला एक आदर्श शिक्षिका म्हणूनच आठवणीत आहेत. अशा गुरूंचे ऋण कितीही गुरू दक्षिणा दिली तरी फिटणार नाही. अशा. विद्यार्थ्यांना दैवत मानणाऱ्या सर्वच शिक्षकांना माझा कोटी कोटी प्रणाम.

# न्यूड: प्रत्येकाने बघावा असा चित्रपट - वर्षा सोनवणे

✉ ssraindrop.sonawane@gmail.com

न्यूड: काल पाहिला. काय बोलू. किंवा काय लिहू. ? जबरदस्त, सॉलिड, हटके.
याही पुढे जाऊन मी म्हणेन. हा चित्रपट म्हणजे डोक्याला शॉट. निशब्द. सुन्न. बधीर. व्हायला झाले, चित्रपट संपला तेंव्हा.

म्हणजे माझ्यासकट सगळेच प्रेक्षक तसेच निशब्द. निश्चल. बसून राहिले होते पाच मिनिटं. संपलेल्या चित्रपटाच्या पडद्याकडे पहात. कुणाला जागेवरून उठावे, हेच भान राहिले नाही. शे वटच्या सीनची ताकदच होती इतकी जबरदस्त.

ही कथा आहे यमुनेची. गावात राहणारी. नवऱ्याच्या अत्याचाराला त्रस्त होऊन, आपल्या दहावी झालेल्या मुलाला घेऊन नेसत्या वस्त्रानिशी घर सोडून शहरात राहणाऱ्या चंद्रक्काकडे आलेली यमुना. चंद्राक्काच करत असलेले न्यूड मॉडेलिंगचे काम स्वीकारते. असे आणि इतकेच मूळ कथानक आहे. परंतु ते दाखवताना दिग्दर्शकाने तो विषय इतक्या वेगळ्या पद्धतीने हाताळला आहे की hats off to him!! असेच म्हणावे असे वाटते.

चित्रपट सुरू होतो, त्यावेळचा पहिला सीन खूप सुरेख दाखविला आहे. पहाटेची झुंजुमुंजूची वेळ. यमुना तिच्या झोपलेल्या मुलाची पापी घेऊन नदीवर निघालीय. नदीवर तिच्या आधीच सात आठ बायका कपडे धूत आहेत. ती नदी, त्या एका तालात कपडे धुणाऱ्या बायका, आजूबाजूला अजुन पुरते न उजडल्यामुळे अंधुकस, काळसर पांढरट दिसणारे आकाश. आजूबाजूला हिरवीगार झाडी, बॅकग्राऊंडला कुणीतरी गात असलेले एक गाणं. आणि नदीत पोहण्यासाठी उतरलेली यमुना. काय लिहावे त्या सीनबद्दल.
अतिशय सुरेख निसर्गसौंदर्य दाखवणारा, पण तरीही गूढ भासणारा. काहीतरी अघटित पुढे घडणार आहे असा संदेश देणारा. उत्सुकता वाढवणारा असा तो सीन.

त्यापुढे जे घडते ते प्रत्यक्षातच पहावे. पण जे घडते ते पाहताना ‘कल्याणी मुळे’ या अभिनेत्रीने रंगवलेली यमुना, त्या पहिल्याच सीनमध्ये मनाची पकड घेते.

माझ्या मतानुसार, हा चित्रपट एकूण तीन टप्प्यात विभागला गेला आहे.

**पहिल्या टप्प्यात:** चित्रपटाची नायिका यमुना. तिचा १० वी झालेला मुलगा. तिचा बाहेरख्याली नवरा. आणि त्याने यमुनेवर केलेले अत्याचार असा आहे.

**दुसऱ्या टप्प्यात:** यमुनेचे मुंबईत तिच्या नवऱ्याला सोडून येणं. आणि काम म्हणून तिच्या वाटेला चंद्रक्काच्या ओळखीने मिळालेले न्यूड मॉडेलिंग चे काम स्वीकारणे हे दाखविले आहे. या मध्ये कल्याणी मुळे या अभिनेत्रीने यमुनेच्या चेहऱ्यावरचे जे वेगवेगळे भाव दाखविले आहेत ते फक्त पहावेच.

शब्द अपुरे पडतील इतका सुरेख अभिनय तिने केला आहे. म्हणजे, सर्व प्रथम चंद्राक्का अश्या प्रकारचे मॉडेलिंग करते आहे हे समजल्यावर तिच्या विषयी वाटणारा राग, पण तरीही तिच्या या अश्या कामाविषयी यमुनेला वाटणारी उत्सुकता. इतर दुसरे काम खूप शोधूनही न मिळाल्यामुळे हे काम स्वीकारल्यावर, प्रथम जेंव्हा ती पोजींगला बसते, त्यावेळी झालेली तिच्या मनाची तगमग. स्वतःचीच लाज, आतून अपराधी वाटत असताना, मुलाच्या शिक्षणासाठी मिळालेलं एकमेव काम करण्याचा निग्रह.

तरीही चित्रकार विद्यार्थ्यांच्या समोर अश्या विवस्त्र अवस्थेत बसताना तिच्या जीवाची चाललेली घालमेल. भीती. या सर्वांचे एकत्रित भाव कल्याणी ने खूपच प्रभावीपणे, चेहऱ्यावरील हाव भावांमधून, डोळ्यांमधून, आणि शारीरिक हालचाली मधून दाखविले आहे.

यानंतर काही काळाने या व्यवसायात स्थिरावलेली, आत्मविश्वास मिळवलेली चित्रपटातील यमुना पाहताना फार सुरेख अनुभूती येते. लाज. भीती. अपराधी भावना. ते थेट आत्मविश्वास. हा प्रवास यमुनेने लीलया पेलला आहे.

छाया कदम यांनी केलेली चंद्राक्काची भूमिकाही अतिशय सशक्त आहे. त्यांचाही अभिनय छानच आहे. परंतु त्या पात्राची लांबी फारशी नाहीय.

**आणि तिसऱ्या म्हणजे शेवटच्या टप्प्यात.**

१. न्यूड मॉडेलिंगमुळे त्यावेळी बिघडलेली थोडी राजकीय आणि सामाजिक परिस्थिती. नसुरुद्दिन शाह यांनी साकारलेली प्रतीकात्मक भूमिका.

२. यमुनेच्या मुलाच्या मनातील प्रश्न. आई नक्की कोणते काम करीत आहे याबद्दल शंका, यामुळे उठलेले त्याच्या मनातील वादळ, त्याने आईशी केलेले असभ्य वर्तन. त्याला आई बद्दल सत्य माहित नसताना उगीचच वाटणारी चीड. आणि

३. या कामातील अनुभव आणि नवीन पोझिंगला बसणाऱ्या मुलीला यमुनेचे मार्गदर्शन. असे एकूण चित्रपटाचे स्वरूप आहे.

संपूर्ण चित्रपटात अगदी पहिल्यापासून ते शेवटच्या सीनपर्यंत यमुनेचे पाण्याशी असलेले, गूढ तरीही आपुलकीचे नाते, दाखविले आहे. ती जेंव्हा जेव्हा दुःखी होते तेंव्हा तेंव्हा पाण्यात उतरते. म्हणूनच शेवटीही मुलाने केलेली अवहेलना सहन न झाल्याने ती पुन्हा पाण्यामध्येच उतरते. इथे मात्र गावातल्या नदी ऐवजी मुंबईचा अथांग, भरती आलेला समुद्र असतो तिला मिठीत घेण्यासाठी. (परंतु चित्रपटाचा शेवट हा नाहीय.)

मला वाटते, सुरेख छायाचित्रण ही या चित्रपटाची आणखी एक जमेची बाजू आहे.

छायाचित्रण इतके छान आहे की काही प्रसंग अगदी ठाव घेतात हृदयाचा.

सर्वात पहिला, नदीवरचा प्रसंग कॅमेरामनने फार सुरेख दाखविला आहे.

त्यानंतरच्या एका सीन मध्ये नवऱ्याने बाहेर, चारचौघात पचकन तोंडावर थुंकल्यामुळे, अपमानित झालेली, जणू तो अपमानच धुवायला नेसत्या वस्त्रात नदीत उडी मारून, तशीच ओलेती बाहेर येऊन पण तरीही अश्लील न वाटणारी, भर गावातून चालत घरी जाणारी यमुना. तिच्या पाण्याने निथळत असणाऱ्या कपड्यांमधल्या ओल्या देहाला पाठमोरं दाखवले आहे. ते पाहताना काय होते हे शब्दातीत आहे.

पोझिंगला बसलेली विवस्त्र यमुना प्रेक्षकांना कुठंही आणि कधीही अश्लील भासली नाही याचे श्रेय, छायाचित्रकाराचे आहे. त्यांनी खूप छान दिशेने ते दाखविले आहे, ज्यामुळे आपल्याला तिचे विवस्त्र असणे अस्वस्थ करत नाही.

आणि तसाच शेवटचा एक प्रसंग. रिप रिप सुरू असलेला पाऊस, सोबतीला खवळलेला, भरती आलेला समुद्र. जणू तो, हिच्याच मनातील भावनिक उलथापालथ दाखवतो आहे. काळजात चर्र करणारा असा तो प्रसंग. हे सगळे फक्त आणि फक्त पाहूनच अनुभवावे असे!

‘कल्याणी मुळे’ या अभिनेत्रीचा जिवंत अभिनय.
रवी जाधव यांचे उत्कृष्ठ दिग्दर्शन.
अमलेंदु चौधरी यांचे अती सुरेख छायाचित्रण.
आणि सचिन कुंडलकर यांची उत्तम पटकथा.

अश्या चार भक्कम खांबांवर उभा राहिलेला “न्यूड” हा चित्रपट प्रत्येकाने जरूर जरूर पहावा असा आहे.
(अगदी अमराठी लोकांनीही बघावा. इंग्रजी सब–टायटलची सोय आहे. )

# न्यूड: एक भावपूर्ण कलाकृती – रिता जोहरापूरकर

परवा ‘न्यूड’ सिनेमा बघायला गेले. अनेक उन्हाळे पावसाळे पाहिलेत. त्यामुळे बघताना त्यात फारसं विशेष नाही वाटले. म्हटलं पोटासाठी, कच्च्या बच्च्यांसाठी नाईलाजाने देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया अनेक चित्रपटातून तसेच प्रत्यक्षातही पाहिल्या. ही तर फक्त मॉंडेलच आहे.

चित्रपट पुढे पुढे सरकू लागला त्याबरोबर विचारचक्रही सुरु झाले. पोटासाठी देहविक्रय करून दुसऱ्या सोबत स्वतालाही बरबाद करणारी एक मजबूर ‘स्त्री'च! तर स्वतःचे शील सांभाळून मुलाच्या शिक्षणासाठी, घरासाठी काबाडकष्ट करून पैपै जोडणारी ही एक ‘स्त्री'च!

पण जेव्हा तीलाच बदफैली म्हणून तीचा नवरा तोंडावर थुंकतो. तेव्हा तीच्यातील आत्मसन्मान जागा होऊन ती मुलासाठी त्याला घेऊन घरदार सोडते व मुंबईत येते. सर्व मार्ग खुंटल्याने नाईलाजाने’न्यूड’बनण्याचा निर्णय घेते.

पहिल्यांदा कपडे उतरवतांना इतके वर्षे तनामनात रुजलेले संस्कार, परंपरा, रुढी यांना धक्का लागत असतांना होणारी तगमग, करु का नको, अशी दोलायमान अवस्था. शेवटी मुलासाठी मनाचा निग्रह करुन गळयातील मंगळसूत्र तोडून सारे भावनांचे पाश तोडून टाकते. जणू त्या विखुरलेल्या मन्याप्रमाणे तीच्या सर्व भावनाही विखुरल्या जातात. तासनतास एकाच अवस्थेत बसतांना पाठीला रग लागल्याने होणाऱ्या यातना चेहऱ्यावर न दाखवता व संकोचामुळे तहान लागली असतांना मोकळेपणाने हात वर करून पाणीही नीट पीऊ न शकणारी, तीची ही अवस्था पाहताना मनात कलवाकालव होते.

दुसऱ्या प्रसंगात यमुनेला खाज सुटते. पण तीला हलता येत नाही. अगदीच असह्य होते तेव्हा दुसरी ‘न्यूड' झालेली आक्का स्वताचे अंग घुसळवुन तीला दिलासा देण्याचा प्रयत्न करते. त्यावेळची त्यांची ती अगतिकता कोणत्याही संवेदनशील मनाला हेलावून टाकेल अशीच होती. पण स्वताला पांढरपेशे समजणारे माझ्या बाजूने बसलेले लोक त्या दृश्यावर फिदीफिदी हसायला लागले. तेव्हा मला माझीच घृणा वाटली.

मनात म्हणाले, “शी! कोणत्या विकृत समाजात राहत आहोत आपण!” खरं तर ते सिनेमा बघायला नाही तर शे दोनशे रुपयात त्यांच्या विकृत नजरेचे पारणे फेडण्यासाठी आले होते.

परिस्थितीमुळे नग्न होऊनही स्वतःच शील जपणारी व शरिराच्या पलीकडे नजर जाऊन आत्म्याच सौंदर्य रेखाटणारी कलाकारांची विशुद्ध नजर. खरचं नग्नतेकडे येवढ्या विशुद्धतेने पाहता येते हे इथेच उमगले.

पण ज्याच्या साठी ती हे सगळे सोसते, तोच मुलगा जेव्हा बापाच्याच वळणावर जाऊन बदफैली ठरवतो तेव्हा मात्र ती आतूनबाहेरुन पार कोलमडून जाते कारण संवेदनशील माणसाच्या मनात आत खोलवर कुठेतरी सत्शील, न्यायप्रिय, आपल्या कष्टाला चांगले दिवस येतील अशी धारणा रुजलेली असते. पण जेव्हा ह्या जीवापाड जपलेल्या धारणेला आपणच मानलेल्या सर्वस्वाकडून तडे जातात, तेव्हा माणूस आतून कोलमडतो.

भली माणसं आणि त्यांची भली दुनिया आपल्या पूरताच विचार करणाऱ्या ह्या आत्मकेंद्रित माणसाच्या दुनियेत कशी कोलमडून पडतात हे दिग्दर्शकाने फार परिणाम कारक दाखविले आहे.

तसेच स्वतःला संस्कृती रक्षक म्हणवणारे इतिहासातील स्त्रियांच्या अब्रुरक्षणाचा विडा उचलणारे जेव्हा ह्या कलाकारांची हेळसांड करून कलाकृतींची वाताहात करुन त्यांना 'संस्कृती भ्रष्टक'म्हणून देशोधडीला लावतात. तेव्हा त्यांना विचारावे वाटते, रोज हजारो गंगा, यमुना, सरस्वती दुर्गा यांची विंटबना होते. तेव्हा तुम्ही कुठे असता? रस्तोरस्ती फुटपाथ, पब, हाँटेलमधे अर्धकपडे कपडे घालून अनेक जण सिगारेट, चरस, दारु वगैरेतून स्वत:च्या स्वैराचाराचा धुव्वा उडवत असतात तेव्हा तुम्ही कुठे असता? जगातील सगळे कलावंत आपले विचार, भावना कलाकृतीच्या आरेखनातून अभिव्यक्त करत असतात! पण सभोवतालचं वास्तव पाहून हे कलावंत व परिस्थितीने आधीच हतबल झालेला सामान्य मानूस घायकुतीला येतो. पार कोलमडतो. हाच 'न्यूड'चा आशय!!

# श्रीराम राघवन: हटके दिग्दर्शक! - राज जाधव, पुणे

✉ meettheraj@gmail.com *(लेखक सिनेक्षेत्राचे गाढे अभासक आहेत)*

अब्बास मस्तानच्या टिपिकल थ्रिलरला सरावलेल्या आमच्या पिढीला 'श्रीराम राघवन', हे एक भन्नाट स्वप्न पडलं ते बरं झालं.

अर्थात, अब्बास-मस्तानने एक काळ गाजवला आणि आजही त्यांच्या काही क्लासिक फिल्म्स फेवरीट लिस्टमध्ये आहेत आणि राहतील. नव्वदीच्या दशकाने अनेक थ्रिलर्स दिले, काही चांगले, काही वाईट, काही ठीकठाक, पण त्यांची एकूण रचना अगदीच टिपिकल आणि ठरलेली असायची. पण, श्रीराम राघवन आला आणि त्याने वेगळा पायंडा पाडायला सुरुवात केली. त्याची वाटच वेगळी होती आणि त्यावर चालायचा प्रवासही. जिथे अब्बास-मस्तान मंडळी काही महत्त्वाचे पत्ते शेवटपर्यंत ताणत ठेवायचे, तिथे राघवन ते पत्ते पहिल्याच काही सीन्समध्ये ओपन करु लागला. त्याचे बरेचसे चित्रपट पाहताना मला याचे अनेकदा आश्चर्य वाटले, की ही गोष्ट आत्ता रिविल झाली नसती, तर पुढे अजून मजा आली असती.

उदाहरणार्थ, एक हसीना थी मध्ये सैफचं कॅरॅक्टर सुरुवातीपासूनच ग्रे शेडचं दाखवणं त्याने पसंत केलं. तो सारिका वर्तकला फसवणार हे आपल्याला जाणवत असतं आणि होतंही तेच. पूर्णतः संस्कारी माणूस जर धक्कादायकपणे बॅड गाय निघाला तर ती टॅक्ट खूप जास्त परिणाम करेल, अश्या काही अलिखित नियमांत आपण जखडलेलो असताना, अश्या वेळी राघवन आपल्यासमोर डॅशिंग, स्टायलीश आणि ग्रे सैफ उभा करतो. सुरुवातीला सैफ जितका सेन्सिबल वाटत असतो, तितकाच तो पुढे मिस्टीरियस होत जातो. तो, त्याच्या चांगल्या, वाईट इराद्यांचा नेमका थांगपत्ता लागू देत नसला, तरी एक शंकेची पाल आपल्या मनात कायम चुकचुकत राहते, जे, 'संस्कारी टू बॅड गाय' या धक्क्यांपेक्षा जास्त भयावह होतं.

हेच जॉनी गद्दारच्या बाबतीतही जाणवतं. गद्दार विक्रमचे इरादे आपल्याला सुरुवातीलाच कळतात. राघवनच्या जागी इतर कुणी असता, तर त्या पाच-सहा साथीदारांवर शंकेची सुई फिरवत फिरवत आपली मजा पाहत बसला असता. पण, या केसमध्ये विक्रम गद्दार आहे हे तो आपल्याला सुरुवातीलाच सांगून बसतो आणि तरीही आपल्याला तितक्याच सफाईदारपणे खिळवून ठेवतो. कारण ही एक गोष्ट रिलीव करून, तो पुढचे अनेक ब्लाइंड गेम्स आपल्यासमोर ओपन करण्याच्या तयारीत असतो, जे या एका धक्क्यांपेक्षा कैकपटींनी उत्कंठावर्धक आणि सरप्रायजिंग असतात.

बदलापूर तर अनेक बाबतीत धक्कादायक प्रयोग होता. लायककडून अनावधानाने झालेला खून, त्याच्या मागावर असणारा आणि बदला घेण्यास आतुर रघू, हे सगळं सगळं स्पष्ट आपल्यापुढे ठेवलं होतं. मग राहिलंच काय थ्रिलरमध्ये? हा विचार येणं, साहजिक आहे. रघू लायकचा बदला घेणार हा सर्वमान्य समज आम्ही आमच्या बुद्धीच्या कुवतीप्रमाणे करून बसलो असताना, लायक आणि रघू यांचं होतं जाणारं रिव्हर्स ट्रान्सफॉर्मेशन हे कल्पनेच्या पलीकडचं होतं.

लेटेस्ट अंधाधूनमध्येही तोच प्रकार. जिथं एखाद्या टिपिकल थ्रिलर लेखकाने आयुषमान आंधळा असल्याचं शेवटच्या अर्ध्या तासात, क्लायमॅक्सच्या आधी रिविल केलं असतं, आणि तो चित्रपटातला सर्वात मोठा धक्का म्हणून सर्वांनी नावाजलं देखील असतं, तिथे राघवनने ते पहिल्या अर्ध्या तासात आपल्याला सांगून टाकलं. शिवाय, त्याला जस्टीफाईड कारणही देऊन टाकलं. कारण, त्याने ही एक गोष्ट सांगून पुढे असणाऱ्या अनेक धक्क्यांच्या मालिकेला आपल्याला तयार केलं, हे, चित्रपट पुढे सरकत गेला की आपल्याला कळतं की त्या धक्क्याहूनही बरंच काही अफलातून आपल्या समोर मांडण्यात आलं आहे.

मला बऱ्याचदा वाटतं अब्बास-मस्तान आजवर आपल्याला थिएटरच्या खुर्चीवर बसवून कल्प्रीट कोण असावा हे न सांगता आपली मजा बघत बसत होते. तर राघवन, आपल्याला त्याच्यासोबत दिग्दर्शकाच्या खुर्चीवर बसवून, ’हा बघ, हा कल्प्रीट आहे, पण खरी मजा वेगळीच आहे, ती बघ’ असे म्हणत आपल्याला त्याच्या खेळाचा एक भाग बनवून टाकतो. आपण त्याच्या नजरेने हे सगळं पाहू लागतो आणि थक्क होतो, मेस्मराईज होऊन जातो.

टीप: ‘यात स्पोईलर्स आहेत’ हे मुद्दाम लिहिलं नाहीये, कारण हे चित्रपट तुम्ही अजून पाहिले नसतील तर तुम्ही खरे चित्रपटरसिक नक्कीच नाही आहात आणि त्यामुळे हे चित्रपट तुम्ही या पुढेही पाहणार नाही, हे मी गृहीत धरतोय. त्यामुळे तुम्हाला स्पोईलर्सने काहीच फरक पडणार नाही (हा ट्विस्ट श्रीराज जाधवनचा होता).

# करिश्माचा करिष्मा - अमोल उदगीरकर

*(लेखक प्रसिद्ध पटकथा लेखक आणि सिने समीक्षक आहेत. त्यांचे लेख महाराष्ट्र टाईम्स सारख्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असतात)*

माझे आई बाबा दोघंही नौकरी करायचे. मी पहिली दुसरीत असेन तेंव्हा फार तर. त्यामुळे जेंव्हा मी शाळेतून वापस यायचो तेंव्हा घरी कुणीच नसल्यामुळे शेजारच्या देशपांडे काकांच्या घरीच जायचो. दुपारचं जेवण वगैरे सगळं त्यांच्याकडेच. देशपांडे काका काकूंना दोन मुली होत्या. मोठ्या मुलीचं नाव संगीता तर छोटीचं वंदना. दोघीनी त्या काळात जवळपास मला दत्तक घेतलं होत. मला खाऊ घालणं, फिरायला घेऊन जाण सगळं त्या दोघीच करायच्या. दोघीना तारुण्यसुलभ कारणांमुळे सिनेमाचे स्वाभाविक आकर्षण फार. आणि आमच्याकडे मराठी सिनेमे क्वचित लागायचे. हिंदी सिनेमेच जास्त लागायचे. माझ्या लिखाणात हिंदी सिनेमे वारंवार येतात त्याचं कारण हे.

त्यावेळेस जुनमध्येच पाऊस यायचा आणि अखंड बरसायचा. चार चार दिवस झड लागायची. तर अशाच एका पावसाळी दिवशी मी असाच शाळेतून आलो तर संगीता आणि वंदनाने मला पटापट जेवू घातलं. गंध पावडर (संध्याकाळच्या फ्रेश होण्याला आमच्याकडचा शब्द ) करून दोघीही मला घेऊन तलरेजा टाकीला घेऊन गेल्या. बाहेर पावसाची झड चालू होतीच. पण एकदा थेट्रातले दिवे मालवले आणि बाहेरच्या पावसाचे आवाज ऐकू येणं पण बंद झालं. पडद्यावर मोठ्या अक्षरात नाव झळकलं (हिंदी, इंग्रजी आणि उर्दू ) मध्ये'प्रेमकैदी'. मला फारस सिनेमातलं कळत नव्हतं. पण संगीता आणि वंदना एकटक अनिमिष नजरेनं सिनेमा बघत होत्या. त्या गच्च काळोखात पण अक्की आणि तायडीचे विस्फारलेले डोळे मला दिसत होते. त्या तीन तासात त्या दोघींसाठी हरीश हा करिश्मापेक्षा पण जास्त बायल्या असणाऱ्या हिरो हा जगातला सर्वात देखणा पुरुष होता. तर करिश्मामध्ये त्या स्वतःला बघत असतील.

मला त्यावेळेस करिश्मापेक्षा मध्यंतरात मिळणाऱ्या फल्लीचं आकर्षण जास्त होत. तर प्रेमकैदी पहिल्यांदा बघितल्यावर मला लक्षात राहिली ते'मेहेंदी रे'म्हणत हात नाचवणारी करिश्मा आणि'तेरे इन ओठो पे क ख ग घ लिखूनगा'हे गाणं. करिश्माशी झालेली ही पहिली एकतर्फी ओळख. नंतर 'अनाडी', गोविंदासोबतचे डझनभर सिनेमे, 'राजा हिंदुस्थानी'(काही विशिष्ट कारणांमुळे ) आणि कित्येक सिनेमात ही ओळख घट्ट होत गेली. अर्थातच एकतर्फीच. करिश्मा ज्या काळात बॉलिवूडमध्ये कार्यरत होती, तो काळ एकूणच स्त्री अभिनेत्यांसाठी आदर्श नव्हता. बहुतेक सिनेमांमध्ये हिरोईन शो पीस पुरती वापरली जायची. हिरोसोबत गाणे गायचे, छान छान दिसायचं आणि एखाद दुसऱ्या प्रसंगात अश्रू ढाळायचे एवढाच मऱ्यादित रोल अभिनेत्रीला असायचा. आणि

करिश्मा पण काही महान अभिनेत्री वगैरे नव्हती. लेट्स फेस द ट्रुथ! करिश्माच्या बहुतेक भूमिकांचा एक ठरलेला साचा होता. ती बहुतेक सिनेमांमध्ये श्रीमंत बापाची बिगडी हुई औलाद असायची. जिला आपल्या संपत्तीचा घमंड असायचा. ती एक तर विदेशात शिकून आलेली असायची किंवा महागड्या गाड्या वेगात फिरवत असायची. केसांना मोहक झटके देत आणि इंग्रजी शब्दांचा भडीमार करत जीवावर आल्यासारखे हिंदी संवाद बोलायची. ‘व्हॉट नॉन्सेन्स’ किंवा ‘शट अप’ ही वाक्य बहुतेक नायकाला उद्देशून ती सतत म्हणत असायची. मग गरीब घरातून आलेला नायक तिला येनकेनप्रकारेण ताळ्यावर आणायचा. मग करिश्मा त्या नायकाच्या प्रेमात पडायची.

करिष्माच्या कारकिर्दीतल्या साठ टक्के भुमीकांचा हा गाळीव अर्क आहे. पण हे सगळं छोट्या शहरातून आलेल्या किंवा खालच्या आर्थिक स्तरातून आलेल्या पुरुषाला प्रचंड सुखावणार होत. अप्राप्य सौंदर्य आपल्याला पण मिळू शकत असा मनाच्या कोपऱ्यात आत्मविश्वास निर्माण करणार. मी वर म्हणल्याप्रमाणे पुरुष प्रेक्षकांना डोळयासमोर ठेवूनच अशा चित्रपटांची निर्मिती होत असल्यामुळे नायिकेला यामध्ये असं दुय्यम स्थान मिळायचं. करिश्माची कर्तबगारी ही की ह्या विशिष्ट’टेम्प्लेट’मधले रोल तिने मोठ्या टेचात केले. तिने अभिनयाचा प्रयत्न केला नाहीच असं नाही. एका टप्प्यात तिने’फिझा’, ’झुबेदा’असे अर्थपूर्ण सिनेमे पण केले. अभिनय पण बरा केलाच. पण करिश्माची ओळख माझ्यासारख्या अनेकांसाठी मासेसची हिरोइन अशीच आहे. आज संगीता माजलगावला असते म्हणे. तिचं वैयक्तिक आयुष्य काही फारस आनंदाचं नाही असं आईकडून कळत. वंदनाला म्हणजे पक्षाघात झालाय आणि अर्ध शरीर कामातून गेलंय. मी पुण्यात आहे आणि काही फार तीर मारत नाहीये. आमच्या तीन टोकांना जोडणारा एक धागा म्हणजे करिश्मा कपूर. द करिश्मा कपूर. करिश्माला आयुष्यात कधी भेटलो तर तिच्यासोबत फोटो काढेन आणि त्या दोघींचा पत्ता शोधून त्यांना पोस्टाने पाठवून दिल हे नक्की. आज पुन्हा पावसाळी दिवस आहे आणि करिश्माचे गाणे ऐकण्याचा माहोल तयार झाला आहे. आज बड्डे आहे. हॅपी बड्डे द करिश्मा कपूर.

लेखाचा दिनांक 25 जून 2019

# साउथचा सिनेमा: रण्णा - अक्षता दिवटे, बंगलोर

✉ adivate484@gmail.com ☎ 7483619155 *(लेखिका खासगी कंपनीत काम करतात)*

दिवस एकामागून एक कसे निघुन गेले कळलेच नाही. आमच्या लग्नाला 4 वर्षे पूर्ण झाली. पण अस वाटत की जणू कालचीच घटना आहे.

तशी मी मराठी मुलगी कॉलेज संपले आणि आमच्या घरच्यांनी माझे लग्न लावुन दिले. गंमत अशी की माझ्या नवऱ्याला मराठी येत नव्हते कारण ते कर्नाटकाचे अणि मला कन्नड येत नव्हते. आम्ही संभाषणासाठी नेहमी हिंदी भाषेचा वापर करायचो. लग्न होऊन सहा महिने झाली तरी आमचे हे नेहमी कामात गुंतलेले असायचे. आमच्या घरी मी अणि हे आम्ही दोघेच. त्यामुळे मला फार कंटाळा यायचा.
एका रविवारी सकाळी आमचे हे लॅपटॉप वरती काम करत असताना मला हाक मारली.

ते : चाय बनाओ.
मी पटकन चहा बनवला आणि चहाचा कप त्यांच्यासमोरच्या टेबलावर आपटला.
आज माझा मूड थोडा खराब आहे ओळखून ते म्हणाले
क्या हुआ? क्या बात है!
मी : आप कभी मुझे घुमाने ले के नही जाते हो. घर मे बैठके बोअर हो जाती हु मै!
ते : आप को पता है ना सारे फॅक्टरी की जिम्मेदारी मुझपे है! चलो कोई बात नाही... आज शाम को सुदीप की राण्णा पिक्चर देखेंगे.

बोलल्या प्रमाणे त्यांनी दोन तिकीट बूक केली. थेटर मध्ये ईतकी गर्दी होती की बापरे” कधी एकदाचा पिक्चर चालु होतोय अस वाटत होतं.

बंगलोर मध्ये पहिल्यांदा मी पिक्चर बघणार होते. आजूबाजूला खूप लोक होती. अणि सुदीप चा प्रचंड कटआउट लावला होता त्यावर फुलांच्या मोठमोठ्या माळा. सुदीप चे फॅन कटआउट वर दुधाचा अभिषेक करत होते. हा काय प्रकार चालु आहे ते मला समजत नव्हते. मी माझ्या मिस्टरांना विचारलं ते म्हणाले.
साऊथ इंडियन पिक्चर मे ये सब कॉमन है! डोन्ट वरी.
थेटर चा एन्ट्री गेट ओपन झाला. आम्ही आत गेलो. पिक्चर चालु झाला.

हा एक असा पिक्चर आहे की जिच्यामधे मनोरंजन, कुटुंबातील प्रेम, अणि सेंटिमेंट आहे.

हा पिक्चर चालू होतो तो एका श्रीमंत विभागलेल्या कुटुंबापासून. कुटुंबातील मुलगी सरस्वती एका गरीब वकीलाशी गुपचूप लग्न करते. हे तिच्या वडिलांना सहन होत नाही त्यामुळे ते मुलीशी असणारे सर्व नाती तोडतात. या घटनेला जवळजवळ 25 वर्षे उलटली पन याचा पश्चाताप त्यांना होत असतो. त्यांचा नातू सुदीप (कन्नड सुपरस्टार सुदीप) त्यांना वचन देतो की सरस्वतीला परत घेऊन येईन.

आजोबांना दिलेल्या वचनाप्रमाणे तो आपल्या सरस्वती आत्या ला शोधतो. अणि सरस्वती आत्या खुप जिद्दी असतात. सरस्वती आत्या चा राग शांत करण्यासाठी व त्यांना परत घरी घेऊन जाण्यासाठी त्याला आत्याच्या घरात शिरण्याचा एक मोका हवा असतो. जेव्हा सरस्वती आत्या घर सोडुन आल्या होत्या तेव्हा सुदीप लहान होता. आता मोठेपणी तो कसा दिसतो ते सरस्वती आत्या ना माहीत नसते. या गोष्टीचा फायदा घेऊन तो ड्रायवर चंदू बनून आत्याच्या घरी एंट्री घेतो. सरस्वती आत्या च्या दोन मुली असतात. मोठ्या मुलीवर त्याला क्रश होतो. मोठ्या मुलीच्या रोल हरिप्रिया (प्रसिद्ध कन्नड अभिनेत्री) यांनी केला आहे. अणि छोट्या मुलीचा रोल (रचिता राम) यांनी केला आहे. सुदीप ड्रायवर म्हणुन काम तरी मिळवतो पण कोणती गाडी पेट्रोल वर चालते कोणती डिझेल वर हे त्याला माहीत नसते. आत्याच्या घरच्यांनी भाजी आणायला सांगितले तर कोणत्या भाजी ला काय म्हणतात हे त्याला माहीत नसते. त्यासाठी सुदीप एक बॅकअप टीम तयार करतो.

सरस्वती आत्या कर्जबाजारी झालेल्या असतात कर्ज चुकविण्यासाठी त्यांच्यावर दबाव वाढत जातो त्यासाठी त्यांना आपली हॉटेल विकावी लागतात. पण सुदीप जाऊन मारामारी करून हॉटेल परत मिळवतो. काही दिवसातच सुदीप ला कळते की अत्याची मोठी मुलगी दुसऱ्या मुलावर प्रेम करते अणि त्या मुलाचे लग्न ठरलेले असते. ज्या घराण्यातील मुलीबरोबर आत्याच्या मोठ्या मुलीच्या प्रियकराचे लग्न ठरलेले असते ते घराने गुंडगिरी घराने असते. रात्री सुदीप त्या मुलाला आणायला चाललेला असतो तेव्हा आत्याच्या छोट्या मुलीला संशय येतो की एवढ्या रात्री हा गाडी घेऊन जात आहे नक्कीच हा चोर आहे.

गडबडीत तिचा पाय घसरतो तिच्या डोक्याला मार लागतो आणि ती त्याच्या गाडीत पडते. जेव्हा सकाळी ती उठते तेव्हा तिला काहीच आठवत नसते. (पिक्चर मध्ये हा सीन मला खूप आवडला) सुदीप त्या मुलाच्यालग्नात जातो आणि लग्नातुन मोठया मुलीच्या प्रियकराला पळवून आणतो. नंतर त्याला कामावरून काढून टाकले जाते. छोट्या मुलीचे लग्न ठरवले जाते. त्याचवेळी अचानक सुदीप च्या आजोबांची तब्येत बिघडते. काय करावे हे त्याला सुचत नसते. त्याला फक्त एक चान्स हवा असतो अणि नशिबाने त्याला तो मिळतो. त्या चान्स चा वापर

तो कश्या पद्धतीने करतो. सरस्वती आत्याच्या छोट्या मुलीला कसे प्रेमात पाडतो. त्याच्या आई समान असणाऱ्या सरस्वती आत्याला परत घरी कसा घेऊन येतो हे सांगण्यापेक्षा बघण्यात खूप मनोरंजक आहे.
प्रेम हे खूपच पावित्र्य असते. प्रेम करा पण आई वडिलांवर, भाऊ बहिणीवर, कॉलेज मधे टाइमपास म्हणुन कुणावर प्रेम करू नका. जर प्रेम केलेच तर लग्ना साठी आई वडिलांची मान्यता घ्या. उगाच पळुन जाणे गुपचूप लग्न करून आई वडिलांना दुखवू नका. आज काल पळुन जाणे फॅशन बनले आहे. ज्या आई वडिलांनी ईतक्या वर्षे तुमचे पालन पोषण केले त्यांना दुखवून तुम्ही कधीही सुखी राहू शकत नाही. हा या पिक्चर चा सारांश आहे.

# पुस्तक परीक्षण: प्रवाह माझा सोबती – निमिष सोनार

✉ sonar.nimish@gmail.com ☎ 8805042502

*(लेखक IT क्षेत्रांत ISO क्वालिटी ऑडीट आणि कम्प्लायंस क्षेत्रांत कार्यरत असून ते सध्या आरंभ मासिकाचे संपादक आहेत. त्यांच्या तीन कादंबऱ्या आणि अनेक लघुकथा प्रकाशित झाल्या आहेत)*

**पुस्तक परीक्षण:** प्रवाह माझा सोबती

**पुस्तक विषय:** बसद्वारे नर्मदा परिक्रमा

**लेखक:** वेंकटेश बोर्गीकर

**परीक्षक:** निमिष सोनार, पुणे

सप्तशृंगी पब्लिकेशनचे वेंकटेश बोर्गीकर यांनी लिहिलेले “प्रवाह माझा सोबती” हे पुस्तक मी नुकतेच वाचले. त्यांनी जानेवारी 2014 मध्ये बसने केलेल्या नर्मदा परिक्रमेवर आधारित हे पुस्तक आहे. पुस्तकाच्या सुरुवातीला “हिमसेतू टूर्स” च्या श्रीराम दीक्षित यांच्याशी लेखकाची झालेली भेट, जास्तीत जास्त लोकांनी नर्मदा परिक्रमा करावी ही डोंबिवलीच्या श्रीराम दिक्षितांची तळमळ तसेच नर्मदा नदीचा उगम, तिचे लग्न याबद्दल विविध पौराणिक कथा, तसेच परिक्रमेचे नियम आणि नदीची भौगोलिक माहिती हे सगळे वाचायला मिळतो. हा भाग वाचायला खूप रंजक, माहितीपूर्ण आणि उत्कंठावर्धक झालेला आहे.

लेखकाची लिहिण्याची शैली अशी आहे की वाचकाला सुरुवातीपासूनच मूळ मुद्द्यावर आणून लगेच वाचनात गुंतवून टाकते. तसेच प्रत्येक स्थळाची ऐतिहासिक आणि पौराणिक पार्श्वभूमी अगदी ठळकपणे आणि रंजकपणे लेखक आपल्याला सांगतात. त्यामुळे एक विशिष्ट वातावरण निर्मिती होते. प्रवासवर्णन किंवा स्थलवर्णन वाचतांना त्यामागची कथा न जाणून घेतल्यास ते अपूर्ण राहाते. भूगोल आणि इतिहास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे माझे मत आहे.

संपूर्ण पुस्तक वाचतांना जाणवत राहतं की लेखकाने एकूणच पुस्तक लिहिण्यापूर्वी खूप सखोल अभ्यास केलेला आहे. लेखक माहिती देतात की नर्मदा नदी ही मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात अशा तीन राज्यांतून वाहते आणि ती सर्वात प्राचीन आणि पौराणिक महत्त्व असलेली नदी असून ती सर्वात पवित्र नदी आहे.

आता पुस्तकात थोडक्यात कोणकोणत्या ठिकाणांबद्दल वर्णन आहे ते पाहू!

ट्रेनने मुंबई सेंट्रल येथून उज्जैनला जाऊन नंतर बसने प्रवास सुरू होतो. दक्षिण तटावरून परिक्रमा सुरू झाल्यावर प्रथम आपल्याला उज्जैन येथील धार्मिक स्थळे यांची माहिती वाचायला मिळते. मध्य प्रदेशातील अमरकंटक (उगम), ओंकारेश्वर आणि नेमावर असा क्रम. नंतर शहादा, प्रकाशा, शूळपाणेश्वर, राजपीपला येथील हरिसिद्धीमाता मंदिर, अंकलेश्वर, भरुच असा प्रवास होतो.

मग उत्तर तटावर नारेश्वर, कुबेर भंडारी मंदिर (जेथे गाभाऱ्यात फक्त स्त्रियांनाच प्रवेश आहे), टिळकवाडा आणि गरुडेश्वर. मग मध्य प्रदेश खरगोन येथील महेश्वर तसेच अहिल्याबाई होळकर यांचा इतिहास याची माहिती मिळते. मग तेथील जलकोटी आणि दारिद्य दहन शिवमंदिर यांचे वर्णन आहे.

नंतर पुण्याजवळील नारायणपूरचे एकमुखी दत्त मंदिर तसेच मंडलेश्वर, मांडवगड दर्शन, तेथील रेवाकुंड, रुपमती महाल, मंजु आणि कपूर तलाव, तबेली महाल यांचे वर्णन व इतिहास आहे. लेखक राणी रुपमतीच्या दोन वेगवगळया कथा आपल्याला सांगतात.

मग पुन्हा उजैनची भृतुहरी गुफा, तिथून नेमावरच्या दिशेने जातांना सिहोर गांव आणि नेमावरचे सिध्दनाथ महादेव मंदिर, ग्वाल टेकडी यांची माहिती मिळते.

त्यानंतर कुंतीचं माहेर भोजपूर, तिथले भोजेश्वर मंदिर, शिवलिंग आणि मग प्रवाशांनी तिथे केलेल्या मनोरंजनपर कार्यक्रमात काय झाले तेही लेखक सांगतो. त्यातील काही भाग वगळला तर चालला असता असे वाटते.

मग भेडाघाटमधील धबधबा, 64 योगिनी मंदिर आणि घुघुवा जीवाश्म उद्यान यांचे वर्णन येते. मग अमर कंटक येथील विविध धबधबे, कल्याण आश्रम, जैन मंदिर, नर्मदा उगम मंदिर, यंत्र मंदिर, पंचमठ (कर्णमठ) तसेच कुकरा मठ यांचे वर्णन आहे. नंतर शेवटच्या टप्प्यात हुशंगाबाद, टीमरणी, ओंकारेश्वर, इंदौर आणि तेथून पुणे मुंबईला परत असा हा प्रवास संपतो. पुस्तकाच्या शेवटी काही माहितीपर परिशिष्ट दिले आहेत.

एकूणच वाचकांना हे पुस्तक वाचून जणू काही प्रत्यक्ष नर्मदा परिक्रमा केल्याचे समाधान मिळते आणि परिक्रमा करण्यासाठी प्रेरणा सुद्धा मिळते.

# मुलाखत: राजेश बाळापुरे (सोलर पावर जनरेशन प्रोजेक्ट) - निमिष सोनार

*(सोलर पावर जनरेशन प्रोजेक्टबद्दल राजेश बाळापुरे यांची ही मुलाखत निमिष सोनार यांनी घेतली असून राजेश यांना 9823531615 या नंबर वर अधिक माहितीसाठी कॉल करू शकता)*

चिंचवड येथील राजेश बाळापुरे यांनी त्यांच्या बंगल्याच्या गच्चीवर एक प्रोजेक्ट उभारला आहे. सोलर एनर्जी पावर जनरेशन प्रोजेक्ट म्हणजे सौर उर्जा वीज निर्मिती प्रकल्प. ते बघून मी खूप आश्चर्यचकित झालो. असं काहीतरी उपयुक्ततापूर्ण आणि विधायक आपल्या आसपास वापरलं जातंय आणि मला याची कल्पनासुद्धा नाही? आणि विशेष म्हणजे त्यांनी हा प्रोजेक्ट उभारण्यासाठी आधी चार वर्षे अथक संशोधन केले आणि मग हा प्रोजेक्ट उभारला. त्यांनी उभारलेला प्रोजेक्ट सर्वात जास्त खर्चिक आहे. चार लाख रुपये त्यांना खर्च आला. मग मी त्यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरु केली आणि त्यातून जे ज्ञान मिळाले ते मी येथे आपल्यासोबत जसेच्या तसे मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

**राजेश:** हे सगळे सोलर पॅनेल वरच्या बाजूला एलिव्हेटेड आहेत. खांबांवर उभारले आहेत. यातून घरासाठी वीज मिळते.

**मी:** म्हणजे फक्त घरातले लाईट्स लावता येत असतील नाही का?

**राजेश:** फक्त लाईट्स नाही, घरातलं सगळं काही जे इलेक्ट्रिकवर चालू शकतं ते सर्व यातून चालतं. अगदी पंखे, कुलर, इस्त्री, फ्रिज सगळं! आणि सर्वकाही अगदी फ्री!

**मी:** काय? फ्री? कसे काय? अगदी २३० व्होल्टेज मिळतं?

*(मी जरी बी. ई. इलेक्ट्रोनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन शिकलेलो असलो तरीही मला इंजिनीयरिंग कॉलेजच्या पहिल्या वर्षाला इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, सिव्हील असे सगळे विषय होते. त्यामुळे त्या विषयांचे मला थोडे थोडे का होईना नॉलेज आहे म्हणून मी त्यांना अनेक प्रश्न विचारू शकलो)*

**राजेश (हसून):** होय. २३० व्होल्ट, अगदी वीज मंडळाकडून आपण जशी वीज मिळवतो ना अगदी तशीच वीज या प्रोजेक्ट मधून मिळते. फरक काहीही नाही. किंबहुना त्यांच्याच कनेक्शनमधून आपल्याला वीज मिळते. आणि फ्री कसं ते सांगतो. ते असं असतं की हा सर्व प्रोजेक्ट उभारण्यासाठी आधी वीजनिर्मिती मंडळाची परवानगी घ्यावी लागते.

**मी:** पण का? आपण फक्त आपल्या पर्सनल वापरासाठी हे उभारतोय मग त्यांची परवानगी का?

**राजेश:** सांगतो. या प्लांटची वीज इतकी तयार होते की ती वापरून उरते. मग एक्स्ट्राची वीज आपण महामंडळाला वापरायला देतो. त्यासाठी त्यांचे एक वेगळे मीटर बसवलेले असते, त्याला नेट मिटरिंग म्हणतात. त्यात इम्पोर्ट एक्स्पोर्ट चे युनिट मोजले जातात. मग रात्री सूर्य नसतो तेव्हा मग वीज मंडळाकडून आपल्याला वापरायला वीज मिळते. ती आपलीच असते. आपण त्यांना वापरायला दिलेली. शक्यतो आपल्याला पैसे भरावे लागत नाहीत. बिल शून्य येते. पावसाळ्यात वगैरे पण आपल्याला त्यांचेकडून फ्री वीज वापरायला मिळते कारण आपल्याकडे तयार झालेली जास्तीची वीज आपण त्यांना देत असतो तीच ती पावसाळ्यात आपल्याला देतात.

**मी:** अरे वा. ही तर कमाल झाली.

**राजेश:** आणखी कमाल तर पुढे आहे. ऐका जरा. आता हे बघा, मी हे जे पाणी गरम करण्यासाठी मोठ मोठे रॉड लावलेत (सोलर वॉटर हिटिंग प्लांट) ते आता हळूहळू कालबाह्य होतील. कारण ते खूप जागा व्यापतात. आणि मला एक सांगा फक्त पाणी गरम करण्यासाठी सोलरचा प्रोजेक्ट लावण्यात अर्थच काय जेव्हा तुमच्याकडे संपूर्ण घरासाठी फ्री वीज मिळते. त्यातूनच गिझर, रॉड आणि इतर नेहमीचे उपकरण वापरून तुम्ही पाणी गरम करा ना! फक्त पाणी गरम करण्यासाठी वेगळे सोलर लावण्याची गरजच संपली आता.

मी विचारात पडलो आणि म्हणालो, “अरे हो! खरंच की! ही विचार मी केलाच नाही!”

**मी पुढे विचारले:** मी हिंजेवडीत फेज थ्री मध्ये नव्याने उभारलेल्या एका कंपनीचे स्वत:चे पावर जनरेशन प्लांट पहिले आहे. तेव्हा त्या कंपनीपर्यंत महामंडळाची वीज पोहोचली नव्हती. त्यात ते डीझेलचा वापर करत होते. त्यासाठी भरपूर जागा व्यापली होती. आणि पावर जनरेशन म्हटलं म्हणजे इंधन म्हणजे डीझेल किंवा मग

पाण्याची वाफ असे लागणारच मग ट्रान्सफॉर्मर्स पाहिजे. पण या तुमच्या प्रोजेक्टमध्ये तर तसे काहीच दिसत नाही आहे, मग मला एक सांगा यातून जी वीज तयार होते ती एसी की डीसी?

**राजेश हसून म्हणाले:** सगळी वीज डीसी तयार होते. पण सगळीकडे इन्व्हर्टर आहेत. आधी डीसी तयार होते मग एसी मध्ये रुपांतर. काम सोप्पं झालं.

मला एकाहून एक सुखद आश्चऱ्याचे धक्के बसत होते. नवीन नवीन नॉलेज मिळत होतं.

**पुढे राजेश यांनी सांगितलं:** हे सोलर पॅनल उभारताना आजूबाजूच्या बिल्डिंग, झाडे वगैचचा अंधार तसेच सुर्याचे उत्तरायण दक्षिणायन वगैरेचा विचार करून त्यानुसार वर्षभर जास्तीत जास्त काळ जास्तीत जास्त ऊन त्या पॅनल वर कसे पडेल याचा अंदाज घ्यावा लागतो आणि मग त्यानुसार पॅनल उभारावे लागतात. तुमच्या सोसायटीत पण तुम्ही याचा वापर करू शकता.

**मी:** पण आमच्या सोसयटीत तीन पावरफुल बोअरवेल मोटर्स आहेत पाणी खेचण्यासाठी आणि वर टाकीत पोचवण्यासाठी. त्यांना थ्री फेज सप्लाय लागतो, तो कुठून आणायचा?

**राजेश:** अगदी योग्य प्रश्न विचारलाय. हे बघा, या पॅनेलचे तीन वेगवेगळे भाग केलेत. त्या प्रत्येक भागातून तीन वेगवेगळे फेज तयार होत आहेत. ह्या तिन्ही फेजमधली ज्यादाची वीज ही वीजनिर्मिती महामंडळाला जाते आणि हेच तिन्ही फेज मोटरला लावले की झाला तुमचा हवा असलेला थ्री फेज सप्लाय!

**मी:** धन्यवाद राजेश तुम्ही दिलेल्या या सर्व माहितीबद्दल. एकदाच पैशांची गुंतवणूक केली की आयुष्यभर फुकट वीज मिळते. आणि याचा मेंटेनन्स चा खर्च?

**राजेश:** जास्त खर्च येत नाही. तुम्हाला मिळणाऱ्या फायद्याच्या तुलनेत हा मेंटेनन्स चा खर्च नगण्य असा आहे.

*(मी त्यांना निरोप दिला आणि मनात एक नवीन ज्ञानभांडार घेऊन बाहेर पडलो.)*

या संर्भातील फोटो शेवटच्या पानावर बघा.

# रेसिपी: गव्हाच्या पिठाची पौष्टिक बिस्किटे (कुकीज) – उर्मिला देवेन

कुठल्याही चहासोबत मला बिस्किट्स हवीच, पण जेव्हा वजन कमी करण्याच्या प्रक्रियेत मैद्याची बिस्किटे बाधा बनत होती. तेव्हा मी गव्हाच्या पिठाची बिस्किट्स घरीच बनवायला लागले. आणि आता त्यात मी प्राविण्य मिळवलं आहे कारण माझ्या मुलींना तेच बिस्किट्स/ कुकीज हव्या असतात.

आता मुलांना सुट्टी म्हटलं की मुलं सारखी नवनवीन खाण्याची पदार्थ मागतात. मुलाच्या हेल्थ आणि आपली चहाची सोय म्हणूंन आजची रेसेपी. पौष्टिक अश्या गव्हाच्या पिठाची बिस्कीट. कुकीज म्हणू शकतो. बिस्किट्स/कुकीज हा प्रकार जेव्हाही विचारत येतो मैदा लक्षात येतो, आणि मैदयाची बिस्किट्स हे हेल्दी नसतातच. बाजारात मिळणारे सर्वच बिस्कीट मैद्याची असतात शिवाय डालडा वापरून केलेलेही असतील. गव्हाचं पीठ घरी असतंच आणि पोष्टीकही आहे. आणि साजूक तुपातली हि पौष्टिक बिस्किट्स सर्वच वयातल्या लोकांसाठी उत्तम टी टाइम रेसेपी आहे. वजन कमी करण्याच्या प्रक्रियेतहि तुम्ही हे बिस्कीट ग्रीन टी सोबत खाऊ शकता. मी इथे अगदीच दोन्ही पद्धतीने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ओव्हनचा वापर करून आणि गॅसवर तवा ठेवून. तुम्हला जी पद्धत सोयीची वाटते ती निवळा. आणि बनवा खुसखुशीत बिस्किट्स/ कुकीज घरच्या घरी.

**साहित्यः**

२ कप गव्हाचे पीठ,

१ टीस्पून राव.

१/२ कप तूप, किंवा अनसॉल्टेड बटर,

१/२ कप पिठीसाखर,

१ चिमूटभर मीठ,

१/४ बेकिंग पावडर.

१/२ टीस्पून विलायची पूड,

१/४ टीस्पून जायफळ पूड

१/२ कप दूध

१/२ कप आवडीनुसार ड्राय फ्रुट

नोट- गव्हाच्या पीठ आणि साजूक तुपाचे प्रमाण योग्य असावेत, मी कपाच प्रमाण घेतलं आहे तुम्ही, वाटी, स्पून असं काहीही घेवू शकता. पण प्रमाण मात्र ४-१ असेच हवेत. उदाहरणार्थ, चार स्पून गव्हाचं पीठ तर एक स्पून साजूक तूप.

**कृती-**

१. तूप किंवा बटर ला फेटून घ्या, फेटण्याच्या प्रक्रियेमुळे बेकिंग पॉवडरची गरज पडत नाही. पण वाटलंच तर १/४ टीस्पून बेकिंग पावडर वापरू शकता. तूप संपूर्ण फेसाळ झालं की त्यांत साखर टाका आणि परत फेटा, सर्वात महत्वाची स्टेप आहे हि. बिस्किटाचा खुशखुषितपणा ह्या तूप फेटण्याच्या पद्धतीवर अवलंबून असतो. साधारण १० मिनटे. जास्तही देवू शकता. स्टेप १ चा फोटो रेफर करा. जेंव्हा हे मिश्रण आईस्क्रीम सारखं दिसायला सुरुवात होईल तेंव्हा ते तयार आहे पीठ मिसळायला.




२. मग हळूहळू गव्हाचं पीठ आणि सर्व सहित्य टाकून पीठ मळून घ्या. मळताना गरजेनुसार दूध किंवा तूप वापरू शकता. पिठाचा गोळा जाडसर मळा, पातळ नको. पाच मिनिटे झाकून बाजूला ठेवा

३. ओव्हन 360 °F ला प्रिहिट करायला ठेवा. ताटाला तूप लावून तयार ठेवा. किंवा ओव्हनचा वापर करायचा नसेल तर मग तव्यावर मिठ पसरवून गरम होवू द्या.

४. हव्या तश्या आकाराची बिस्कीट बनवून घ्या. ड्राय फ्रुट्स लावून सजवून घ्या किंवा त्या ड्राय फ्रूट्सला तुम्ही बारीक भुरका करूनही आधीच मिश्रणात टाकू शकता.

५. ताटात बिस्कीट ठवतांना अंतर ठेवून ठेवा. जेणेकरून बिस्कीट एकमेकांना चिपकणार नाही.



मीठ ठेवून तव्यावर केलेल्या कुकीज/बिस्किट्स

६. ओव्हन प्रीहीट झाल्यावर साधारण बिस्किट्स ५ तो ७ मिनटे ठेवा. आणि तव्यावर मीठ पसरवून करत असाल तर २० मिनिटे लागतील. ताट गरम मिठावर ठेवून त्यावर झाकण ठेवा. तुम्ही ते मध्ये मध्ये बघू शकता, तांबूस रंगाचे बिड्सकीत झालेत की काढून घ्या. सुरुवातीला जरा नरम वाटणार पण अगदीच थंड झाले की खुसखुशीतपणा वाढतो. तुम्ही चॉकलेट वापरून किंवा अजून काही सजावटही करू शकता. मुलांच्या आवडीनुसार. किंवा सध्या कुकीज/बिस्कीट्सही चवदार आणि खुशखुशीत वाटतात. चाल मग, प्रयत्न करून बघाच.

७. हवा बंद डब्यात किंवा पिशवीत ठेवा आणि मनसोक्त आस्वाद घ्या. स्वतःही खा आणि घरच्यानाही द्या.



ओव्हन मध्ये केलेल्या कुकीज/ बिस्किट्स

# मैथिली अतुल यांची खुसखुशीत “नै” वन लायनर्स

✉ priyadarshanikapure@gmail.com

*(लेखिकेचे टोपण नाव मैथिली अतुल असून त्या फेसबुकवर सातत्याने खुसखुशीत लिखाण करत असतात)*

- एखाद्याबरोबरचा फोटो सोशल मिडीयावर पोस्ट करताना, त्यात आपण सोबतच्या व्यक्तीपेक्षा जास्त सुंदर दिसत असू ही शक्यता जास्तीत जास्त पडताळली जाते नै?
- ह्या हॉरर सिरियल्स नंतर नंतर कॉमेडी शो मध्ये परावर्तित होतात नै? कोण घाबरायलाच तयार नसतं.
- सोसायटीचे व्हाट्सपग्रुप हे फक्त कुणी गाडी चुकीच्या पार्कींग मध्ये लावलीय आणि कुणाचा कचरा कुणाच्या दारासमोर किंवा जिन्यात पडलाय ह्या कारणांवरून भांडण्यासाठी असतात नै?
- एखादा स्क्रीन शॉट टाकला किंवा पाठवला तर तो काय आहे हे बघण्यापेक्षा त्यावर किती वाजलेत, सिम किती आहेत? बॅटरी किती आहे? आणि बाकीच्या सगळ्या नोटिफिकेशन बघणारे किती चौकस असतात नै?
- तुम्ही एखाद्यावर जेवढं प्रेम कराल त्याच्या दुप्पट किंवा निदान जेवढं करू तेवढं तरी मिळेल की नाही शंका आहे, पण तुम्ही एखाद्याचा जितका द्वेष कराल त्याच्या दहापट द्वेष मात्र तुम्हाला रिटर्न मध्ये मिळेल ह्याची खात्री असते, नै?
- फेसबुकवरच्या स्टेटसला, पोस्टला फोटोंना लाईक, लव्ह, हाहा देऊन इतकी सवय झालीय की , वर्तमानपत्रातल्या बातम्या वाचताना पण उगाचच तिथेच रिऍक्ट व्हायची इच्छा होते, नै?
- जिथे जिथे कामवाल्या मावशी कामाला जातात, त्या त्या लोकांशी आपापसात काहीच बोलणं होऊ नये म्हणून त्या योग्य ती काळजी घेत असतात नै?
- कुणीतरी म्हटलंय: व्यसन हे व्यसनच असतं. त्यात चांगलं व्यसन आणि वाईट व्यसन असा भेद नसतो. तसं फ्लर्टींग हे फ्लर्टींगच असतं, त्यात हेल्दी आणि अनहेल्दी हा प्रकार नसतो, नै?
- सगळ्या टूथपेस्टला कोलगेट म्हणणारे तेच लोक असतात जे कुठल्याही नुडल्सला मॅगी आणि वॉशिंग पावडरला निरमा म्हणत असतात, नै?
- ऐकावे वेधशाळेचे.. करावे मनाचे!
- नेहमी सौ. चा अर्थ सौभाग्यवती नसतो, पै. चा अर्थ पैलवान नसतो हे समजायला आयुष्यातली बालपणीची दहा बारा वर्षे जावी लागली. लहानपणी सौ. दुरदर्शन असं बघून दुरदर्शन ला सौभाग्यवती का म्हणत असतील असा प्रश्न माझ्या बाप्पांना(आजोबांना) विचारला तर त्यांनी पाठीत जोरदार फटका दिलेला आठवलं, वरती कुंबलायला पाहिजे काठीने अशी धमकी सुद्धा.
- ते हम्म माहिती होतं, hmm पण माहिती आहे, पण अलीकडे कमेंटमध्ये नुसतं "हं" करायचं काय फॅड आलंय फेसबुककर जाणे!!

- रामायणापेक्षा महाभारत आणि त्यातली व्यक्तिमत्त्व नेहमीच भुरळ घालत आलीयेत... मग तो कृष्ण असो, द्रौपदी असो, दुर्योधन असो वा अश्वथ्यामा, त्यांच्याबद्दल वाटणारं कुतुहल संपत नाही.
- कुठल्या हिरो हिरोईन मध्ये कोण वयाने लहान आहे, कोण मोठं आहे? दोघांच्या वयात किती अंतर आहे?, त्यांचं हे कित्व लग्न नि कितवं अफेअर? ह्या सगळयांच्या चौकशा आणि माहिती खुद्द त्या लोकांपेक्षा मिडिया आणि आम्हालाच जास्त असते, बाकी त्या सेलिब्रिटीना त्याचा काडीमात्र फरक पडत नाही आपण मात्र त्यांनी काय करायला हवं काय नको ह्याच्या बाता मारत बसतो , नै?
- लोकांना हवं तसं वागायचं आपण बंद केलं की त्यांना आपल्यात असलेले आणि नसलेलेसुद्धा वाईट गुण दिसायला आपोआप सुरवात होते.

## || कथा/अनुभव विभाग ||

## लीनाचा जगप्रवास - रुचिता प्रसाद, वय १० वर्षे

चीन देशात लीना नावाची मुलगी तिची आई डेबोरा हिच्यासोबत छोट्याशा झोपडीत रहात होती. लीनाचे वडील वारले होते. त्यांची परिस्थिती गरिबीची होती. डेबोरा रोज शेतात काम करायला जायची तर लीना छोटे मोठे काम शोधायला रोज बाहेर पडायची. कधी का मिळायचे तर कधी नाही.

एके रात्री लीनाला स्वप्न पडले की ती संपूर्ण जग प्रवास करते आहे. दुसऱ्या दिवशी आईला तिने हे स्वप्न सांगितले तेव्हा आई रागावली आणि म्हणाली, “चुपचाप काम शोधायला जा. आपण गरीब आहोत. आपण जग प्रवास करू शकत नाही. तुला आपली परिस्थिती कळत नाही का?”

लीना निराश झाली पण तिला मनापासून वाटत होते की तिचे हे स्वप्न एके दिवशी पूर्ण होणार!

एक दिवशी काम शोधता शोधता लीना सगळीकडे सारखी घरं असलेल्या एका छोट्याशा गावात आली. त्यापैकी सहज एका घराच्या दाराची तिने बेल वाजवली. आतून दार उघडले गेले. दारात एक लाल परी उभी होती.

“काही काम मिळेल का? कोणतेही काम चालेल. मला आणि माझ्या आईला पैशाची खूप गरज आहे. आम्ही गरीब आहोत!” लीनाने विचारले.

लाल परी म्हणाली, “काम शोधत शोधत तू परी राज्यात आलीस. कोण तू कुठून आलीस? आणि अगदी वेळेवर आलीस. माझ्याकडे सहा खोल्या आहेत त्यापैकी पाच खोल्या रोज झाडून स्वच्छ करायच्या आणि मी नसताना दिवसभर पाचही खोल्यांमध्ये लक्ष द्यायचे. काही दिवसांपूर्वी येथे काम करणारी बाई सोडून गेली, म्हणून मी तुला कामावर घेते. पण स्वच्छता राखली पाहिजे. मान्य असेल तरच काम स्वीकार!”

“हो मी नक्की स्वच्छता राखीन आणि नियमाप्रमाणे वागीन! पण परी ताई माझे एक स्वप्न आहे, ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला पैसे मिळतील ना?” लीना म्हणाली.

लीनाचे निरागस भाव बघून परी म्हणाली, " नक्की तुझी सगळी स्वप्न पूर्ण होतील! एक गोष्ट मात्र लक्षात ठेव, सहावी खोली नेहमी बंद असते. ती कधीही उघडायची नाही. नाहीतर मी तुला कामावरून काढून टाकीन आणि कायमची मांजर बनवून टाकीन!"

"हो परी ताई नक्की मी तुम्ही सांगितल्या प्रमाणेच करेन!" लीनाने आश्वासन दिले.

अशा रीतीने लीनाला काम मिळाले आणि ती परीकडे नियमितपणे काम करू लागली. लीनाची आईसुद्धा खुश होती.

एक दिवशी परी घरी नसताना लीना सगळ्या खोल्या साफ करत होती. पाचवी खोलीत साफ करताना सहाव्या खोलीतून तिला काहीतरी खट खट असा आवाज ऐकू येऊ लागला. पण परीने सांगितलेल्या नियमानुसार सहावी खोली उघडायची नाही हे ठरलं होतं. सहाव्या खोलीला कुलूप नसायचं, नुसती कडी लावलेली असायची पण तिने आजपर्यंत कधीही खोली उघडली नव्हती. आज मात्र त्या खोलीतून खूप मोठ्याने आवाज येत होता त्यामुळे कडीच्या जवळ असलेल्या एका छिद्रातून लीनाने आत बघितले तर तिला आश्चऱ्याचा धक्का बसला आणि भीतीही वाटली, कारण एक चेटकीण झाडूवर बसून त्या खोलीत उडत होती आणि त्या खोलीतले सोने चोरून गोल झरोक्यातून बाहेर उडून जाण्याच्या बेतात होती. तेवढ्यात प्रसंगावधान राखून चपळाईने लीनाने कडी उघडून तिच्या हातातले झाडू त्या चेटकिणीच्या झाडूवर फेकून मारले आणि ती चेटकीण दाणकन खाली आपटली आणि तिचा झाडू तुटला. पाठीवर आपटल्याने चेटकीणची पाठ दुखायला लागली, त्यामुळे ती उठू शकत नव्हती. तोपर्यंत पटकन खिडकीतून जोराजोराने ओढून लीनाने आरडाओरडा केला, "चोरी चोरी!"

आजूबाजूच्या घरांमधील काही वेगवेगळया निळया, पिवळया, हिरव्या पऱ्या धावत आल्या आणि सगळयांनी मिळून चेटकिणीला बांधून ठेवले. लाल परी घरी आल्यानंतर इतर पऱ्यानी लीनाचे कौतुक केले आणि लाल परीने आनंदाने लीनाला सांगितले की तिने खूप मोठे काम केले आहे. सहाव्या खोलीतले सोने जे सगळया पऱ्यांच्या मालकीचे आहे ते आज चोरीला जाण्यापासून वाचवले.

परीने तिला बक्षीस म्हणून त्या खोलीत आडवे झोपायला सांगितले आणि तिच्या अंगाच्या खाली जेवढे सोने येईल तेवढे सोने तिला भेट म्हणून दिले आणि तिला कामावरून कायमचे मुक्त केले. त्या मिळालेल्या सोन्यातून लीनाने एक घर घेतले आणि नंतर उरलेल्या पैशांत तिचे जग प्रवासाचे स्वप्न सुद्धा पूर्ण झाले.

*(मूळ कथेचा स्वैर मराठी अनुवाद निमिष सोनार यांनी केला आहे)*

# जसे आपण तसे जग? - आशू लेमॉस, मस्कत

✉ storybonds@gmail.com

*(लेखिका मुळच्या मुंबईच्या असून त्या होम मेकर आहेत आणि लहान मुलांसाठी नियमित गोष्टी लिहितात)*

एक मुलगा आणि एक मुलगी खूप चांगले मित्र होते. ते नेहमी एकत्र आणि सोबत खेळत.

एके दिवशी त्या मुलाकडे मार्बल्स म्हणजे गोट्या यांचा संग्रह होता.

काही छोटे मार्बल्स, काही मोठे मार्बल्स आणि त्यात एक इंद्रधनुष्याच्या रंगाचा मार्बल होता. हे सगळे एका बॉक्स मध्ये बंद होते.

इंद्रधनुषी रंगाचा मार्बल त्या मुलाला खूप आवडायचा. त्याच्या पूर्ण मुठीत मावेल एवढा तो मोठा होता.

त्या मुलीकडे त्यादिवशी मिठाईचा बॉक्स होता.

मार्शमेलो, शुगर कॅण्डी, जेलीबीन आणि हृदयाच्या आकाराचे चॉकलेट हे सगळे प्रकार त्यात होते. तिच्या संपूर्ण मुठीत मावेल एवढे मोठे ते हृदयाच्या आकाराचे चॉकलेट होते. ते तिच्या सर्वात आवडीचे चॉकलेट होते. इतर सर्व चोकलेट्स चांदीच्या वेष्टनात गुंडाळलेली तर हृदयाच्या आकाराची चॉकलेट सोन्याच्या वेष्टनात गुंडाळलेले होते. हे सगळे एकाच बॉक्स मध्ये बंद होते.

त्यादिवशी खेळतांना त्या दोघांनी एकमेकांना विचारले तुझ्याकडे बॉक्समध्ये काय आहे? मुलगा म्हणाला माझ्याकडे बॉक्समध्ये मार्बल्स आहेत आणि मुलीने सांगितले तिच्याकडे बॉक्समध्ये मिठाई आहे.

दोघांनी एकमताने ठरवले की आज त्याने तिला सगळे मार्बल द्यायचे आणि ती त्याला तिच्या जवळची सगळी मिठाई देईल.

त्या मुलाने त्याच्या आवडीचा इंद्रधनुषी मार्बल मुलीच्या नकळत स्वतःच्या खिशात लपवला आणि इतर सर्व मार्बल असलेला बॉक्स त्या मुलीच्या स्वाधीन केला.

त्या मुलीने तिच्या आवडीच्या हृदयाच्या आकाराच्या चॉकलेट सहित संपूर्ण मिठाई असलेला बॉक्स त्या मुलाच्या स्वाधीन केला.

त्यादिवशी मुलाने दिलेले मार्बल्स खेळून आनंदाने ती मुलगी रात्री झोपून गेली.

त्या मुलाने मुलीची बॉक्स मधली सगळी मिठाई खाऊन टाकली तरी त्याला त्या रात्री झोप आली नाही.

तो मुलगा रात्रभर हाच विचार करत राहिला की त्याने जसे इंद्रधनुषी मार्बल लपवले होते प्रमाणे त्या मुलीने सुद्धा तिची नेमकी कोणती फेवरेट मिठाई त्याच्यापासून लपवली असेल?

हाच प्रश्न त्याला सतावत राहिला.

# सारे काही अनपेक्षित! - निमिष सोनार

*(हा इंटरनेटवरील काही लघूकथांचा स्वैर अनुवाद आहे)*

### 1: मी कुठे?

त्या दिवशी पाच वर्षाचा मुलगा एलेक्स हा त्याचे वडील डेव्हिड यांच्या सोबत एकटाच बेडवर खेळत बसलेला होता, तो म्हणाला, “ पप्पा बेडखाली कुणीतरी आहे, बघा ना!”

“ अरे कुणी कशाला येईल बेडखाली?”

“ बघा ना, मला हालचाल जाणवतेय!”

“ ठीक आहे, तुझ्या समाधानासाठी बघतो” , असे म्हणून डेव्हिडने बेडखाली वाकून पाहिले, बघतो तर काय घाबरून पाय दुमडून थरथरत अलेक्स बेड खाली बसला होता आणि घाबरत हळू आवाजात म्हणाला,

“ पप्पा बेडवर कुणीतरी आहे!”

### 2: टकटक

मी त्या दिवशी घरी एकटाच होतो. रात्री सगळी दारं खिडक्या बंद करून बसलो.

तेवढ्यात लाईट गेली. अंधारात चाचपडत मी टॉर्च शोधला आणि अचानक मला काचेवर कुणी टकटक करतंय असा आवाज आला.

मी काचेच्या खिडकीकडे टॉर्च मारून पाहिले आणि परत पुन्हा पुन्हा टकटक झाली पण तो आवाज त्या खिडकीतून येतच नव्हता.

खिडकी बाहेरही कुणीच नव्हतं.

मी आवाजाच्या दिशेने मागे टॉर्च वळवला तर कळलं की आवाज आरश्यातून येत होता.

### 3: अज्ञात

मी हॉस्टेल रूम मध्ये एकटा रहात होतो तेव्हाची गोष्ट.

रोज रात्री एक मांजर खिडकीतून यायचं. ते रोज रात्री टेबलावर बसून माझेकडे एकटक बघायचं.

त्याला एवढं माझेकडे एकटक बघून काय वाटायचं काय माहीत?

एकदा त्याच्या जवळ जाऊन मी पाहिलं तर लक्षात आलं की ते मांजर माझ्याकडे नाही, माझ्या मागे कुणाकडे तरी बघत होतं.

**4: आरसा**

ते नेहमी म्हणतात की अभिनय नीट शिकायचा असेल तर आरश्यात बघून सराव करावा.

मी एकदा आरशात पाहून हसले पण माझे प्रतिबिंब मला साथ देत नव्हते, ते उलट माझ्याकडे डोळे रोखून पाहत होते.

सांगा मी काय करू आता?

**5: टाळया**

एका गावात दोन लहान निरागस भावंडं एका झोपडीत आई बरोबर रहात असतात. थंडीचे दिवस असतात. एके संध्याकाळी ती मुले त्यांच्या झोपडीजवळ असलेल्या पर्वतावर नेहेमीसारखी आपडी थापडी हा टाळयांचा खेळ खेळत असतात. आईला त्या दिवशी कामावरून यायला उशीर होतो. त्यामुळे त्यांना नेहमीची आईची हाक अजून ऐकू न आल्याने ती खेळात एवढी मग्न होतात की त्यांना घरी परतायचे भानच रहात नाही. इतर मुले घरी निघून जातात. नंतर लक्षात आल्यावर अंधार झालेला असतो.

आईची आठवण आल्यानंतर, घाबरल्याने आणि बावरल्याने ती दोघेजण रस्ता चुकतात आणि अंधारात भरकटत जातात. सगळीकडे त्यांना एकसारखी झाडे दिसायला लागतात. घराकडे जायचा रस्ता सुद्धा सापडेनासा होतो. त्यादिवशी आकाशात चंद्र सुद्धा नसतो. दूरपर्यंत त्यांना स्वत:ची झोपडी दिसून येत नाही.

शेवटी मेटाकुटीला येऊन ते एका झाडाखाली बसतात. दोघेजण आता थंडीने कुडकुडायला लागतात. तेवढ्यात समोर त्यांना मोडकळीस आलेली एक मोठी झोपडी दिसते. त्यात प्रकाश असतो. त्यात ते जायचे ठरवतात.

झोपडीचे दार उघडे असल्याने ढकलून ते आत शिरतात. आत कुणीच नसते. झोपडीला खिडक्या असतात पण त्यांना दारे नसतात. खिडकीतून थंडी आत येत असते. दोघांना एक शिडी दिसते जी माळयावर जाते. ते माळयावर चढतात तशी त्यांना ऊब जाणवते. माळयावर पांघरूण असते. ते दोघे रात्री तेथेच थांबायचे ठरवून अंगावर पांघरून घेतात आणि झोपून जातात. माळयाच्या वरच्या बाजूला छतावर एक छोटा गोल झरोका असतो.

बरोबर मध्यरात्री त्या गोल झरोक्यातून कुणीतरी चालत असल्याचा आवाज ऐकू येेतो. आवाज हळूहळू वाढत जातो. त्यामुळे मुलगा बहिणीला उठवतो. ते घाबरून एकमेकांना बिलगतात पण आवाज वाढत गेल्याने तो

मुलगा पांघरूण बाजूला करून बाजूच्या एका लाकडी स्टूलवर चढून त्या झरोक्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतो पण हात पुरत नाही.

मग पुन्हा खाली उतरून मुलगा छताकडे बघून म्हणतो, " कोण आहे छतावर? आम्हाला घाबरवू नको. आम्ही छोटे आहोत. आम्हाला त्रास देऊ नको!"

छतावरचा आवाज अचानक बंद होतो. ते दोघे झोपतात. तेवढ्यात पूर्वीपेक्षा दुपटीने मोठ्या आवाजात छतावर चालण्याचा आवाज ऐकू येतो.
मुलगी निरागसतेने म्हणते, " दादा अरे कुणीतरी आपल्यासारखे छोटे असणार. रस्ता चुकलेले. ते आत यायला घाबरत असतील!"

" अगं ताई भूत पण असू शकतं. भूत आहे की आपल्यासारखे कुणीतरी लहान मूल हे बघायला आपण त्यांना टाळी वाजवायला सांगू. जर वर भूत असेल तर त्यांना दोन टाळया वाजवायला सांगू आणि लहान कुणीतरी असेल तर एक टाळी! आपडी थापडी सारखं!"

शेवटी निरागस मुले ती. पांघरूण बाजूला सारून ते दोघेजण झरोक्याखाली उभे रहातात.
मुलगा झरोक्याकडे पाहून विचारतो, " छतावर जर भूत असेल तर दोन टाळया वाजव आणि लहान मुलगा असेल तर एक टाळी वाजव!"

छातावरची हालचाल बंद होते आणि पांघरुणाखालून दोन टाळया वाजवल्याचा आवाज येतो.

# गरज आहे एका साक्षीची - पूनम कुलकर्णी, औसा (लातूर)

✉ poonamkulkarni789@gmail.com ☎ 9834179075

“ रुचिता ए अग थांब, किती वेळ झालं आवाज देतेय” , साक्षीने आपली जिवलग मैत्रीण रुचिताला आवाज दिला. रुचिता थबकली अन साक्षीला पाहताच मान खाली घातली अन थोड्याच वेळात घळाघळा अश्रू गळायला लागले. “ साक्षी, सगळं संपलं गं” रुचिताने टाहो फोडला. “ अग झालं तरी काय, बस बघू इथे, आणि काय ग काय अवतार करून घेतलाय स्वतःचा. झालय काय?” , साक्षीने चिंताग्रस्त होऊन प्रश्न विचारला.

रुचिताने डोळे पुसले आणि मग एक एक पान वाचायला सुरुवात झाली. साक्षी आणि रुचिता जिवलग मैत्रिणी, एकाच कॉलेज मध्ये दोघींची शिक्षण झाली. रुचिता घमेंडी होती. रूपाचा गर्व दुसरं काय. कॉलेज झाल्यास दोघीही मुंबई ला आल्या. मुंबापुरी, स्वप्नाची महानगरी. साक्षीने जवळच असलेल्या एका प्रायवेट कंपनी मध्ये जॉब करायला सुरुवात केली. रुचिताला ही लाईफ पटणारी नव्हती. तिने मॉडेलिंगला ऍडमिशन घेतलं. दोघींचं routine चालू होतं सुरळीत.

रुचिताला लवकरात लवकर फॅशन जगात जम बसवायचा होता. त्यातच तिची ओळख एका गाजलेल्या मॉडेलशी झाली. तिला स्वप्न पूर्ण करायचं होतं. त्याला ती हवी होती. दोघांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी एकत्र येण्याचा निर्णय त्यांनी घेतला

अमेय कामाच्या बाबतीत अतिशय शिस्तप्रिय होता. त्याच्या सहकाऱ्याकडून झालेली एक चूकही त्याला सहन होत नसायची. रुचिताला त्यांने सार शिकवलं. दोघांनी लग्नही केलं.

इकडे साक्षीनेही लग्न केलं आणि banglore ला शिफ्ट झाली. रुचिताशी संपर्क तुटला. इकडे रुचिता आणि अमेय दोघांचा सुखाचा संसार चालू होता. अमेयला एका रात्री कॉल आला. रात्रीचे एक वाजलेले. “ कोण आहे, अमेय”, रुचिताने प्रश्न विचारला. तसा अमेय गडबडला” कुणी नाही, झोप तू मीटिंग आहे, मी जरा जाऊन येतो. “ अमेय निघून गेला. काय असेल या विचारांनी रुचिता रात्रभर झोपू शकली नाही.

तीन दिवस होऊन गेले तरी अमेयचा पत्ता नव्हता. मोबाईल फोन switch ऑफ होता. तेवढ्यात बातमी आली की प्रसिद्ध मॉडेल अमेय यांचा अपघातात मृत्यू. रुचिता भोवळ येऊन पडली. रुचिताच्या आई वडिलांना बातमी

कळाली. दोघेही लेकीकडे आले. सोबत अजून एक बातमी होती की अमेय ची सेक्रेटरी कुमुदही सोबत होती. दोघे लोणावळयाला रिसोर्ट ला जात असताना त्यांचा अपघात झाला होता.

रुचिता या धक्क्यातून सावरत होती. तोच तिची भेट आज साक्षीशी झाली. एवढं सगळं रामायण सांगितल्यास साक्षीच्याही डोळयांत पाणी आलं. आपल्या मैत्रिणीची झालेली ही अवस्था तिलाही धक्का देणारी. ती काही दिवसात परत banglore ला जाणार होती. पण तिचा पाय निघेल तेव्हा न.

साक्षीला एक मार्ग सुचला आणि तिने तातडीने रुचिताला बोलावून घेतल आणि तिला सांगितलं.

“ नाही नाही, हे शक्य नाही मी दुसऱ्या कुणासोबत लग्नाचा विचारही करू शकत नाही, साक्षी अग तू माझी जिवलग न मग परत मला आगीतून फुफाट्यात का ढकलते. मला हे मान्य नाही आणि सुधीरला काय वाटेल छे छे” साक्षीने स्पष्ट शब्दात नकार कळवला.

“ मला सगळ मान्य आहे” , सुधीरने दरवाज्यातून होकार कळवला.

सुधीर, साक्षीचा मावस भाऊ. त्याला रुचिता पहिल्यापासून आवडायची. पण रुचिता ने त्याच्यात कधी interest नाही घेतला. सुधीरही हळूहळू त्याच्या life मध्ये व्यस्त झाला

साक्षीने झाली परिस्तिथी सुधीरला आधीच सांगितली होती सुधीर लग्नाला तयारही झाला. त्याने तातडीने ट्रेन पकडली. साक्षीने सुधीर आणि रुचिता दोघांच्याही आई बाबाना बोलावलं होतं. ते सगळे एकत्रच बाहेर येऊन बोलले, “आम्हालाही मान्य आहे” .

“ साक्षी तू माझ्यासाठी एवढं केलं”, अस म्हणत रुचिताने साक्षीला मिठी मारली आणि हुमसून रडू लागली. “ छे ग माझ्या माझा स्वार्थ आहे यात माझ्या भावाला मुलगीच नव्हती मिळत. तशा आल्या बऱ्याच पण त्याला रुचिताच् हवी होती” , साक्षीच्या या बोलण्यावर एकच हशा पिकला. अशा कित्येक रुचिता आहेत. त्या सगळयाना गरज आहे एका साक्षी ची. (ही कथा पूर्णतः काल्पनिक आहे.)

# दहाचा आकडा - प्रभाकर पटवर्धन

✉ pvpdada@gmail.com ☎ 9689995057

पावसाळी दिवस होते. गोष्ट कोकणातील आहे आहे, नुकताच पाऊस पडून गेला होता, . सकाळची वेळ होती, ऊन उबदार वाटत होते, गेले पाच सहा दिवस पावसाची झड (अविरत पाउस) असल्यामुळे सर्व काही गारठले होते. अशा वेळी जनावरे म्हणजे, सरपटणारे प्राणी गारठून गेलेले असतात, पाउलवाटेवर येऊन ते अंग शेकत बसतात. पाऊलवाटेवर येणाऱ्या - जाणाऱ्या लोकांच्या पायदळीमुळे सहसा गवत उगवलेले नसते, जमीनही टणक झालेली असते, त्यामुळे तो भाग कोरडा असतो. दुसरी सापांची आवडती जागा म्हणजे गडगा (दगडाने बांधलेला धक्का). तो भागही कोरडा असतो. मी घाईघाईने पायवाटेवरून जात होतो, अशा सकाळच्या वेळी पायाखाली नीट बघून चालावे, जनावरे उबेसाठी पायवाटेवर येऊन उन्हात अंग शेकत बसतात. हे सर्व मी विसरून गेलो होतो. विचाराच्या तंद्रीत भरभर चालता चालता माझा पाय एका पिवळया धम्मक जनावराच्या शेपटीवर पडला. मी दचकलो आणि चटकन पाय उचलला तेवढ्यात ते जनावर सळकन् गवतात निघून जाताना मला दिसले, तो अस्सल दहा आकडी नाग होता. नाग आणि आधेले हे दोन्ही साप दिसायला सारखेच असतात, तोंड आणि शेपूट यामध्ये फक्त फरक असतो. आधेल्याचे तोंड फुगीर नसते तर नागाचे फुगीर असते. त्यामुळे नागाला फणा काढता येतो, फणा काढल्यावर त्यावर दहा सारखा एक आकडा (आकृती )दिसतो. आधेले फणा काढू शकत नाही. नागाची शेपटी किंचित फुगीर असते व त्यावर शेवटपर्यंत विशिष्ट प्रकारचे खवले असतात. तर आधेल्याची शेपटी निमुळती व त्यावर खवले नसतात. सळकन निघून गेलेला साप नाग आहे हे मी पटकन ओळखले. नाग डूख धरतो व तो तुमच्या मागे कितीही अंतरापर्यंत येऊ शकतो, अशी समज कोकणामध्ये आहे. इतरत्रही तशीच असावी अशी माझी समजूत आहे.

सिनेमावाल्यांना नाग हे एक सिनेमासाठी आकर्षण आहे. नाग ज्यामध्ये नायक आहे असे दोन तीन तरी हिंदी सिनेमा पाहिलेले आठवतात. नागाला ऐकू येत नाही, तो डूख धरत नाही, असे जीवशास्त्र शिकणारे लोक म्हणतात. सापाला जमिनीतून जाणाऱ्या आघात लहरी कळतात व तो तुमच्या मार्गातून बाजूला होतो. तुमचे बोलणे ऐकून नव्हे असे शास्त्र म्हणते. जर त्याला ऐकूच येत नाही तर तो तुमचे बोलणे ऐकून तुमच्या मागे कसा येणार? प्रत्येकाचा आवाज जसा निरनिराळा असतो त्याप्रमाणेच आघात लहरीही निरनिराळया असाव्यात त्या आघात लहरी ओळखून नाग तुमच्या मागे येत असावा असे मला वाटते. या बाबतीत मला आलेला अनुभव पुढीलप्रमाणे.

त्या दिवशी नाग पटकन निघून गेला. नंतर मी ही गोष्ट घरी बोललो. आई वडिलांनी जरा सावध रहा लक्ष ठेव आम्हीही लक्ष ठेवतो असे सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी शौचाला जात असताना मला पुन्हा तसाच नाग दिसला. तोच नाग होता की हा दुसरा होता ते कळण्याला मार्ग नाही. ही साठ पासष्ट वर्षांपूर्वीची गोष्ट आहे, तर त्या वेळी शौचकूप कंपाऊंडच्या कडेला लांबवर असे, . बहुदा शौचकूप नसतच. हल्लीसारखी कम्पोस्ट खत करण्याची किंवा फ्लश करण्याची पद्धती तर नव्हतीच. सफाई व स्वच्छतेचे काम गुरांवर व निसर्गावर सोपवलेले असे. दोन तीन दिवस सकाळी शौचाला जाताना तो मला वाटेवर दिसत होता. आम्हीही काठी घेऊन त्याला मारण्याच्या तयारीत होतो. परंतु दर्शन देऊन तो क्षणार्धात गायब होत असे. अंगणात फिरताना कधी इथे तर कधी तिथे असा तो दिसत असे. मीही घाबरून गेलो होतो. आई वडीलही काळजीत पडले होते. त्यांनी मला दोन चार दिवस रत्नागिरीला जाऊन काकांकडे रहा म्हणून सांगितले. आमचे गाव व रत्नागिरी या मध्ये खाडी असल्यामुळे तो पाठोपाठ येऊ शकणार नाही अशी कल्पना त्यामागे होती. दोन तीन दिवस मीही अस्वस्थ होतो, झोपही नीट लागत नव्हती. मी तीन चार दिवस रत्नागिरीला जाऊन राहिलो. तीन चार दिवसांनी मी परत आलो.

एवढ्या दिवसांमध्ये तो कुणालाही दिसला नव्हता. एवढेच काय तर मी तिथे होतो, तेंव्हाही बहुधा तो फक्त मला दिसत असे. मी आल्यावर चौकशी केली तेव्हा तो कुणालाच दिसला नाही असे मला कळले. बहुधा कंटाळून किंवा विसरुन तो निघून गेला असावा अशी आमची समजूत झाली. दुसऱ्या दिवसापासून त्याने पुन्हा मला दर्शन द्यायला सुरुवात केली. एखाद्या गुंडाने वारंवार दर्शन देऊन घाबरवून सोडावे परंतु प्रत्यक्षात काहीच करू नये असे त्यांचे वर्तन होते. कधी शेजारी जाताना रस्त्यावर, कधी समुद्रावर फिरायला जाताना वाटेवर, कधी पुढच्या अंगणामध्ये तर कधी मागच्या अंगणामध्ये असे दर्शन देण्याचे व मला घाबरविण्याचे त्याचे काम चालूच होते. तो केव्हा तरी संधी साधून मला निश्चित डसणार असे मला वाटू लागले. सतत तणावाखाली राहण्याऐवजी मी सुट्टी संपायच्या अगोदर नाशिकला निघून जावे असे मला वडिलांनी सुचविले.

दोन चार वेळा तो आमच्या अगदी तडाख्यात जवळजवळ सापडला होता. परंतु तो इतका चपळ होता की आम्ही काठी मारण्याच्या अगोदरच तो अदृश्य होत असे. सापाला मारण्यासाठी कोकणामध्ये बांबूची काठी वापरतात. काही ठिकाणी वेताची काठी वापरली जाते. ज्या वेळी साप अडचणीच्या ठिकाणी असेल त्यावेळी वेताची काठी लवचिक असल्यामुळे अापण केलेला आघात वर्मी बसतो तर काही वेळा त्रिशूळ किंवा पंजा काठीला लावलेला असतो. अडचणीच्या जागी त्रिशूळ किंवा पंजा मारल्यानंतर त्याचा एखादा दात जरी सापाच्या शरिरात शिरला तरी त्याला हालचाल करत येत नाही, मग काठीने मारणे सोपे जाते. हल्ली शहरात किंवा एखादवेळ खेड्यात सुद्धा जसे सर्पमित्र दिसतात तसे त्याकाळी म्हणजे पंचाहत्तर ऐंशी वर्षांपूर्वी दिसत नसत. सरपटणारा प्राणी

दिसला की मार अशी पद्धत होती किंबहुना खेडेगावात कोकणात अजूनही तशीच आहे. तो विषारी आहे किंवा नाही हेही कुणी पाहत नसे. तो विषारी आहे की नाही हे ओळखणेही कठीण असते. आपण सापाला जसे घाबरतो तसेच सापही आपल्याला घाबरतो, जर त्याला त्याच्या जीवाला भीती वाटली तरच तो हल्ला करतो. जंगली प्राण्यांच्या बाबतीतही असेच आहे.

नाग एकूण आम्हाला हूल देत होता. आम्ही त्याला मारण्यासाठी योग्य संधीची वाट पाहात होतो तर तो मला दंश करण्यासाठी योग्य संधीची वाट पाहात असावा. उंदरा मांजराच्या खेळाप्रमाणे हा नाग माणूस खेळ चालला होता. असेच दहा पंधरा दिवस गेले. मध्ये एक दोन दिवस तो मुळीच दिसत नसे. आम्हाला वाटे चला सुटलो, तो विसरला व कुठे तरी निघून गेला. तर एखाद्या दिवशी तीन चार वेळा त्याचे दर्शन होत असे. कोकणात साप दिसतच असतातकिंवा सरसर निघून गेलेले जाणवतात. फुरसे, कांडर, मण्यार, सर्पटोळ, नानेटी, नाग, इ. त्यांच्या सुरस व मनोरंजक कथाही सांगितल्या जातात. शहरी माणसाला वाटेल/वाटते त्याप्रमाणे येता जाता जिकडे तिकडे साप दिसत नसतात. कधी कधी महिना दोन महिनेही साप दिसत नाही. बऱ्याच वेळा तो आपल्या चाहुलीने म्हणजेच जमिनीतून येणाऱ्या आघातामुळे पटकन् निघून जातो. तो होता हेही आपल्या लक्षात येत नाही. साप सरपटणारे प्राणी याना घाबरण्याचे मुळीच कारण नाही, असे असूनही या नागाने आम्हाला अस्वस्थ करून सोडले होते. हा नाग जरा जास्तच शहाणा व वक्र स्वभावाचा असावा. कदाचित आपल्याच सावलीला घाबरून आपण भूत म्हणावे किंवा आपलाच पदरव ऐकून भुताचा भास व्हावा त्याप्रमाणेही कदाचित चालले असेल. सरडा, उंदीर, घूस, कांडेचोर इत्यादी प्राणी गवतात पाचोळ्यात सरपटत असतात, परंतू आम्ही जास्त सावध असल्यामुळे आम्हाला तोच आहे असे कदाचित वाटत असावे. नाग तोच होता की काय हे सांगता येणार नाही परंतु नाग दिसत होता एवढे मात्र खरे.

संध्याकाळी, रात्री, काळोखातून, फिरण्याचे मी जवळजवळ बंद केले. काठी, टॉर्च घेतल्याशिवाय फिरत नसे. असेच काही दिवस गेले, नंतर मी आठ दहा किलोमीटरवरील मावळंगे गावी माझ्या दुसऱ्या एका काकांकडे काही कामासाठी जात होतो, त्या काळी वाहतुकीच्या सोयी विशेष नसल्यामुळे चालत जाणे हाच एक वाहतुकीचा मार्ग होता. चालत जाण्यासाठी दोन तास तरी लागत. कुणीतरी आपल्या मागून येत आहे असा मला भास होत होता. संध्याकाळच्या सुमारास मी माझ्या काकांकडे पोहोचलो. रात्रीचे आठ किंवा नऊ वाजलेले असावेत, जेवण करून आम्ही गप्पा मारत होतो, . त्या नागाबद्दल आमचे सविस्तर बोलणे झाले होतेच. एवढ्यात बाहेरून सळसळ असा आवाज आला क्षणार्धात पिवळा धम्मक नाग एकदम अंगणातून पडवीमध्ये आला. आम्ही सर्व टणदिशी उडी मारून उभे राहिलो. तेवढ्यात माझ्या काकांनी चपळाई करून वळचणीला खोचलेली वेताची काठी काढली. दीड दोन फूट उंचीवरच्या झोपाळयावर तो नाग चढला. तीन फुटांपर्यंत आपले शरीर सरळ काठी

सारखे करून नंतर डोके व त्यामागील थोडासा भाग झोपाळयावर टेकून सरपटत त्याने झोपाळयावर विद्युत वेगाने चढण्यात यश मिळविले. तितक्याच वेगाने तो झोपाळयाच्या कडीवरून आढय़ाकडे जाऊ लागला. एकदा तो आढ्यावरून नळयामध्ये शिरला असता की आमच्या तावडीतून सुटला असता. तेवढ्यात चपळाईने काकांनी एक काठी त्याच्यावर मारली. तो लगेच कडीवरून खाली कोसळला. आणखी एक दोन फटक्यांमध्ये त्याचा ग्रंथ आटोपला. तो नागच होता पिवळा धम्मक होता. एवढ्या झपाट्याने घाबरल्यासारखे आत येण्याचे त्याचे कारण आम्हाला कळले नाही. कदाचित त्याच्या मागे घुबड किंवा मुंगूस लागल्यामुळे तो जीवाच्या भीतीने आत आला असावा, असे काकांच्या बोलण्यात आले. बाहेर सरसर सरसर असा आलेला आवाज, आम्ही बाहेर दरवाज्याकडे पाहतो न पाहतो तो त्याची झपाटय़ाने झालेला प्रवेश डोळयांचे पाते लवते न लवते तोच झोपाळयावर चढून कडीच्या मार्गे आढय़ाकडे जाण्याचा त्याचा प्रयत्न व तितक्याच चपळाईने काकानी त्याला ठार मारणे, हे दृश्य माझ्या मनःपटलावर कायमचे कोरले गेले. काकांकडे आलेला तो नाग माझा ज्याच्यावर पाय पडला तो असेल किंवा नसेल परंतु त्या दिवसानंतर मला नाशिकला येईपर्यंत नाग दिसला नाही एवढे मात्र खरे!! साप डूख धरतो आणि पाठोपाठ येऊन सूड घेतो अशी कल्पना आहे या बाबतीत प्रत्यक्षात लेखकाला आलेला अनुभव!!

# देणे सौभाग्याचे - सविता कारंजकर, सातारा

✉ karanjkar.savita@gmail.com ☎ 9922814183

*(लेखिका प्रसिद्ध निवेदिका आणि कथा लेखक तसेच पाककला निपुण आहेत. त्यांनी अनेक नाटकांमध्ये भाग घेतला आहे)*

श्वेता आज फणका-यात होती. तशी ती रोजच असायची. थोडी शीघ्रकोपी. पण मनाने स्वच्छ. आवलीच दुसरी.

सतत कामात बुडालेली. स्वतःसाठी आजवर तिनं काहीच केलं नव्हतं.

सासूचं दुखणंखुपणं, नव-याच्या व्यवसायात मदत, मुलांचं संगोपन, त्यांचं शिक्षण. सगळं जातीनं पाहणार. डोळ्यात तेल घालून तिनं कुटुंब जपलं होतं. तिच्या प्रेमळ उबदार पंखांखाली तिच्या घरट्याची वीण दिवसेंदिवस घट्ट होत होती आणि तिच्या खांद्यावर सगळा भार सोपवून सगळे च निर्धास्त होते.

आज तिचा मूड काही बरा नव्हता. आज तिनं ठरवलेलं. आता फक्त स्वतःसाठी जगायचं. सगळ्या हौशीमौजी करून घ्यायच्या स्वतःच्या.

आग्र्याचा ताजमहाल बघायचाय. मैत्रिणींचे आहेत तसे काश्मिरी पोशाखातले फोटो काढून घ्यायचेत.

एक तरी हवाई सफर हवीच हवी. डान्सक्लास आठवड्यात फक्त दोनदा असतो आणि फीही आपल्या आवाक्यातली च. मग काय हरकतै?

आणि गेल्याच महिन्यात त्या शेजारच्या मंजीनं केवढे सुंदर सुंदर डिझाईन चे दागिने केलेत!!ते ही एकाचवेळी!!

कशी मिरवत होती माझ्या पुढे!! शी बाई!! माझी तर. दागिन्यांची कसली म्हणून कसलीच हौस नाही झाली बाई!! सतत आपलं बजेट आडवं येत असतं!

ते काही नाही. आजच चांगला मुहूर्त आहे. मी आजच्या आजच भारीतलं. नव्या डिझाईन चं मंगळसूत्र घेणार म्हणजे घेणारच!! घरात तिनं सर्वांवर हा मंगळसूत्राचा बॉम्ब टाकला.

सागरचा. आ. बराच वेळ! मुलं आईचा हा रुद्रावतार पाहून घाबरीघुबरी झाली. सासूबाई मात्र आपल्या सुनेची नस न् नस ओळखून होत्या. त्यांनी नजरेनंच सागरला दिलासा दिला आणि जा घेऊन तिला सराफाकडे अशी मूक संमती दिली.

श्वेता जरा आज खासच तयार झाली. अगदी ठेवणीतली साडी नेसली. छानशी हेअरस्टाईल केली. हलकासा मेकअप. स्वतःला आरशात पाहून आपल्या च रूपावर भाळली. किंचित हसली. पण. पण.

आपलं जुनं मंगळसूत्र पाहून ती परत खट्टू!! आज तेच मंगळसूत्र ती बदलणार होती.

मोठ्या ज्वेलरी शोरूममध्ये जायचंय. मग इंप्रेशन नको पडायला?

तिला सागरने घातलेले कपडे आवडले नाहीत. त्याला कपडे बदलायला लावले.

सागरही आपल्या अर्धांगिनीचा हा असा अवतार प्रथमच पहात होता. इतक्या वर्षात साध्या गज-याचीही मागणी किंवा अपेक्षा न करणारी आपली गुलबकावली आज हा असा अशक्यकोटीतला हट्ट का करतेय?आणि तेही परिस्थितीची जाणीव असताना! जोडी निघाली. शहरातल्या सर्वात मोठ्या ज्वेलरी शॉपमध्ये!!

दारवानाने सलाम ठोकला. तशी श्वेताने मान ताठ केली. दार उघडताच एसीची एक थंड झुळूक!!

ती प्रथमच अनुभवत होती.

सेल्सगर्लने अदबीने नमस्कार केला आणि मंजूळ स्वरात दोघांचं स्वागत केलं.

“मॅडम, काय दाखवू?”

मॅडम. असं संबोधन ऐकताच श्वेताच्या अंगावर मूठभर मांस चढलं.

ती म्हणाली. “ मंगळसूत्र”

त्या काऊंटरवरील बालेनं दुस-या खास मंगळसूत्र काऊंटरकडे इशारा केला आणि त्या दोघांना त्या काऊंटरवर जाण्याची प्रेमळ सूचना केली. रॅम्पवरील कॅटवॉक. स्टाईलनं श्वेता निघाली. मागोमाग सागर.

मंगळसूत्र काऊंटरवरील बाला : “ जान्हवी की राधिका?”

श्वेता नाक फुगवत म्हणाली: “ मी श्वेता”

बाला: मॅडम. सॉरी. मला तसं नव्हतं म्हणायचं. मंगळसूत्र खरेदी करणार आहात तुम्ही. मग डिझाईन कोणतं दाखवू ? जान्हवी स्टाईल की राधिका?"

श्वेता भानावर येत: " ओह!! तुमच्या कडील सगळे प्रकार दाखवा"

मंगळसूत्राचे वेगवेगळे प्रकार गोळा करण्यात ती बाला गुंतली आणि श्वेता नव्या डिझाईन च्या मंगळसूत्राच्या स्वप्नरंजनात. तिला तिचं लग्न आठवलं. काळया मण्यांच्या लडीमध्ये दोन सोन्याच्या वाट्या. एक सासरची. एक माहेरची. एक शिवाचं प्रतिक तर एक आत्म्याचं प्रतिक.

सागरने तो सौभाग्याचा अलंकार देवाब्राम्हणाच्या साक्षीनं आणि वडीलधा-यांच्या आशीर्वादाने आपल्या गळयात घातला तेव्हा किती मोहरलो होतो आपण!!

मंगळसूत्र, गंठण, डोरलं. शब्द कोणताही वापरला तरी त्या अलंकाराचं महत्व वाढतंच. कारण मंगळसूत्र म्हणजे नात्यातला गोडवा, मान-मऱ्यादा जपणारा अलंकार!! विवाहितेचा साजश्रृंगार!! सौंदर्य वाढवणारा.

तितक्यात ती बाला आली आणि श्वेताची विचारश्रृंखला तुटली. काऊंटरवरील मंगळसूत्राचा प्रकार आणि वैविध्यपूर्ण डिझाईन्स पाहून श्वेता-सागरचे डोळे दिपले. दोन पदरी, पट्टीचे मंगळसूत्र, बाहेरून साखळी असणारे, आतून साखळी असणारे, मीना वर्क, खडी वर्क, कुंदन वर्क असणारी, १८ इंच उंचीपासून अगदी २४ इंचापर्यंतची. इटालियन पॅटर्न, प्लॅटिनम आणि गोल्ड अशा मिश्र रंगातील, मॅट्रीक फिनीश गोल्डमध्येही किती डिझाइन्स!! करप साखळी, नॅनो डिझाईन! बापरे!अगदी अलिबाबाची गुहा!!

तेवढ्यात तिचं लक्ष गेलं. सौभाग्याला हि-याचं कोंदण लाभलेलं!! तिने हि-याला स्पर्श करून पाहिले. क्षणात ती मोहरली! मायक्रो पॉलिशची, क्रिस्टल्सचा अधिक वापर असलेली. भरपूर डिझाईन्सही बालेनं तिच्यासमोर ठेवली. काय पाहू आणि किती पाहू, असं श्वेताला झालं होतं. आता त्या बालेनं पेंडन्टस् ही दाखवायला सुरुवात केली. मोर, कमळ, बदक, चंद्रकोर, आडवे, गोल, चौकोनी. अबब! केवढे हे प्रकार!

सगळे प्रकार पाहिल्यावर तिचे लक्ष एका खास तिला आवडलेल्या मंगळसूत्राच्या प्राईस टॅगकडे गेले. ती चमकली. सगळं ब्रम्हांड आपल्याभोवती फिरत असल्याचा भास तिला झाला. काही क्षणातच तिची नजर सागरकडे गेली. त्याचाही चेहरा पांढराफटक!! त्याच क्षणी तिला वास्तवाचं भान आलं.

आपण आज सकाळपासून घरच्यांशी, सागरशी कसे वागलो याची जाणीव झाली. ती वरमली.

सागरचा हात घट्ट पकडून ती म्हणाली: " आपण घरी जाऊया" सागर. नि:शब्द!!

" चल सागर. मला नकोय मंगळसूत्र" सागरने मान खाली घातली.
समजूतदार पणे श्वेता म्हणाली, " सागर, मी चुकले!काही वेळासाठी मी वस्तुस्थिती विसरले.

मला जाणीव आहे. आणि माझ्या साठी मंगळसूत्र म्हणजे नव-याने स्वतःच्या कष्टाच्या पैशातून बायकोसाठी आणलेला एक दागिना. त्या दोघांच्या प्रेमाचं प्रतिक!!

त्याचं रंग, रूप, आकार, वजन, किंमत याला फारसं महत्व नाहीए. महत्वाच्या आहेत त्या. त्यामागच्या भावना!! मला नकोय नवं मंगळसूत्र!!"

आपल्या गळयातील मंगळसूत्राच्या वाट्या तिने हातात घेतल्या. दोन्ही डोळयांना त्या वाट्यांचा स्पर्श केला आणि म्हणाली.

" या दोन वाट्यांमध्येच तुझं माझ्यावर असलेलं प्रेम सामावलंय. मला आणखी काय हवंय?"

सागर भारावून गेला. श्वेता वळली. काऊंटरवरील त्या बालेला म्हणाली, " सॉरी मॅडम. मी तुम्हाला त्रास दिला. आम्हाला नाही खरेदी करायचं मंगळसूत्र"
ती मुलगी पुढं आली, म्हणाली, " ऐकलंय मी सगळं. पण मॅडम, तुम्ही नाराज होण्याचं कारण नाहीच"

श्वेता आश्चर्यचकीत. सागरकडे पाहून ती मुलगी म्हणाली, " सर, तुम्ही पुढच्या वर्षी याच महिन्यात मॅडमना आवडलेलं मंगळसूत्र नक्की घेऊ शकाल"

सागरलाही नवल वाटलं. " ते कसं काय बुवा?" सागरने विचारले.

तत्परतेनं मुलगी म्हणाली, "तुमच्या करता खास अशी आमची एक योजना आहे. सुवर्णभिशी योजना. यात तुम्ही दरमहा कितीही किंवा ठराविक रक्कम गुंतवायची. असे बारा हप्ते तुम्ही आमच्याकडे भरलेत की तुमचा तेरावा हप्ता आम्ही भरतो. जमलेल्या रकमेतून तुम्ही तुमचा आवडता दागिना घेऊ शकता"

श्वेता-सागर हरखले. काही शंका आणि प्रश्नांचं निरसन होताच सागरने सुवर्ण भिशी योजनेत श्वेताचं नाव नोंदवलं. पहिला हप्ता भरलादेखील. सागरने आपल्या गुलबकावलीचा हात घट्ट धरला. एकमेकांची नजरानजर झाली. आता शब्दांची गरजच उरली नाही. या ह्रदयाचा संवाद त्या ह्रदयाशी झाला. मनातलं मळभ दूर झालेलं. ते दोघे घरी आले.

अंगणात छोटीशी पण आकर्षक रांगोळी पाहिली आणि घरातल्या आनंदाच्या लाटांची कल्पना श्वेताला आली. ती धावतच आईंकडे गेली. त्यांना गळामिठी मारली. आईंचा खांदा ओला झाला.

आईंनी तिचे डोळे पुसले.

“आता एकही शब्द बोलू नको. चल बघू. बस पाटावर.”

आई म्हणाल्या. तसं श्वेतानं ओळखलं.

“आई, मी तुमच्याशी सकाळपासून वाईट वागले. चिडले. तरी तुम्ही माझ्या आवडीची गव्हल्यांची खीर केलीत ना?”

आई म्हणाल्या, “ अगं. ओळखतो ना आपण एकमेकांना!!”

त्या दिवशीच्या जेवणाची चव अवीट होती!!

## || कविता विभाग ||

## फार फार तर काय होईल? – उर्मिला देवेन

फार फार तर काय होईल? कुणाला तरी धक्का बसेल...
कुणी रडेल, कुणी मूक होईल...कुणी सुटकेचा निश्वास टाकेल!!!

कुणी म्हणेल, असं व्हायला नको होत! कुणी बोलेल, जे झालं बरं झालं!
कुणी रागवेल मनातून. कुणी कुरकुरेल, चला. सुटका झाली व्यापातून!!

कुणाचे कसे. कुणाचे कसे! क्षीण होत जाणारे सुस्कारे!
पुन्हां सर्व पूर्वरत.... कदाचित नव्या दमाने.

एवढ्याच फलितासाठी, अंतर्बाह्य इतकं घणघोर युद्ध
जगण्याचं. हो. जगण्याचंच!!!

# सत्य - भरत उपासनी, नाशिक

✉ br1957u@gmail.com ☎ 8055852978

चालू आहे तेच सत्य आहे.!
जे ज्या क्षणात पुढे येतं. ते त्या क्षणाचं सत्य आहे.!
दोन क्षणात दोन वेगळी सत्य असतात.!
ती दोन्हीही त्या त्या क्षणाची सत्य असतात.!
ह्या दोहोंच्या मध्ये उभं राहून जेव्हा पहावं.
तेव्हाच ही दोन्ही सत्य जाणवतात.!
ते ते प्रत्येक क्षणी. त्या त्या क्षणाचं सत्य असतं.!
सत्य हे प्रत्येकाचं प्रत्येक क्षणी वेगळं असतं.!
ते ते त्याच्यापुरतं. त्या त्या क्षणाचं सत्य असतं.!
सत्य हे परिवर्तनीय असतं.!
प्रत्येकाचं सत्य त्याचं त्याच्यापुरतं समग्र असतं.!
समग्रतेने त्या त्या क्षणाचं. त्या त्या समग्रतेचं. समग्र सत्य असतं.!

# बालपण – उदय जडीये, पिंपरी

✉ udayjadiye2006@rediffmail.com ☎ 9552626496 *(लेखक पिंपरी येथील प्रसिद्ध कवी आहेत)*

मला गवसलं आहे, माझ हरवलेलं बालपण

माझ्या मुलीच्या अस्तित्वात, तिच्या छोट्याशा भावविश्वात

तिची चिमुकली मुठ उघडताच, मला गवसले क्षणात सोनेरी क्षण

तिचे कोवळे हास्य खुलताच, मी साठवले मनात चंदेरी क्षण

तिच्या गोड गोजीऱ्या बालपणाला, एक नवा आकार देऊ

आपले निसटलेले क्षण आणुन, तिचं नवं स्वप्न साकार करू

तिच्यासाठी सोसलं आहे, तू बरचं काही

ती सध्या सांगते, बोबडया भाषेत काही

कोवळा अंकुर वाढवलास, तू कणाकणानं

इवलासा जीव जपलास, तू तनामनानं

मी - तू - स्वप्न – भविष्य, या चौकटीतील प्रेमपुष्पात

रंग भरुन अथक प्रयत्नांचे, वात्सल्याचे, आणि माझ्या हरवलेल्या बालपणाचे.

# अरे संसार संसार - नवनीत सोनार, पुणे

✉ navneetsoar@gmail.com ☎ 9421974648 *(लेखक निवृत्त शिक्षक आहेत)*

अरे संसार संसार, त्याचे जाणूनी घ्या रे सार,
करणे कठीण आहे पार ||

दोन जीवांचा असतो संसार, जोपर्यंत वाढत नाही पसारा,
तोपर्यंत असतो एकमेकांना आसरा ||

एकदा का आला दोघात तिसरा, पत्नी म्हणते माझी सेवा थोडी विसरा
दोघांच्या प्रेमात सुरू होतो घसारा ||

मग हळूहळू सुरू होते शाब्दिक द्वंद्व, क्षणो क्षणी वाटते का यावे असे निर्बंध
निर्बंध वाटतात तिसऱ्या मुळे शिस्तबद्ध ||

संसार जसा फुलतो कळीची होतात फुले, म्हणतात ना मुले म्हणजे देवाघरची फुले
मुलांमुळेच संसार हा खुले ||

त्यांच्या पंखांनी ते जेव्हा उडू लागतात, तेव्हा आनंदाच्या कळया फुलू लागतात ||
त्यांच्या जाण्याने मन होते विषण्ण, त्याला काही करू शकत नाही आपण ||
कठीण संसार असला तरी होतो पार, अरे संसार संसार जाणुनी त्याचे सार ||
संसारही एक रांगोळी आहे. नक्षी कोणती ते ठरवायचे आहे ||

# व्हॉट्सअप स्टेटस - प्रिया गौरव भांबुरे, तळेगाव दाभाडे

✉ priyanikum@gmail.com ☎ 9890048474

आपल्या जीवनांत दाखल केलेलं नवीन पान, व्हॉट्सअप स्टेटस
क्षणाक्षणाचं अपडेट देण्यासाठी आतुर झालेलं मन, व्हॉट्सअप स्टेटस
क्षर्णाधात कोसळून गारवा देणाऱ्या पावसासारखं, व्हॉट्सअप स्टेटस
असणाऱ्या त्या वाफाळत्या चहा आणि गरम भजीसारखं, व्हॉट्स अप स्टेट्स
वहीच्या त्या शेवटच्या महत्त्वाच्या पानासारखं, व्हॉट्स अप स्टेट्स
नेहमी बघावंसं वाटणाऱ्या त्या आरश्यासारखं, व्हॉट्स अप स्टेट्स
एक, दोन नाही असंख्य गोष्टींनी भरून टाकणार, व्हॉट्स अप स्टेट्स
नसलेला मुड मिळालेल्या लाईक्सनी आनंदून करणारं, व्हॉट्स अप स्टेट्स
सकाळपासून रात्रीपर्यंत टवटवीत ठेवणारं, व्हॉट्स अप स्टेट्स
रोज न भेटणाऱ्या लोकांना आठवण काढायला लावणारं, व्हॉट्स अप स्टेट्स
न बोलताही बरेच काही सांगून जाणार, व्हॉट्स अप स्टेट्स
मऱ्यादेवेळेत मनातलं सांगायला लावणार, व्हॉट्स अप स्टेट्स
केवळ 'मी' पणा न जपता सगळयांनाआपलंस करणारं, व्हॉट्स अप स्टेट्स
हक्काने स्टेट्सला दाद द्यायला सांगणार, आणि सर्वात महत्वाचं,
आपल्या प्रिय व्यक्तीने बघितल्यावर, गालावर हसू आणणांर.

# माझ्या मनातला पाऊस - जुईली अतितकर, नवीन पनवेल

✉ juilyatitkar@yahoo.in ☎ 8655778845

आकाशात बरसणारा, विजेशी खेळणारा
जमिनीत मुरणारा, सुखावणारा पाऊस
कधी गडगडणारा, सडेतोड पडणारा
नुसताच रिपरिपणारा. माझ्या मनातला पाऊस ||

कधी किनाऱ्याने वाहणारा, सोबत होड्याना नेणारा
कधी थरारक भासणारा हा पाऊस
रंग बेरंगी छत्र्यांनी रंग भरणारा
उत्साही वाटणारा. माझ्या मनातला पाऊस ||

कधी पाण्यासाठी रडवणारा, पाण्यामुळेच हसवणारा
अश्रुनी भिजवणारा, झिजवणारा हा पाऊस
पाण्यापाईच मारणारा अन त्यातूनच तारणारा
सृष्टीला जागवणारा. माझ्या मनातला पाऊस ||

कधी प्रेमात रंगणारा, कळीतून फुलणारा
कधी सौंदऱ्याने सजणारा असा हा पाऊस
कधी ओशाळलेल्या मायेचा, नात्याची ऊब देणारा
बेधुंद बरसणारा. माझ्या मनातला पाऊस ||
थंडगार वाऱ्यावरती मनमुराद नाचणारा
डोंगरमाथ्यावरून कधी तृप्तीने कोसळणारा
चिंब भिजवून निथळणारा
हवाहवासा वाटणारा. माझ्या मनातला पाऊस ||

खिडकीतून नुसते नयन सुख देणारा
भिंतीच्या कोपऱ्यातून नुसताच ठीपकणारा पाऊस
चिखलाने बरबटणारा
आडोशासाठी वळवणारा. माझ्या मनातला पाऊस ||

कोसळून कोसळून सारेच वाहून नेणारा
अचानक गुडूप होऊन काळजाला भेगा देणारा पाऊस
तरीही येताना आनंद घेऊन येणारा
असा अनप्रेडिक्टेबल. माझ्या मनातला पाऊस ||

आहे पूर्वीचाच पण नव्याने समजणारा
प्रत्येक थेंबातून जगणं  शिकवणारा पाऊस
एकच विनंती आहे तुला. भावनांचा ओलावा आटला
तरी बाबा कधी दूर नको जाऊस
असाच राहावा माझ्या मनातला पाऊस ||

## चांदोमामा – प्रसन्न पटवर्धन, पुणे

✉ pypatwardhan@gmail.com ☎ 9960559651

*(लेखक मुळचे कोकणातील असून IT क्षेत्रात कार्यरत असतात आणि लिखाण त्यांचा आवडीचा छंद आहे)*

कधी ढगांच्या आड, कधी मोकळ्या आकाशी,
चांदोबा, ही लपाछपी तू खेळतोस तरी कुणाशी

वरून तुझ्या शुभ्र प्रकाशात, सर्वांकडे पाहतोस
एवढ्या सगळ्या चांदण्यांच्यात आनंदाने राहतोस

हळू हळू लहान होऊन अजिबातच गायब होतोस
पुन्हा मोठा होता होता गोल प्रकाश होऊन जातोस

कशी करतोस ही जादू, कधी सांगशील का रे आम्हाला
भेटेन का कधी मी, या जादुगार चांदोमामाला

## भेट सवंगड्यांची – प्रसन्न पटवर्धन, पुणे

तलावाच्या काठावरती पाखरांचा थवा जमला
नव्या जुन्या गोष्टी, आठवांचा उजाळा झाला

मित्र, मैत्रिणी, सखे, सोबती, दोस्त, सवंगडी
कोण नावे द्यावी तरी या नात्याची एकच गोडी

उरले सुरले, काही स्मरले काही विसरले
भेटीच्या आशेवरती एक साल अधिक सरले

आज तो क्षण आला, मन भारावून जो गेला
तुम्हा भेटीच्या सुखावल्या मनी कितीक कळा

चार घटिका सुखवणार्या, त्या कधी न होय अंत
भाव निराळे भवनांतुनी दाटुन येई कंठ

पुन्हा एकदा पांगा-पांग ही कुणा न समजायाची
पुन्हा भेटीची मनी कामना, असे अपर्यायाची

चुक-भुल द्यावी घ्यावी......

पुन्हा भेटू.......

# धनी – मोहन वायकोळे, बोईसर

✉ mohanwaykole@yahoo.com ☎ 9537909375

कौतुकाचे धनी, झाले बेईमान,
कोणते प्रमाण, फितुरीचे...!

हाताशी चमचे, मानाचे सोहळे,
निष्ठावंत पोळे, नेहमीच...!

संधिसाधू थोर, सट्टयाचा प्रयोग,
कोणता नियोग, अंतरीचा...!

दगडा शेंदूर, फासे हळूवार,
छळ जोरदार, जाणिवांचा...!

सर्व चराचरी, देवाचे वैभव,
जाण परातत्व, मानवा रे...!

# नवी जाणीव - भारत उपासनी, नाशिक

प्रत्येक श्वास घेऊन उठतो आहे.
एक शब्द. एक कविता. एक नवी जागृती.
प्रत्येक श्वास आणि क्षण आतुर.
शब्दबद्ध होण्यासाठी.
पहिली कविता स्फुरण्याच्या आधी काय होतं ?
शेवटची कविता स्फुरण्याच्या नंतर काय असेल ?
कविता संपेल का ?
मग कवितेच्या पुढे काय राहील ?
कदाचित माध्यम संपृक्त झाल्यावर.
ते आपोआपच बदलेल.!
ते बदलणं आवश्यकच ठरेल.
नव्या जाणीवांसाठी.!

# रथचक्र - भरत उपासनी, नाशिक

आताशा मन कशातच रमत नाही
सगळं कसं अगदी रुक्ष रुक्ष वाटतं
अनुभवांनी मन जास्तच रुक्ष झालंय
व्यवस्थेने जगण्याचा रस शोषून घेतलाय
सगळीकडे एक छळवादी अनुभव येतो
रांगांमध्ये जीव थकून जातो
कागदी घोड्यांनी जीव थकून जातो
बालपणाचे रंग उडून गेले आहेत
आपण कितीही प्रेमाने वागलो तरी
माणसं त्यांचा स्वार्थ अहंकार हेका सोडत नाहीत
संवादाच्या सगळया वाटा बंद झाल्या आहेत
खोटं वागणं खोटं जगणं खोटं हसणं
स्वार्थ साधण्यापुरतं गोड बोलणं
स्वार्थ संपला की ढुंकून न पहाणं
अपमानांचे आघात करीत रहाणं
काम असलं की कवटाळणं
काम संपलं की टाळणं
जिव्हारी बोलणी जिव्हारी घाव
जिव्हारी दृष्टीत जिव्हारी भाव
कुठेतरी कुणाला तरी कशाने तरी
जखमी केल्याशिवाय पोट भरत नाही
कुठेतरी कुणालातरी कशानेतरी लुटल्याशिवाय
कुणाला समाधानाची प्राप्ती होत नाही
शरीर मन बुद्धीचा ऱ्हास होत चाललाय
आत्म्याची तर गोष्टच लांब राहिली
तो बिचारा हे सगळे खेळ फक्त बघतो आहे
सगळ्या देवता दगड बनून मुक्या झाल्या आहेत
सुविचार सदाचार आणि संस्कार भयभीत होऊन
सहन होत नाही आणि सांगताही येत नाही म्हणून
कोणताही अपराध केलेला नाही तरीही
खाली मान घालून अपराधीपणे वाटचाल करीत आहेत
उठवळ छाती काढून चालते आणि सोज्वळ शालीन
रस्त्याच्या कडेकडेने बिचकून चालते आहे

विसंवादी विनाशाच्या ह्या उंबरठ्यावर
कविता जळत चालली आहे
नाट्य फुलत चाललं आहे
आणि तमाशाचा फड तर अगदी रंगात आलाय
दौलतजादा उधळून मद्य मदिराक्षीच्या सान्निध्यात
उन्मत्त खुशालचेंडू चुस्त मस्त कैफात मश्गुल आहेत
हरामाचा पैसा आणि मद्य मांस मदिराक्षी, मग काय ?
" ला पीला दे साकीया पैमाना पैमानेके बाद"
ही गझल आळवीत
" आधीच मर्कट तशात मद्य प्याला आणि विंचूदंश झाला"
अशा अवस्थेतला तो मधुशालेत मदिराक्शीला
बालीश बहु बायकात बडबडला अशा थाटात म्हणतो
" होशकी बाते करुंगा होशमे आनेके बाद"
अरे पण तू होशमध्ये आला तर ना ?
आणि ती मदिराक्षी मधुबाला मधुशालेतून तुला
होशमध्ये येऊ देईल तर ना ?
तुझा भिकारी देवदास होईपर्यंत ती तुला सोडणार नाही
तू त्यांना सोडणार नाही
आणि असं झाल्याशिवाय
आमचं दुःख हताशा आणि निराशा
आमच्या आयुष्याचं हे ओकंबोकेपण
आमचा हा रुक्ष शुष्क उदास भकास विषादयोग संपणार नाही
आणि खऱ्या अर्थाने तोपर्यंत आमची
कविताही फुलणार नाही, खुलणार नाही
आणि हसणारही नाही
आपण सर्वांनी दिलेल्या प्रचंड दुःखात
आमची कविता हिरमुसली आहे, रुसली आहे
व्यवस्थेच्या दुष्टचक्रात तिच्या रथाची चाकं फसली आहेत
ऐकू येतो आहे तो फक्त तिचा आर्त चित्कार
ह्या चित्काराचं रुपांतर कदाचित
भुजंगाच्या फुत्कारात झालं तर
असा आशावाद उराशी बाळगून
सध्या तरी ती तिचं धरणीच्या गर्भात रुतलेलं
रथचक्र बाहेर काढण्याच्या प्रयत्नात आहे.!

# सांगू कसे मी कोणाला? - सुवर्णा कांबळे, कळंबोली

✉ suvarnakamble474@gmail.com ☎ 9960354673

सांगू कसे मी कोणाला? मलाही न कळे,
टोचतात, सलतात, अंतरीची वादळे.

काय केला मी गुन्हा? मज कधी न कळे
अश्रूंनी केले न तळे, अंतरीची वादळे.

मी सोसले, भोगले, यातना त्या न कळे
आर्ततेची हाक माझी, अंतरीची वादळे.

# चारोळया: पानगळ - अभिलाषा देशपांडे, डोंबिवली

✉ abhilashardeshpande@gmail.com ☎ 7045948961

१ ) येता शिशीर हा धावून
होते सा-याचीच तारांबळ
फुलतो तो बहरून पळस
पण झाली जागोजागी पानगळ

२) आला शिशीराचा वारा
पानगळ सुरू झाली
गेला कचरा वा-याने
नवी पालवी फुटली

३) येता शिशीर दारी
पाने टाकती कात
गुलमोहर पिवळा भारी
फुलून सजतो त्यात

४) नव देण्याच्या
निसर्गाचा अलंकार
वठलेल्या मनाला
नव तिचा शृंगार

५) पालन निसर्गाचे
नवीन फुटे पालवी
गळती तृप्ततेने
चक्र कौतूके चालवी

६) चक्र निसर्गाचे पानगळ
गळतील पाने पिकली
त्या पानावरही प्रेम करावे
हिरवी असताना दिली सावली

७) शिशीराच्या पानगळीशी
नाळ जोडलेली
पालवी फुटता
स्पंदने दाटलेली

८) आला शिशीर ऋतू
पानगळ झाली
नवी पालवी येणार
पानफुले येती तरू


९) कुडीतून प्राण जाता
उरतो हा देह नश्वर
जरी पानगळीत पाने झडती
वृक्षाला येतो पून्हा बहर

१०) पानगळ हवीच हो
जुने जीर्ण लया जाते
घ्यावया त्यांची ती जागा
नवीन काही उद्या येते

# || कला विभाग ||

## स्केचेस (रेखाटने) – हर्षलता पाटील

harshalapatil1999@gmail.com



## ग्राफिटी – अविनाश हळबे




## स्केचेस (रेखाटने) – निमिष सोनार








## स्केचेस (रेखाटने) – अथर्व सोनार, पुणे






## व्यंगचित्रे – सिद्धेश देवधर, गोवा

✉ siddhesh.deodhar@gmail.com ☎ 9420161525 *(लेखक IT क्षेत्रात आहेत)*




## व्यंगचित्रे – रोहिणी जाधव, बेलापूर



# निसर्ग छायाचित्रण – अनन्या बाळापुरे, चिंचवड











वाचक मित्र मैत्रिणींनो

मराठी भाषेतील नवप्रतिभाशाली साहित्यिकांना वाचकांपर्यंत नेणे आणि जगभर विखुरलेल्या मराठी वाचकांना उत्तमोत्तम साहित्य उपलब्ध करून देणे. आजवर अनेकांनी हे काम केले. आजही अनेक संस्था व व्यक्ती हे काम करतात. बुक स्ट्रक आणि मराठी अर्थ या अशाच संस्था आहेत. त्यांनी चालवलेले आरंभ हे नियतकालिक विनामूल्य वितरित करण्याचे अधिकार त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला दिले आहेत. आणि ई साहित्य प्रतिष्ठान ते अधिकार आपल्या वाचकांना देत आहे.
आपण हे नियतकालिक वाचावे आणि आपल्या मित्र आप्तांना ते विनामूल्य द्यावे. तसेच आपल्याला यात काय आवडले व यात अजून कशा सुधारणा करता येतील तेही आम्हाला सांगा. आपल्याला यात भाग घ्यायचे आमंत्रण आम्ही देत आहोत.
आपण सर्वजण मिळून आपली समृद्ध मराठी भाषा अजून समृद्ध व आधुनिक करुया.
या अंकातील लेखनाचे सर्वाधिकार त्या त्या लेखकांचे/ कलाकारांचे आहेत. त्याचा इतर कुठेही वापर करण्यापुर्वी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

धन्यवाद

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com